
निबंध
क्र. १५३८
१९६४



# कृ… ाईच्या
# …रिसरांत

REFBK-0013750
REFBK-0013750

• मनोहर ग्रंथमाला प्रकाशन •

# कृष्णामाईच्या परिसरांत

शांताराम द. थत्ते

मनोहर
ग्रंथमाला
प्रकाशन
— १२१ —

३८५५८
१६/११/५८
सं. शा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों वि: ...

# कृष्णामाईच्या परिसरांत

शांताराम द. थत्ते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा
REFBK-0013750

ग्रंथमाला
प्रकाशन
— १२१ —

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला,
टिळक रोड, पुणें २.

*

सर्वाधिकार लेखकाचे स्वाधीन

*

मुखपृष्ठ
वसंत सहस्रबुद्धे

किंमत तीन रुपये

*

गणेश चतुर्थी
९ सप्टेंबर १९६४

*

न. वा. लिमये,
महाराष्ट्र मुद्रणालय,
४६१।१ सदाशिव पेठ,
पुणें २.

# प्र स्ता व ना

" **कृष्णामाईच्या परिसरांत** " या सदराखालीं श्री. शांताराम द. थत्ते यांनीं लिहिलेल्या लेखांचा संग्रह मीं वाचला. संत गोंदवलेकर महाराजांचें चरित्र एका लेखांत फार चांगल्या रीतीनें दिलें आहे. सज्जनगडचा महिमाही एका लेखांत आला आहे. श्रीकरहाटक ( हल्लींचें कऱ्हाड ) या क्षेत्राचा इतिहास व वर्णन एका लेखांत दिलेलें आहे. अशा अनेक पवित्र स्थळांची माहिती या लेखांतून दिलेली आहे.

संत वाङ्मयाला महाराष्ट्रांत फार मोठें स्थान आहे व त्याचा महाराष्ट्राच्या इतिहासावरही फार परिणाम झालेला आहे. संतांच्या सान्निध्यानें पुनीत झालेल्या कृष्णाकांठच्या अनेक स्थळांच्या माहितीनें परिपूर्ण असलेला हा लेख-संग्रह भाविकांना व इतरांनाही उद्‌बोधक ठरेल. या उपयुक्त कार्याबद्दल श्री. थत्ते यांना धन्यवाद.

**ह. वि. पाटसकर**

राजभवन, भोपाळ
ता. २१-८-६४

# कृष्णामाईचें दर्शन

एका भावभक्तीशिवाय तीर्थ–यात्रा–दर्शन हीं सारीं व्यर्थ होतात, हें हरिपाठांत सांगतांना श्रीज्ञानदेव महाराज म्हणतात '**त्रिवेणी संगमीं नाना तीर्थें भ्रमी, चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ** किंवा–**तीर्थें–व्रत–नेम भावेवीण सिद्धि, वायांचि उपाधी करिसी जना ॥** श्री तुकाराम महाराजांनींहि "तीर्थीं धोंडा पाणी" म्हणून जीं माणसें भावनेशिवाय तीर्थयात्रा करतात त्यांचा उपहास केला आहे. पंढरीच्या विठ्ठलांतहि जें "सुंदर तें ध्यान" दिसतें, तें फक्त भक्तांनाच. भक्तिहीन पुरुषाला तिथें फक्त आकार असलेला एक मूर्तिरूप दगड दिसेल. तसेंच नदी म्हणजे काय ? तर दोन भाग हैड्रोजन व एक भाग ऑक्सिजन यांचें वहाणारें पातळ मिश्रण. पण या जलांत स्नान करणाऱ्या बैलाला, भक्तिहीन व्यक्तीला व भक्तिमान व्यक्तीला होणारा बाह्यशुद्धि हा लाभ समान असला तरी पहिले दोघे अंतःशुद्धीला मुकतात; पण भक्तिमान व्यक्तीच्या अनंत जन्मींच्या मनाच्या गांठी सुटतात, मन पवित्र, शुद्ध होऊन भक्तीनें बहरून येतें; अपार आनंदाचा लाभ त्याला होतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा

न काष्ठे विद्यते देवो न शीलायां कदाचन ।
भावे हि विद्यते देवो तस्मात् भावं समाश्रयेत् ॥
न देवः पर्वताग्रेषु न देवः शिवसद्मनि ।
देवः चिदानंदमयो हृदि भावेन दृष्यते ॥

देवाचें दर्शन लांकडांत, दगडांत, डोंगरावर, देवालयांत, नदींत अरण्यांत माणसाला तेव्हांच होईल, जेव्हां त्याचें अंतर निर्मल, शुद्ध असेल, आंतच सौंदर्याचा, प्रेमाचा, भक्तीचा अखंड झरा वहात असेल. नुसत्या बाह्य क्रिया अंतःसहकाराशिवाय निरुपयोगी आहेत, ज्ञान भक्तिशिवाय व्यर्थ होय हें सांगताना तो कवि सांगतो—

मीनः स्नानरता, फणी पवनभुक, मेषस्तु पर्णासनः ।
नीराशः खलु चातकः प्रतिदिनं शेते बिले मूषकः ।
भस्मोध्धूलनतत्परः खलुखरः ध्यानाधिरूढो बकः ।
सर्वे किं ननु यांति मोक्ष पदवीं, ज्ञानं प्रधानं तपः ॥

मासा पाण्यांत, साप हवा खाऊन, मेंढा पानें खाऊन, निराशवृत्तीनें चातक, उंदीर बिळांत–गुहेंत–राहून, गाढव अंगाला धूळ–राख–फासून, बगळा एकटक ध्यान लावून एखाद्या साधूचेच बाह्य आचार करतात पण एका ज्ञानभक्तिशिवाय हे सारे बाह्य आचार समान असूनहि मोक्ष न मिळतां फुकट जातात.

श्रृतीनेंहि ईश्वराचें वर्णन– " रसो वै सः । रसं ह्येवायं, लब्ध्वाऽऽनंदी भवति– " ईश्वर म्हणजे मूर्तिमंत रस, मधुरतम रसानें ईश्वर अंतर्बाह्य सजला आहे– असेंच केलें आहे. त्या मधुर, आनंदमय रसाचें धारारूप म्हणजे नदीमाता. वात्सल्याची, करुणेची प्रेमाची अखंड जाग्रतधारा म्हणजे जशी आपली आई, तशीच विशाल प्रदेशांतल्या विशाल मानव समूहाची वात्सल्यमय, सौंदर्यमय, आनंदमय आई म्हणजे नदीमाता. आईजवळ जसें प्रेमानें, रागानें कसेंहि जा, ती तुमच्या कल्याणाची, उत्कर्षाचीच इच्छा करील,

तुमच्या भल्याचीच चिंता करील, तसेंच नदीमातेचें. श्रीमत् आद्य शंकराचार्यांसारख्या भारतभरचें जनमानस पहाणाऱ्या तीव्र बुद्धिवादी संन्याशानेंहि "कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति" म्हणून जसा आईचा गुणगौरव गायिला तसाच नदीमातांचाहि गायिला. प्रेमाची, भक्तिरसाची अशी नवलाई आहे कीं, कुरूपतेंतहि सौंदर्य, आनंद, निर्माण होतो. बिरबलाची ती प्रसिद्ध गोष्ट आहे ना कीं, ज्यांत एका काळ्याकुट्ट शिद्दी माणसानें आपला शेंबडा, काळा कुळकुळीत, नागडा मुलगा दिल्लींतील सर्वांत सुंदर मुलगा म्हणून बादशहापुढें बक्षिसा-करतां उभा केला. इतरांच्या सुस्वरूप मुलांत त्याला कांहींना कांहीं दोष आढळला. पण अंतःसौंदर्यानें, प्रेमानें, वात्सल्यानें त्याची दृष्टि बदलली व त्या स्वतःच्या विद्रूप मुलांतहि तो अपार सौंदर्य, निर्दोषत्व पाहूं शकला. तोच रस जर आपल्या आंतून अखंड वहात असेल तर सारें जगच सुंदर, निर्दोष, मंगल असेंच आपणांस वाटेल. मग सौंदर्याचा, आनंदाचा, रसाचा नदीरूपाने वहाणारा तो धवलमंगल प्रवाह पाहून त्याचें मन आनंदानें, भक्तीनें, हर्षानें कां उल्लसित होऊन खळाळणार नाहीं! दुधाच्या कणाकणांत साय सांठवलेली असते. दूध तापवल्यानें ती वेगळी होऊन दिसते इतकेंच. तसेंच या विश्वांत नदी, नाले, डोंगर, पर्वतांत, ब्रह्म भरलेलें आहे. भाव-भक्तीनें रसमय होऊन, साधना-तपस्या करून तें प्रगट करावें लागतें. नदी, तीर्थें या ठिकाणीं अनेक संतसत्पुरुषांनीं हें काम तुम्हां आम्हां करतां केलेलें असतें. परमात्मा या नदी-तीर्थ रूपानें जणुं उसळून राहिला आहे. संतांच्या मंगल आशीर्वादानें हें आंतररस उफाळून बाहेर वाहूं लागलें कीं त्याच नदीच्या ठिकाणीं कोटी कोटी चंद्रांची सौम्य प्रेममय कांति वहातांना दिसूं लागते. तिचें तें प्रसन्नतेनें, मधुरतेनें हंसणारें मुख पहाता येतें. तिचे प्रेमानें ओथंबलेले, निर्लिप्त, निर्मळ नेत्र तर डोळ्यांसमोरून कधींच दूर होत नाहींत. तिच्या क्षणाक्षणाला, कणाकणानें होणाऱ्या तरंग-ऊर्मींतून मधुमय

गुजगोष्टी आपल्याला ऐकूं येतात. बुद्धि आणि बोध यांचा वियोग अनेक जन्मानंतर फिटतो. हातापायांत नवीन चैतन्य स्फुरतें. डोळ्यांच्या आंत डोळा उघडतो. दिव्य परिवर्तनानें जीवन फुलतें. दिशा घनदाट भरून आंतहि तोच दिव्य प्रवाह वाहूं लागून सारेंच ब्रह्मरूप होतें. बाहेर वहाणारी ती सौंदर्यमयी, आनंदमयी, चिन्मयी कृष्णा माता जणूं हृदयांतून, नाड्यानाड्यांतुन, नसानसांतून बुद्धि, भावना—केंद्रांतून अखंड, एकरसपणें वहात-फुलतच असते. आपणच जणुं कृष्णा—माता होऊन कृष्णेला पाहूं लागतो.

फार पुरातन काळीं—कधीं कुणास ठाऊक, जगाच्या निर्मितीनें थकलेला ब्रह्मदेव सह्याद्रीच्या एका अति उंच गिरीशिखरांवर तपस्येकरितां बसला. पण त्यानेंच निर्माण केलेल्या या जगांतल्या अतिबल व महाबल या दोन राक्षसांनीं, त्याच्या या तपस्येंत आपल्या उदंड राक्षसी बलानें विघ्नांवर विघ्नें निर्माण करण्यास सुरुवात केली. शेवटीं ब्रह्माच्या विनंतीवरून विष्णूनें अतिबलाला व आदिमायेनें महाबलाला लढाईत ठार केलें. पण मरणाऱ्या राक्षसांच्या विनंतीवरून त्या स्थानाला महाबलेश्वर हें नांव कायम केलें व विष्णू अतिबलेश्वर, ब्रह्मा कोटीश्वर, व शंकर महाबलेश्वर या नांवानें तिथें आपल्या मूर्ती स्थापन करतें झाले. ब्रह्मदेवानें तप पुरें होतांच मग एक मोठा यज्ञ आरंभून सर्व देवदेवता, ऋषी मुनी, शंकर विष्णू यांना या समारंभाकरतां पाचारण केल्यावरून ते सर्व सहकुटुंब उपस्थित झाले. यज्ञाला सुरुवात झाली, पण मुख्य यजमानीणबाईच आपला नट्टापट्टा करतां करतां वेळेवर हजर झाल्या नाहींत. शेवटीं मुहूर्त टळूं नये म्हणून ब्रह्मदेवानें पट्टराणी सावित्रीमातेऐवजी दुसरी पत्नी गायत्रीमाता हिलाच यज्ञाला बसविलें. पण या अपमानानें सावित्रीचा राग उसळला व तिनें जमलेल्या साऱ्यांना तुम्ही नदीरूपानें वाहूं लागाल म्हणून शाप दिला. त्यामुळें विष्णू कृष्णारूपानें, ब्रह्मदेव वेण्णारूपानें व शंकर कुकुद्मति उर्फ कोयना-

रूपानें त्या उंच पर्वतावरून पूर्वेकडे वाहूं लागले. इतर ऋषी, मुनी, देव यांना छोट्या नदीनाल्यांचें रूप मिळालें. रागावलेल्या मुनींनीं सावित्रीलाहि तूंहि नदीरूपानें वहाशील असा शाप दिल्यानें ती मात्र —हे सर्व पूर्वेकडे निघालेले पाहून रागानें पश्चिमेकडे वहात पश्चिम समुद्राला हरिहरेश्वराजवळ जाऊन मिळाली.

सावित्रीच्या या शापानेंहि पण मोठेंच लोककल्याण साधलें. नऊ हजार सातशें मैलांचा प्रदीर्घ प्रवास करून, व महाराष्ट्र, आंध्र म्हैसूर यांच्या भूमि सुजलां सुफलां करून कृष्णामाई बेझवाड्याजवळ पूर्व समुद्राला जाऊन मिळाली. पण त्या आधीं तिनें माहुली क्षेत्रीं वेण्णेला आपल्या पदराखालीं झांकलें. कराडला आंध्रभूत्यांनीं तिचा पूर्वीं नसलेला व मानवी प्रयत्नानें केलेला कोयनेचा प्रीतिसंगम घडवून आणला. सांगलीजवळ वारणेनें तिला मिठी मारली, तर नरसोबाच्या वाडीला पंचगंगेनें तिचें स्वागत केलें. पुढें विजापूर जिल्ह्यांत घटप्रभा व मलप्रभा यांना घेऊन तिनें रायचूरजवळ चारशें-फूट खोल उडी मारून सपाट मैदानावर येतांना प्रचंड खळखळ केली, पंढरीला पांडुरंगाचें दर्शन घेऊन येणाऱ्या भीमेनें तिला आपला भक्तिप्रेमाचा उमाळा सांगितला व किंकिणी—मंजुलं अशा श्रीगुरूंचें कुशल तिला विचारलें. इकडे तुंगा आणि भद्राहि एक होऊन तिच्या भेटीला खूप भेटी घेऊन हजर झाल्या व बेझवाड्याजवळ धरणानें जमलेला प्रचंड जलसंभार तिनें पुष्कळसा वांटून टाकून, उरलेला पूर्व समुद्राच्या स्वाधीन "इदं न मम" म्हणून दोन मुखांनीं केला. कृष्णामाईच्या या विराट रूपाचें दर्शन आपल्या "कृष्णालहरीं" त करतांना पूजनीय श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्बेस्वामी म्हणतात—

मुखं ते सह्याधः सदयहृदयं ते नरहरेः
पुरेऽप्यान्ध्रे नाभिः प्रपदयुगलं प्राच्य विषये ॥

**अये श्रीकृष्णे तेऽद: प्रथितमिह रूपं मुनिमते**
**नम: श्रीकृष्णे ते जय शमित तृष्णे गुरुमते**

हे भगवती कृष्णे, तुझें मुख सह्य पर्वताच्या अधोभागीं वाई क्षेत्रांत आहे. ( जिथें आचार–विचारशुद्ध असे विद्वान् ब्राह्मण ब्रह्मरंगांत मस्त असतात ) असें ब्रह्मरंगी रंगलेले ब्राह्मणच जणूं तुझें मुख आहेत. त्याचप्रमाणें भूतदयेनें भारावलेलें तुझें अंत:करण नृसिंहवाडीस असल्यानें तूं भक्तांना अभयदायिनी होतेस. आंध्रांत कुरुमड्डी येथें तुझी नाभी असून,पूर्व समुद्राला मिळणारे तुझे दोन प्रवाह तुझी चरणकमलें शोभतात. असें हें तुझें रूप, तूं अरूपा असूनहि माझ्या अंत:करणांत सतत स्फुरतें. हे महन्मंगले, उदारे, वात्सल्यमय माते, तुझा जयजयकार असो !" कृष्णेच्या या रम्य, पवित्र परिसरांत महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर यांची विजयनगर, सातारा, म्हैसूरचीं राज्यें आपल्या शौर्य, धैर्य, तेजानें वाढलीं,चढलीं व पडलीं. या तीन संस्कृतींची भरभराट हिच्याच कांठीं झाली. आर्य व द्राविडी संस्कृतीचा संगमहि तिनेंच पाहिला. धर्मशास्त्राचें माहेर वाई, सुश्लोक वामनाचें धोम, निस्पृह रामशास्त्र्यांची माहुली, धैर्यशौर्याचें माहेर सातारा, संत सखू, विटोबा अण्णा दप्तरदार, पूर्णानंदस्वामी, दयार्णव कोपर्डेकर यांचें कऱ्हाड, नृसिंह सरस्वती, टेंबेस्वामी यांची नृसिंहवाडी, आनंदमूर्तींचें ब्रह्मनाळ, औदुंबर, जयरामस्वामींचें वडगांव, समर्थांचें चाफळ, भीमपराक्रमाचें प्रतापगड, मकरंदगड, कमलगड अशीं अनेकानेक स्थळें तिच्या पाण्यांत आपलीं प्रतिबिंबें पहात आहेत. कृष्णा महाराष्ट्राची प्रमुख देवता. महाराष्ट्रांत तिच्या वात्सल्यानेंच सामर्थ्य,साधुत्व,पुरुषार्थ न्यायप्रियता, मुत्सद्दीपणा, धर्म, सदाचार, विद्वत्ता, भक्ति, विरागता, उदारता वाढली, फुलली व वाढेल, फुलेल. महाराष्ट्राचा वैभवशाली भूतकाळ, संघर्षमय वर्तमानकाळ व उज्ज्वल भविष्यकाल जणूं या कृष्णामाईच्या रूपानें वहात आहे. तिच्या विविध रूपांत, विविध ऋतूंत दिसणारें अनेकत्वहि, विविधताहि, तिच्या एकरूपाचाच प्रत्यय

देते. अखंड पूर्व सागराकडे धांवणारी ही माता "चराति चरतो भगः" चालणाऱ्याचें भाग्य चालत असतें असें जणूं सुचवतें. अशा या भगवतीच्या पायांत अनेक तीर्थे आहेत पण त्या तीर्थांनाहि तीर्थपण कशानें आलें? गरुड-पुराण म्हणते-"रजस्तमो विरहितै: तपसा धूतकल्मषै: । यदध्यासितमर्हद्‌भि तद्धि तीर्थं प्रचक्षते" ज्या ठिकाणीं राग-द्वेषविरहित असे व ज्यांनीं तपानें आपलें पाप धुवून टाकलें व जे लोकादरांस पात्र झाले आहेत असे महात्मे रहातात त्या स्थानाला तीर्थ म्हणतात. असे महात्मे कृष्णाकांठीं अनेक झाले, आज आहेत, उद्यांहि होतील. या सर्वांचें सामुदायिक स्मरण म्हणजेच कृष्णामाईचें स्मरण व दर्शन. हें दर्शन वारंवार व्हावें म्हणून त्या भगवद्रूपिणी कृष्णामाईला प्रार्थना कीं—

**न धनं न जनं न सुन्दरीं, कवितां वा जगदीश कामये ।**
**मम जन्मनि जन्मनीश्वरे, भवताद् भक्तिः अहैतुकी त्वयि ॥**
**नयनं गलदश्रुधारया, वदनं गद्‌गदरुद्धया गिरा ।**
**पुलकैः निचितं वपुः कदा, तव नामग्रहणे भविष्यति ॥**

हे भगवद्रूपिणी कृष्णामाई! मला धन नको, मान नको, सौंदर्य, काव्य कांहीं नको. परंतु जन्मोजन्मीं मला निष्काम भक्ति-प्रेम असूं दे. मी त्या दिवसाची वाट आसुसलेल्या मनानें पहात आहे कीं, जेव्हां तुझें केवळ नाम घेतांच माझे डोळे प्रेमभक्तीच्या अश्रूंनीं भरभरून ओघळतील, जेव्हां माझ्या अवरुद्ध कंठांतून, भक्तीच्या उद्रेकानें श्वसनहि बंद झाल्यानें, लवकर शब्दहि उमटणार नाहींत व माझें सारे अंग पुलकित होऊन, अंगावर रोमांच उभे रहातील व आनंदातिशयानें माझें हें सारें जीवन तुझ्या प्रेमानें फुलेल.

या कृष्णामाईचें हें दर्शन ज्यांच्या कृपेनें मला होऊं शकलें, त्या पूजनीय श्री वामनरावजी गुळवणी महाराज व इतर अनेक संत-सत्पुरुष-विचारक यांच्या आधारांचा मला कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा

वाटतो. या सर्वांनीं माझ्यावर अशीच कृपा ठेवावी व माझें जीवन आपल्या मंगल आशीर्वादानें व सुविचारांनीं सार्थकीं लावावें ही त्यांना प्रार्थना. 'वाङ्मय–शोभा' मासिकाचे श्रेष्ठ व ज्येष्ठ संपादक व मनोहर ग्रंथमालेचे संचालक श्री. मनोहरपंत व सौ. स्नेहलता केळकर–या दंपतीनें माझ्या या दर्शनाला आपल्या मासिकांतून व ग्रंथरूपानें प्रकाशांत आणून आशीर्वाद दिला. त्याबद्दल त्यांचेहि मनःपूर्वक आभार !

१५–८–६४ शांताराम द. थत्ते

# अ नु क्र म


| | |
|---|---|
| माण वाळवंटांतील " प्रेमनिर्झर " | १ |
| शिखर सिंगणापूरचा नित्यश्री नित्यमंगलम् | १५ |
| कुळकजाई येथील कुरंगविलोल नयनांतील अश्रुसंपात | २४ |
| सज्जनगडचे " ज्ञानी आणि उदासू " | ४० |
| मत्स्येंद्रगडचे " शिष्य आणि गुरुनाथु " | ४९ |
| कृष्णातीरींचे " भक्त, भागवत, भगवान " | ६१ |
| प्रीतीसंगमावरील श्रुतिस्मृतितरंग | ७९ |
| किंकिणी-मंजुलं श्रीगुरुं तं भजे | ९६ |

१ :

# माण वाळवंटांतील "प्रेमनिर्झर"

एखाद्या प्रचंड सुस्त अजगरासारखा, सह्याद्रीचा एक लांबच लांब फांटा, फलटणहून मोगराळा घाटापर्यंत अस्ताव्यस्त पसरला आहे. या पर्वतरांगेच्या वेड्यावांकड्या फांट्यावर वृक्षराजी तर सोडाच, पण एखादें निष्पर्ण झाडोरेंहि दिसत नाहीं. या पीत सुस्त अजगराच्या शेपटाशींच उभा असलेला मोगराळा घाट तर, त्याहूनहि अधिक अप्रसन्न मुखाचा, शोभाविहीन असा आहे. जीवनांत अनेक तऱ्हेच्या विकारांचे भयानक उपसर्ग होऊन, त्यांच्या कटुतम अनुभवांच्या दाहकतेंतून सुटण्याकरतां, एखाद्या विद्रूप, काळ्या व्यक्तीनें विरक्त, खिन्न होऊन उदासपणानें जीवन कंठीत असावें, तसा मोगराळा घाट, सह्याद्रीच्या हरित् गुच्छमय पर्वतश्रेणीं-पासून फटकून दूर येऊन बसल्यासारखा वाटतो. जीवनांतले विकार तर अंतर्धान पावले नाहींत, आसक्ती कमी झालेली नाहीं, वैराग्याची कांपधांप लोपून योग्याची अखंड समचित्तता, प्रसन्नता प्राप्त झालेली नाहीं, रागद्वेषांचें हलाहल पचवतां आलेलें नाहीं, अशा माणसानें विरागीपणाचा कितीहि आव आणला तरी त्या वैराग्यांतूनच क्रोधादि

विकारांच्या ऊर्मी मुखावर प्रगट होऊन चेहरा अप्रसन्न व विकारी दिसल्याशिवाय राहात नाहीं. जीवनांतल्या गतकालीन झटापटींच्या जखमांचें वण, उत्तर वयांतहि लोप न पावतां, कषाय वस्त्रानें अधिकच उठावदारपणानें दिसतात. मोगराळा घाटाचेंहि असेंच झालें आहे. माणदेशाच्या तप्त, पर्जन्यविहीन भूमीवर तो असाच एकाकी, निराश, खिन्नसा वाटतो. त्याच्या दर्शनानें माणसाच्या मनांत प्रसन्नतेचे, पावित्र्याचे, उदात्ततेचे स्रोत उसळून येण्याऐवजीं, खिन्नतेची व उदासीनतेची दाट छायाच अधिक पडते.

पण साऱ्या मायदेशाच्या नापीक भूमीचेंच तसें आहे. निसर्गानें जणूं आपला तृतीय नेत्र या भूभागावर सतत उघडून ठेवला आहे. नापीक, दुष्काळी, भरड जमीन, जलहीन नदीनाले, निष्पर्ण पर्वत, डोंगर व सूदूरपर्यंत मृगजलाचेच आभास निर्माण करणारें वालुकामय भूभाग यामुळें माणदेशांत येणाऱ्या माणसाचे डोळे कंटाळतात; मन दुखावतें; शरीर आळसावतें. या अप्रसन्न भूभागांतली माणसेंहि काळीकुळकुळीत, धिप्पाड पण उग्र चेहऱ्याचीं वाटतात. नाजुकपण, सौंदर्य, गौरपण या गुणांनी त्यांच्याकडे जणुं पाठच फिरवली असावी. अशा या वाळवंटांत एखादा हरित भूभाग, एखादी रूपमती, एखादा प्रसन्न पर्वत वा वृक्षराजी, एखादी निर्मळ, प्रसन्न सलील सरिता वा निर्झर कुठें दिसतो कां, हें पाहायला मानवी मन आसुसलेलें असतें. या वैराण वालुकाप्रदेशांत एखादा हरितपर्णांकित डेरेदार वृक्ष, एखादा हिरवा मखमलीचा तुकडा, या भयाण निस्तब्धतेचें गांभीर्य, उदासवाणेपणा दूर करणारा, चंचल मधुर ध्वनि करणारा एखादा निसर्गरम्य निर्झर आढळावा असें त्याला मनोमन वाटतें. या काजळवर्णी, उग्र, भव्य मानवसमूहांत मंजुळवाणीचा, प्रेमामृताचा स्रोत पाहाण्याची हांव त्याला लागते. या विरागीपणांत अनुराग, गंभीरतेंत स्निग्धता व मधुरता, पावित्र्यांत वात्सल्य आढळेल, तर या विरोधी पार्श्वभूमीवर तें अलौकिकतेनें खुलेल, शोभेल असा त्याला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५५८ ..... विषय निबंध २ : ३
२५३ ..... नों: दि: १२-११-६

अंतःसाक्षात्कार होतो.

माण देशाच्या अशा या रखरखीत पार्श्वभूमीवर, शके १७६६ माघ शुद्ध द्वादशीला, पहांटेच्या रम्य, पवित्र वेळीं, चंद्राप्रमाणें सौम्य, सुखदायी पण तेजस्वी असा एक तारा गोंदवले गांवांत उगवला व त्यानें आपल्या अपूर्व सौम्य, सुखद तेजानें सारा आसमंत व महाराष्ट्र दुमदुमून टाकला. श्रीमन्भागवतांत सांगितलेली :

**" कालस्य च गतिं रौद्रां विपर्यस्तर्तुधर्मिणः ।**
**पापीयसीं नृणां वार्तां क्रोधलोभानृतात्मनाम् ॥"**


कालगति अति बिकट झाली. ऋतु पालटले. लोक क्रोधी, लोभी असत्यपरायण होऊन पापपूर्ण व्यवहार केवळ जगण्याकरतां करूं लागले आहेत, येवढेंच नव्हे तर " नद्योनदाश्च क्षुभिताः सरांसिच मनांसिच । न ज्वलत्यग्नि राज्येन कालोऽचं किं विधास्यति ।" नदी, नद, सरोवरें, लोकमानस सारें क्षुब्ध झालें आहे. या भयंकर कालप्रभावानें तुपानेंहि अग्नि पेटत नाहींसा झाला आहे, असा विपरीत समय काय करील या शंकेने भयाकुल झालेल्या लोकमानसाला

**" मृगेन्द्र इव विक्रान्तो, निषेव्यो हिमवान् इव ।**
**तितिक्षुर्वसुधेवासौ, सहिष्णुः पितराविव ॥"**

सिंहासारखा पराक्रमी, नगाधिराज हिमालयासारखा शीतल पृथ्वीसारखा सहनशील व मातापित्याप्रमाणें मायाळू असा सत्पुरुष या ब्राह्म मुहूर्तावर लाभला व त्यानें आपल्या नाम–अमृताचा सर्वदूर शिडकावा करून क्षुधित लोकमानस शांत, तृप्त केलें. या महापुरुषाच्या उदयानें त्याचें कुल, त्याचें गांव, त्याचा माणदेश तर धन्य झालाच, पण त्याच्या शांत-सौम्य नामामृताच्या वर्षावानें लोकमानसांत ईश्वरीप्रेमाची अपार सृष्टि डंवरून फुल्ल, उत्फुल्ल होऊन, लोकजीवन निर्मळ होऊन प्रसन्नतेनें हांसू लागलें. अनेक बद्धांचें साधक, आसक्तांचें अनासक्त विरागी व साधकांचें सिद्ध निर्माण झाले. भक्तिप्रेमाच्या या

पवित्र गंगौघानें तीरींचे पादप पोसले, तृषार्तांची तृषा हरण केली, अडकलेल्यांना मुक्त केलें, सारें पापताप दैन्य दुःख नाहींसें केलें. उत्तर हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा सारा भारतवर्ष या महापुरुषानें आपल्या संचारानें पावन केला, अनेक प्रांतांचे, अनेक भाषांचे, अनेक आचारविचारांचे निरक्षर–साक्षर त्यानें अक्षराच्या उपासनेस लावले. माणदेशांतल्या गोंदवले गांवच्या, रावजी कुलकर्णी इनामदार व त्यांच्या साध्वी पत्नी गीताबाई या दंपतीच्या तपस्येला आलेलें हें गोड फळ म्हणजेच लहानपणाचें गणूबुवा उर्फ ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज होत.

एका सुखवस्तु कुटुंबांत जन्म घेतलेल्या महाराजांचे एकुलता एक मुलगा म्हणून लाड झाले. दिसायला गौर-गोंडस असणाऱ्या महाराजांच्या सुकुमार देहांतच एक अतिशय तापसी आत्मा वसत होता. त्यामुळें महाराजांना ईश्वरी प्रेमाच्या वेडापासून मोकळें करण्याकरतां त्यांच्या मातापित्यांनीं त्यांचें मौंजिबंधन उरकून, एका देखण्या मुलीच्या पाशांत त्यांना बालवयांतच अडकवून टाकलें. पण लहानपणींच “ जे जे वस्तू अनात्मा, ते त्यजावी महात्मा, तरि स्वयें अभ्यासू परमात्मा, स्वयेंचि भेटे । म्हणौनि सर्वहि सांडावे, आणि विरक्त होआवें, ईश्वरातें धरावें, सर्वभावें । करावा विषये त्यागु, धरावा साधुचा संगु, रागद्वेषाचा प्रसंगु, घडोंचि नेदावा ” हें महाराजांच्या मनावर बिंबलें होतें. त्यामुळें घरांत कुणालाच न सांगतां, ते एका लंगोटीनिशीं सद्‌गुरूच्या शोधांत घराबाहेर पडले. कृष्णा-गोदा या नद्यांच्या तीरांवरून भटकत भटकत अयोध्या, काशी, इत्यादि उत्तर भारतांत ते सर्वदूर हिंडले. अनेक सत्पुरुषांच्या गांठीभेटी, आशीर्वाद त्यांच्या पदरांत पडले. पण हवा होता तो सद्‌गुरु मिळेना. शेवटीं रामेश्वरकडे त्यांनीं आपला मोर्चा वळवला. पण याचवेळीं समर्थ संप्रदायांतले एक महान् सत्पुरुष श्रीरामकृष्ण यांनीं त्यांना मराठवाड्यांतील येहळे गांवच्या श्रीतुकारामचैतन्य या सिद्ध पुरुषाकडे



ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज

जन्म, शके १७६६
माघ शुद्ध द्वादशी

निर्वाण, शके १८३५
मार्गशीर्ष वद्य दशमी

जावयास सांगितलें व महाराज येहळे गांवीं सद्गुरूच्या शोधांत येऊन पोंचले.

पुसदच्या श्री. विठ्ठल किंकरांचे शिष्य चिन्मयानंद यांचें तुकारामचैतन्य हे शिष्य. त्यांच्या प्रेमळ पण विक्षिप्त वागणुकीनें लोक त्यांना तुकामाय म्हणून म्हणत. पण त्यांच्याकडे आलेल्या या शिष्याची प्रथम ते दादच घेईनात. " जयजयाजी चंद्रमौळी । माते कृपादृष्टीं न्याहाळी । मग पावेन नव्हाळी । ब्रह्मसुखाची ॥ तरी माझिये हृदयीं वसावें । प्रसुप्त वाचेतें चेववावे । जी स्वस्वरूप बोलवावे । मजकरवी।।" म्हणून त्यांच्या मागें मागें उन्हातान्हांत, शेताजंगलांत फिरणाऱ्या सत्‌शिष्याची तितिक्षा जणूं ते कसूं पाहात होते. कामनिक इच्छांनीं व्याप्त होऊन धनवान पुत्र, वा स्त्रीविषयक भिक्षा मागणारे अनेक श्रीमंत भिकारी त्यांनीं झिडकारले होते, पण फक्त ईश्वरी कृपाप्रसादाचीच भिक्षा मागणारे हें इवलेसें गोंडस पोर पाहून त्यांना मोठें कौतुक वाटलें. सांसारिक चिंतांच्या जंजालांत त्याच चिंता पुनः पुन्हा वाढवून मागणारे संसारी चार पावले लांब राहावे, त्यांची श्रद्धाच नाहींशी होऊन त्यांनीं आपणाकडे पुन्हां येऊं नये म्हणून तुकामाय या साऱ्यांना आपल्या वेडाचारांनीं संशयांत पाडून दूर पळवीत. पण खऱ्या साधकांची परीक्षा घेऊन, त्या कसोटीवर उतरणाऱ्यांना आपल्या कृपेचा अमृतवर्षाव अनुभवास आणीत. महाराज या साऱ्या कसोट्यांवर घासून घेऊन त्यांच्या पूर्ण कृपेस पात्र झाले. त्यांच्या डोक्यावर त्यांनीं वरद हस्त ठेवून त्यांचे जीवन कृतार्थ केलें. ईश्वरी प्रेमभक्तीच्या प्रसारार्थ त्यांना आज्ञापिलें. " काम क्रोधाचेनि विटाळे । जेयांचे चित्त ना मैळे । तयासि निरंतर सोहळे । ब्रह्मसुखाचे ॥ विषय सुखाचे डोहाळे । मनी नुपजती कव्हणिये वेळे । जेयाचे चित्त नुचंबळे । दुरूप विषादी ।। जे ब्रह्मानंदे डुळती । करौनि कांहींचि न करिती । जे दुराग्रहो न धरती । कव्हणीये विषयीं ।। करिती सत्कर्में कोडे । परि स्वस्वरूप स्थिती न मोडे ।

जेया स्वरूपानंदा वोसंडे । सर्वेंद्रियद्वारे ॥ ' या श्रीमुकुंदरायांच्या विवेकसिंधूंत दिलेल्या काव्यपंक्ती, जीवनांत उतरवण्याचा गुरूचा आदेश घेऊन महाराज पुनश्च भारतसंचारार्थ निघाले.

नैमिषारण्य, काशी, कलकत्ता इत्यादि पवित्र तीर्थस्थानांना भेटी देत ते इंदूरला आले. तिथल्या एका भाविक इनामदाराच्या मळ्यांत त्याच्या आग्रहानें त्यांनीं मुक्काम केला व अनेक पीडितांचें दुःख आपल्या प्रेमळ पण प्रभावी वाणीनें त्यांनीं दूर केलें. " बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजे । एका केशींराजे सकळसिद्धी ॥ " हें त्यांनीं लोकमानसांतल्या अहंकाराला आपल्या चतुर व स्वानुभवप्रेरित कोमलवाणीनें पटवलें. पण इनामदारांच्या पत्नी महाखाष्ट होत्या. त्यांनीं महाराजांकडे एकदां तिखटाचे सहा लाडू भोजनाकरतां पाठवले व महाराजांनीं तेहि पचवले. त्यानंतर जळत्या रसरशीत निखाऱ्यांचा नैवेद्य त्यांनीं महाराजांना ग्रहण करण्यास लावला. पण त्यांच्या त्या चमत्कारानें बाईची बुद्धि पालटली व ती त्यांची एकनिष्ठ भक्त बनली. त्यानंतर महाराज परत गोंदवल्याला आले. जटा, दाढी इत्यादि भार त्यांनीं उतरवून ठेवला. आतां त्याची जरूर नव्हती. साधनेच्या सुरुवातीला हीं बाह्यांगें साधकाला मार्गावर ठेवण्यास उपयोगी ठरतात. हीं बाह्य अंगें त्याला सतत भानावर ठेवतात; त्यानुरूप आचरण ठेवावें लागतें. पोहायला येईपर्यंतच भोपळा, जाखडी, दोर आवश्यक. सराईत पोहणाराला त्याची जरूर नसते. साधकाचे सिद्ध झालेल्या महाराजांनीं त्यामुळें या बाह्यांगांचा त्याग केला पण महाराजांना आपल्या अर्धांगीलाहि या मार्गांत प्रगत करावयाचें होतें. तीहि त्यांच्या या जीवनाशीं समरस झाली. येवढेंच नव्हें तर त्यांच्या सद्गुरूचें दर्शन घेऊन, तिनेंहि योगसाधना आरंभून जोगिणीचें जीवन स्वीकारलें व त्यांच्याबरोबर अनेक एकाकी परिभ्रमणें मोठ्या निष्ठेनें केलीं. शेवटीं देहासक्ति सोडून मोठ्या शांतपणें हरिस्मरण करीत तिनें देहत्याग केला.

महाराजांच्या पत्नीनें देह ठेवतांच त्यांच्या आईनें व इतर नातेवाईकांनीं पुन्हां त्यांच्या लग्नाचा घाट घातला. महाराजांच्या नकाराला ते दाद देईनात. शेवटीं महाराजांनीं त्यांना रुकार दिला. पण एके दिवशीं ते जवळच्या एका गांवांत गेले. तिथल्या एका सद्‌गृहस्थाची अंध कन्या, रूपहीन व व्यंगपूर्ण असल्यानें अविवाहित राहिली होती. त्या अभागिनी कन्येशीं त्यांनीं विवाह करून तिला डोळस करण्याचें ठरवलें. इतर डोळस पण आत्मदृष्टिहीन कन्यांपेक्षां त्यांना ही अंध पण आत्मानात्म विचार करणारी मुलगी पसंत पडली. त्यांचा द्वितीय विवाह झाला. पण या 'सरस्वती'ला त्यांनीं अध्यात्मसारस्वताची पंडिता बनवून तिचें नांव सार्थ केलें. १८७६ व १८९६ च्या भयानक दुष्काळांत जिकडे तिकडे हजारों माणसें किडा-मुंगीसारखी मेलीं. पण त्याचवेळीं दुष्काळानें पीडलेल्या माणवाळवंटांतील निराधारांना हा प्रेमनिर्झर आपल्या अमृतप्राशनाचा सतत लाभ देत होता. रामनाम घेत गोंदवल्यांत हजारों लोक येत. महाराजांच्या अन्नछत्रांत या रामनामाबरोबर त्यांना काम व भाकरी-आमटीचा प्रसाद मुक्त हस्तानें देण्यांत येत होता. महाराजांच्या अद्‌भुत शक्तीनें हा अन्नदानाचा कार्यक्रम दुष्काळ असेपर्यंत अखंडपणें चालू होता. हजारों माणसें आपल्या प्रेममय अमृतवाणीनें महाराजांनीं हरिप्रेमाला लावलीं. सकाळीं कामाला सुरुवातच हरिगजरानें होऊन माणसें त्या आनंदांत तल्लीन होऊन कामें करीत. दुपारचें भोजन होतांच त्यांना महाराजांच्या प्रेममय रसाळ वाणीनें नामाचा महिमा ऐकावयास मिळे. ते आपल्या भक्तांना सांगत :

"विकारांना आपण राबवावें, विकारांनीं आपल्याला राबवूं नये. राग करायचा तर तो गळ्याचें वर असावा. आंत सारे शांत असावें; जसा वरून उचंबळणारा सागर आंत शांत असतो."

"नाम घेऊन प्रापंचिक सुख मागणें म्हणजे कामधेनू मिळत

असतां गाढव मागण्यासारखें आहे. हिंगजिप्याचेच सारे ग्राहक. केशरकस्तुरी मागणारा विरळाच."

"नामाची गंमत अशी आहे कीं नामांत मनाला उलटें केलें जातें. मन हें नाम बनतें."

"पोटांत अन्नाची जरूर असतांना जर तोंडांतून अन्न जात नसेल तर नळीनें घालतात. तें लवकर पोटांत जातें. तसें भावनेच्या नळीनें नाम लवकर काम करतें."

"नाम हें आंतून व बाहेरून घेतां येतें. नामानें अंतःकरण शुद्ध होतें व तें शुद्ध झालें कीं प्रेम आपोआप येईल."

"आज भगवंत एका टोकाला व आपण दुसऱ्या टोकाला आहोंत पण नामाच्या खेचीनें त्याला जवळ आणावा. आपल्याला जितका देहाचा विसर पडेल तेवढा तो जवळ येईल. त्याच्या नामांतच संतसंग आहे."

"सूर्य हा प्रकाशतो म्हणजेच अंधार दूर करतो. तसें नाम भगवंताचें प्रेम वाढवतें व मग आपले दोष आपोआप दूर होतात.

"नाम घेतांना इतके रंगून जा कीं त्याचें पर्यवसान एकांतांत व्हावें. नाम घेणारा जो 'मी' त्या एकाचा अंत होणें म्हणजेच एकांत."

"बाईला मूल झालें कीं आपोआप ती प्रेमळ होते. तसें नाम मुखीं बसलें कीं सत्कर्में आपोआप हातून घडतात.

"साध्या रागाच्या शब्दांचा आपल्यावर परिणाम होतो. मग सर्वशक्तिमान हरिनामानें तो कां होणार नाहीं ?"

"असलें तर असूं दे, नसलें तर नसूं दे यालाच अनासक्ति म्हणतात."

"राजगिरा व दाणे एकत्र मिसळले तर दाणे सोपे म्हणून ते निवडावे म्हणजे राजगिरा आपोआप वेगळा होतो. तसें नाम निवडून घ्यावें म्हणजे विषय वगळले जातीलच."

" भगवंत भक्तांचीं संकटें दूर करतो म्हणजे त्यांना ती सहन करण्याची शक्ति देतो. "

" खरी आई मुलाचाहि अफूकरतां हट्ट पुरवणार नाहीं; तसेंच संत विषयाचा हट्ट पुरा करीत नाहींत. "

" माझ्या गांवीं पैसा पिकत नाहीं पण भक्ति मात्र पिकते. "

विपत्तीनें गांजलेले लोक या त्यांच्या नामामृतानें पुन्हां पुन्हां पुलकित होत. ईश्वरावरची विपत्तीनें खचणारी श्रद्धा त्यांना पुनः प्राप्त होई. नेहमींप्रमाणेंच दुष्काळाची ही भयानक आपत्ति निवारण करण्यास सरकारी प्रयत्न अपुरे ठरले होते. निराधारांना महाराजांचाच मोठा आधार झाला होता. महाराजांच्या या दानशूरत्वाची, या साधुत्वाची कीर्ति दूरवर गेली. बड्या सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांचा सन्मान केलाच पण लोकमान्य टिळकांसारखे, वासुदेव बळवंतासारखे थोर थोर देशभक्तहि त्यांना आपली आदरांजलि वाहून गेले. महाराजांच्या नैमिषारण्यसंचारांत शेवटच्या नानासाहेब पेशव्यांनींहि त्यांच्यापासून समाधान मिळवलें. राज्यश्रीनें वंचित झालेल्या, आपत्तींनें गांजलेल्या, त्या विजनवासी राजपुरुषाला त्यांनीं आपल्या मधुर वाणीनें ईश्वरी प्रेमाकडे वळवलें व भाग्यलक्ष्मीनें पाठ फिरवली तरी ईश्वरीप्रेमानें जीवनविकास व समाधान यांचा लाभ होतो याचा पाठ त्यांना दिला.

या महान् दुष्काळाचे संकटानंतर त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई फार आजारी पडल्या. पण जगण्याची त्यांची इच्छा पाहून, महाराजांनीं त्यांना जगण्याचा उपाय म्हणून आपले सारे घरदार लोकांकडून लुटण्यास व निस्संग होण्यास सांगितलें. त्यांनीं संमति देतांच घरचा सारा संग्रह लुटवून महाराज व सरस्वतीबाई पूर्ण निस्संग झाल्या. माझें म्हणायला, ममत्वाला कांहींच राहिलें नाहीं. महाराजांच्या जन्मजात वैराग्याचा परिपोष त्यांच्या पत्नीनेंहि स्वतःच्या

अनुक्रम ३८५५८........ विः ....निबंध
क्रमांक ....१५३८........ नों दि: १८-१२-८४



वर्तनानें केला. दोघेहि खरेखुरे संन्यासी बनले. महाराजांचा कीर्ति-सुगंध दूरवरपर्यंत दरवळत होता. हजारो, दूरवरचे निरनिराळ्या प्रांतांचे, भाषांचे, विद्वान् अविद्वान् गरीब श्रीमंत लोक गोंदवल्याला येऊन महाराजांच्या मधुर पवित्र वाणीनें पावन होत, जीवन विशुद्ध करण्याचा संकल्प सोडीत व ईश्वरी प्रेमांत तल्लीन होत.

महाराज शेदोनशें भक्तांना घेऊन भारतयात्रा करण्यास निघाले. मार्गांत महाराजांच्या प्रेममधुर उपदेशाचा लाभ या भक्तांना सतत होऊन "अलं व्रतैः अलं तीर्थैः अलं योगैरलं मखैः। अलं ज्ञानकथालापैर्भक्तिरेकैव मुक्तिदा–" व्रत, तीर्थ योग, याग, ज्ञान अशा अनेक साधनांपेक्षां एक भक्तीच मुक्तिदायक आहे हें महाराज सोदाहरण पटवून देत- " भवद्विधा भागवताः तीर्थभूताः स्वयं विभो। तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि स्वान्तस्थेन गदाभृता ।।–" आपल्या सारखे भगवन्ताचे आवडते भक्तच तीर्थस्वरूपच असतात. अंतस्थ भगवद्द्वारा आपणच तीर्थांना महातीर्थ बनवतो हें त्यांना पटवून देत. त्यांचीं रोज रसाळ कीर्तनें भजनें ऐकून सारे लोक त्या महानंदांत बुचकळ्या घेत. अशी ही यात्रा फिरत फिरत प्रयागला आली. तिथें नावेंतून हे सारे लोक वेणीदान व इतर धार्मिक विधी करण्याकरतां निघाले. प्रयागला त्रिवेणीसंगमाच्या ठिकाणीं प्रवाह अनेक वेळां बदलत असतो. वाळूचे थरांचें ढीग पाण्यांत उभे राहातात व कांहीं ठिकाणीं डोह उत्पन्न होतात. ही यात्रेकरू मंडळी बसलेली ती नाव अशाच एका वाळूच्या ढिगाऱ्यावर घसरली व नावेच्या तळाला भोक पडून नांवेंत पाणी येऊं लागले. तेवढ्यांत नाव खोल प्रवाहांत शिरली व वाहूं लागली. नावाड्यांचें पाणी उपसण्याचें प्रयत्न व्यर्थ ठरले व तेहि हताश होऊन कपाळाला हात लावून बसले. सारे यात्रेकरू हा प्रकार पाहून रडूं, ओरडूं, पळूं लागले. एकटे महाराज धीरगंभीर मुद्रेनें हा सारा प्रकार पाहात होते त्यांनीं लोकांना धीर दिला व ईश्वराचें नाम-संकीर्तन करण्यास सुरुवात केली. जवळच्या किनाऱ्यावर धांवाधांव

सुरु झाली. लोकांचा आरडाओरडा, धांवपळ, यांनीं किनारा दुमदुमला. या दोनशें हतभागी लोकांबद्दल सारे हळहळत होते. किल्यांतल्या लष्करी गोऱ्या सोजीरांनीं प्रवाहांत नावा सोडण्याचें हुकूम किनाऱ्यावरच्या नावाड्यांना दिल्यानें ते हळूहळू नावेकडे येऊं लागले. इकडे महाराजांनीं रडणाऱ्या घाबरलेल्या लोकांना "रघुपति राघव राजाराम, पतीतपावन सीताराम" च्या भजनांत गुंगवले व ज्या ठिकाणीं नावेला भोक पडलें होतें. तिथे आपला फेटा खोचून, त्यावर आपला पाय देऊन ते लोकांना भजन सांगत होते. अखेर सारे उतारू सुखरूपपणें दुसऱ्या नावांत बसले व सर्वांच्या शेवटीं महाराज नावेच्या भोकावरचा पाय काढून दुसऱ्या नावेंत आले. त्यांचा पाय निघतांच, नावेंत पाणी भरले व गिरक्या खात ती पाहातां पाहातां तळाला गेली. किनाऱ्यावर हा अद्‌भुत प्रकार पाहाणाऱ्यांनीं महाराजांच्या जयजयकारानें आसमंत निनादून सोडला. या संकटांतून सुखरूपपणें पार पाडणाऱ्या महाराजांबद्दल त्यांची कृतज्ञताबुद्धि प्रकट करण्याकरतां वांचलेल्या लोकांनीं नामसप्ताह साजरा करून साऱ्या प्रयागवासीयांना जेवण दिलें. महाराजांच्या कृपेनें "म्हणौनि सद्‌गुरूचे पाऊले। जेहि धरली साच बळें। तेचि पैल पारू पावले। भवसागराचिये॥" हा अनुभव आपणांस नक्की येईल म्हणून ते त्यांच्या चरणीं अधिकच एकनिष्ठ झाले. 'जे संसारासीं वेगळे। ज्ञान वैराग्येसीं आगळे। ब्रह्मरसें आनंदले। ते सद्‌गुरु जाणावें॥' अशा महाराजांबद्दल त्यांचा भक्तिभाव पुष्ट झाला. यात्रेचें ईप्सित फल त्यांना मिळालें.

यानंतर पंढरी आदि यात्रा करून महाराज गोंदवल्याला परतले, गोंदवल्याचें आकाश 'नामघोषाच्या गौरवानें' दुमदुमूं लागलें. पण महाराज आतां आपण देह ठेवणार म्हणून भक्तांना सांगूं लागले. 'देहबुद्धि नाहीशीं झाल्याशिवाय गुरुसेवा घडत नाहीं; पण गुरूंच्या सेवेंत देह झिजवल्याशिवाय देहबुद्धि नष्ट होत नाहीं' असे ते म्हणत.

आपल्या देहावर आसक्ति ठेवूं नका; हा देह काळाचें खाणें असल्यानें आज उद्यां पडणारच म्हणून सावध व्हा. रूप हें भगवंताची जड खूण आहे ती नाहीशी होते. पण नाम सूक्ष्म खूण आहे. ती जडाच्या नाशानंतरहि टिकते. राम गेले, कृष्ण गेले; पण नाम मात्र अमर राहिलें. म्हणून रामापेक्षां त्याच्या नामानेंच अधिक तरले हें लक्षांत ठेवा. गोंदवल्याला "हाट भरला परमार्थाचा" असें झालें पण हा बाजार आतां आयुष्याच्या सायंकाळीं उठला तरी त्यांत खरेदी केलेला 'नामा' चा माल घरोघर जाईल व त्याचा सारे उपभोग घेऊं शकतील.

महाराजांची वास्तविक स्थिति मुकुंदरायांनीं वर्णन केल्याप्रमाणें जीवन्मुक्ताची असल्यानें त्यांना शरीरत्यागाचें सुखदुःख नव्हतें. मुकुंदराज आपल्या विवेकसिंधूत सांगतात,

**"ते देह जितांचि सुटले । म्हणोनि जीवन्मुक्त बोलिले ।**
**परब्रह्मचि झाले । सच्चितानंद ॥"**

ते पुढें सांगतात, जसा वनांत लागलेला वणवा सारे तृणकाष्ठ नष्ट करतो, तसा जीवन्मुक्त ज्ञानाग्नीनें संसार अंतर्बाह्य जाळून टाकतात. एखादें वस्त्र जळलें तरी त्याच्या राखेचें रूप वस्त्रासारखेंच दिसतें पण त्याचा उपयोग करतां येत नाहीं. तसाच या मुक्त पुरुषांचा देह जरी दिसत असला तरी तो आत्मबुद्धीला फांसा घालूं शकत नाहीं. परिस आणि सामान्य दगड रूपानें सारखे असले तरी परिस तो परिस अन् दगड तो दगड. भुजाण्यानें भाजलेले बीज बाह्यांगानें सारखे दिसले तरीहि पेरणीला त्याचा उपयोग नाहीं; तसे सत्पुरुषाच्या क्रिया सामान्य जनांसारख्या वाटल्या तरी त्यानें ते लिप्त झालेले नसतात. त्यांचें इंद्रियव्यापार, उपदेश देणें इत्यादि कृत्येंहि त्यांना संसारासक्त करीत नाहींत. धनुष्यांतून सुटलेला तीर जसा लक्ष्याचा भंग करूनहि वेग संपेपर्यंत धांवतच असतो, अथवा कुंभाराचें चाक

त्यावरील मडकें काढून घेतलें तरी फिरत राहातें, त्याप्रमाणें सत्पुरुष पूर्वकर्मानें प्राप्त झालेलें शरीर हरिभजनांत राबवीत ठेवून, सारी कर्मे देहपाताच्या समयापर्यंत करीत राहातात. शेवटीं या देहत्रयाचाहि नाश करून ते सायुज्य मुक्तीला प्राप्त होतात. महाराजहि या अवस्थेंत वर्णन केलेले सत्पुरुष असल्यानें अखेरपर्यंत सदाचार व ईश्वरीप्रेम यांचा प्रसार करीत राहिले. शेवटच्या दिवशींहि रात्रीं २ वाजेपर्यंत आजारी असतांहि त्यांनीं मोठें रसाळ कीर्तन श्रीराममंदिरांत करून हजारो श्रोत्यांना भक्तिप्रेमाच्या अमृतगंगेंत अखंड स्नान घातलें. "रामनाम वाचे बोला। आत्मसुखामाजी डोला। जेथें नाम तेथें माझें प्राण। सांभाळा ही खूण॥" म्हणून श्रोत्यांना शेवटची त्यांनीं विनंती केली. त्यानंतर पहांटे ५ पर्यंत ते समाधीअवस्थेंत राहिले. पहांटेच्या अमृतघटिकेस २२ डिसेंबर १९१३ ला त्यांनीं आपली आत्मज्योत अनंतांत विलीन केली. त्यानंतरहि त्यांचा चेहरा अत्यंत शांत, मुद्रा अतिशय तेजस्वी, टवटवीत व प्रसन्न होती. मृत्यूचें कोणतेंच चिन्ह त्यांच्या देहावर नव्हतें. गोंदवल्यावर प्रेमामृताचा, भक्तीचा वर्षाव करणारा हा "अमृतस्य पुत्र" अमृताच्या महासागरांत एकरूप झाला व गोंदवले गांव व सारे भक्तगण उघडे पडले.

गोंदवल्याच्या द्वारावरच महाराजांचें सुशोभित सुंदर मंदिर, आजूबाजूला फुलवलेल्या बागेच्या हरितरम्य भूमीवर मोठें उठून दिसतें. दूरवर पसरलेल्या रुक्ष, शुष्क अशा माण वाळवंटाच्या विशाल प्रदेशाच्या प्रवेशद्वाराशीं धों धों वहाणारा प्रेमामृताचा हा निर्झर पक्षांच्या गोड किलबिलाटांत आपल्याशीं मधुमय वाणीनें बोलतो, "या बरं बाळ, या याऽ हं,! राम कर्ता आहे आहे हें लक्षांत ठेवा. अनुसंधानांत राहा. या बरं बाळ या."

●●●

## २ : शिखर शिंगणापूरचा नित्यश्री नित्यमंगलम्

एखाद्या विस्तीर्ण स्मशानभूमीवर, जिकडेतिकडे चितांची राख सोसाटवाऱ्यानं इतःस्ततः पसरली जाऊन, सारी स्मशान-भूमीच त्यानं आच्छादावी; मधेंच नुकत्याच विझलेल्या चितांचे मोठमोठे ढिगारे उंचावलेले असावे; जिकडे पहावें तिकडे, इतर सारे हरित, श्याम, रक्त, पीत वर्ण म्लान होऊन एका राखाडीच्या रंगाशिवाय कांहीं दिसूंच नये; म्हणजे माणसाच्या मनावर वैराग्याचा, संसाराच्या क्षणभंगुरतेचा एकच एक ठसा उमटतो, आंतली मानवी सुकोमल भावनांची हरित सृष्टीहि कोमेजून जाते. बाहेर दिसणारी, दरक्षणीं वाढणारी स्तब्धता, भीषण शांतता यांचे पडसाद अंतःसृष्टीवर पडून, मनाची सारी स्पंदनें, सारी कार्यशक्ति विसर्जित होऊन, तिथेहि तीच स्मशान–शांतता, वैराग्याची अतीव स्तब्धता नांदूं लागते. शिखर शिंगणापूरच्या परिसरांत येतांच माणसाला ही नवी अनुभूति प्राप्त होते. सुदूरपर्यंत पसरलेल्या माणदेशाच्या बरड, नापीक, सपाट, राखी रंगाच्या भूमीवर, मधेंच एकटे एक उभे असलेले, निष्पर्ण, वृक्षलता–तृणांकुरविहीन असें शिंगणापूरचें शिखर

त्याला स्मशानवासी शिवाची आठवण तीव्रपणें करून देते. तोहि असाच आहे. स्मशानांत अखंड क्रीडेंत रमणारा, भयानक भूत-पिशाच्चगणांसह वावरणारा, मदनाच्या कामुक सुंदरतेचा जणुं वैरी असलेला, नरमुंडांची माळ घालून, भिक्षेकरतां नरकपाल हातीं घेतलेला, अमांगल्याबद्दल प्रसिद्ध असूनहि, त्याचें स्मरण करणाऱ्या भक्तांना परममंगल व वरद होणारा, असा भगवान शंकरच आपल्या साऱ्या ऐश्वर्यासह या भव्य शिखराच्या रूपानें जणुं आपल्यापुढें साक्षात साकार झाला आहे, असें वाटतें. शिंगणापूरचा एकाकी डोंगर लांबूनच, सारे आप्तस्वकीय सोडून धगधगीत वैराग्याचा स्वीकार करून, साऱ्या अंगाला भस्म फांसून, जटांची पेंडाळी धारण करून, विजनवासांत एकाकी रमणाऱ्या एखाद्या प्रखर बैराग्यासारखा वाटतो. शिंगणापूरचा डोंगर वर चढतांना, तिथली काळपट राखाडी रंगाची डोंगरश्रेणी, निष्पर्णतेमुळें निस्पंद असलेली सृष्टि व रणरणणाऱ्या उन्हांत धूलिभस्माचे उठणारे प्रचंड लोट यांमुळें या प्रखर बैराग्याच्या जवळ आपण गेलो तर न जाणो, हा विजनवासीय गोसावी आपल्या लालसर डोळ्यांनीं आपल्याकडे तीव्र दृष्टिक्षेप टाकून या भस्ममय शीलाराशींत आपलीहि भर टाकील कीं काय असा भयप्रद संभ्रम मनाला होतो. पण शिंगणापूरचा सारा विरागी रस्ता पार करून आपण वर जातांच, आपल्या मनाची ही भयाकुल अवस्था, तिथल्या रम्य, पवित्र, कलाकौशल्यानें नटलेल्या, डौलदार मंदिराच्या दर्शनानें पार पळून जाते.

**“ कंठे यस्य विराजते हि गरलं शीर्षे च मंदाकिनी ।**
**वामांके गिरिजाननं कटितटे शार्दूलचर्माम्बरम् ।**
**माया यस्य रुणाद्धि विश्वमखिलं तस्मै नमः शंभवे ।**
**जंबूवत्, जलबिंदुवत्, जलजवत्, जम्बालवत्, जालवत् ॥”**

ज्याच्या कंठातले विष जांभळासारखे, डोक्यावरील गंगा बिंदूस्रोतवत्, डाव्या हाताची गिरिजा एखाद्या सुंदर कमलाप्रमाणें,

कमरेचें व्याघ्राजिन शेवाळ्याप्रमाणें व त्याच्या मायेचा पसारा एखाद्या जाळ्यासारखा सर्वदूर पसरलेला आहे अशा, पण अमंगल स्थानांत वास करणाऱ्या शिवाच्या या प्रसन्न रूपाला पाहून सारा शीण विसरून प्रसन्नतेनें नम्र होतो. ' **अमांगल्यं शीलं** ' असा हा अशिव वाटलेला शिव खरोखरच ' वरद, परम मंगल ' असा आहे हें मनोमन पटतें.

साधारणपणें आपल्याकडे रुसण्याफुगण्याचा अधिकार स्त्रियांना बहाल केलेला आहे. स्त्रियांचा हा हक्क पुरुष वर्गानेंहि अजिबात त्याज्य ठरवलेला नाहीं. सौम्य स्त्रीरागाला रुसणें म्हणतात पण तोच प्रकार पुरुषांनीं केला म्हणजे स्त्रीवर्ग त्याला डोक्यांत राख घालणें असें म्हणतो. म्हणजे स्त्रिया रागावल्या तरी आंतील रागानें त्यांच्या बुद्धीचा स्फुल्लिंग विझून राख होत नाहीं. पण पुरुषांच्या बुद्धीचें प्रखर निखारे विझून त्याची अगदीं राख होते असा स्त्रीवर्गाचा अनुभव असल्यास न कळे. पण माणदेशांत, रागावलेले किंवा पत्नीच्या रागावर डोक्यांत राख घालणारे पुरुष स्थायिक होण्याची परंपराच आहे. पंढरीला रुक्मिणीवर रागावून, डोक्यांत राख घालून, कमरेवर हात देऊन युगानुयुगें ताठरलेला पांडुरंग, इतकीं वर्षें जाऊनहि, रुक्मिणी समजूत घालायला मागें येऊन उभी राहिली तरी ' नाहीं मी बोलत ' चा ताठा अजून सोडायला तयार नाहीं. या डोक्यांत राख घालण्याच्या वैष्णवी संवयीचें, त्याचेंच चिंतन करणाऱ्या शिवाला तरी विस्मरण कसें व्हावें ! त्यानें आपल्या या ध्यानमूर्तीचेंच अनुकरण केलें व तोहि डोक्यांत राख घालून गौरीच्या रागावर इथें येऊन बसला.

' मांगीशमहात्म्य ' सांगते, एकदां कैलासावर गौरी-हर सारीपाटाचा खेळ खेळत होते. आत्मानंदांतच मग्न असलेल्या शिवाला आपल्याच महामायेचा हा मनोरंजनाचा कार्यक्रम पसंत नसला तरी

त्याला स्मशानवासी शिवाची आठवण तीव्रपणें करून देते. तोहि असाच आहे. स्मशानांत अखंड क्रीडेंत रमणारा, भयानक भूत-पिशाच्चगणांसह वावरणारा, मदनाच्या कामुक सुंदरतेचा जणुं वैरी असलेला, नरमुंडांची माळ घालून, भिक्षेकरतां नरकपाल हातीं घेतलेला, अमांगल्याबद्दल प्रसिद्ध असूनहि, त्याचें स्मरण करणाऱ्या भक्तांना परममंगल व वरद होणारा, असा भगवान शंकरच आपल्या साऱ्या ऐश्वर्यासह या भव्य शिखराच्या रूपानें जणुं आपल्यापुढें साक्षात साकार झाला आहे, असें वाटतें. शिंगणापूरचा एकाकी डोंगर लांबूनच, सारे आप्तस्वकीय सोडून धगधगीत वैराग्याचा स्वीकार करून, साऱ्या अंगाला भस्म फांसून, जटांची पेंडाळी धारण करून, विजनवासांत एकाकी रमणाऱ्या एखाद्या प्रखर बैराग्यासारखा वाटतो. शिंगणापूरचा डोंगर वर चढतांना, तिथली काळपट राखाडी रंगाची डोंगरश्रेणी, निष्पर्णतेमुळें निस्पंद असलेली सृष्टि व रणरणणाऱ्या उन्हांत धूलिभस्माचे उठणारे प्रचंड लोट यांमुळें या प्रखर बैराग्याच्या जवळ आपण गेलो तर न जाणो, हा विजनवासीय गोसावी आपल्या लालसर डोळ्यांनीं आपल्याकडे तीव्र दृष्टिक्षेप टाकून या भस्ममय शीलाराशींत आपलीहि भर टाकील कीं काय असा भयप्रद संभ्रम मनाला होतो. पण शिंगणापूरचा सारा विरागी रस्ता पार करून आपण वर जातांच, आपल्या मनाची ही भयाकुल अवस्था, तिथल्या रम्य, पवित्र, कलाकौशल्यानें नटलेल्या, डौलदार मंदिराच्या दर्शनानें पार पळून जाते.

" कंठे यस्य विराजते हि गरलं शीर्षे च मंदाकिनी ।  
वामांके गिरिजाननं कटितटे शार्दूलचर्माम्बरम् ।  
माया यस्य रुणाद्धि विश्वमखिलं तस्मै नमः शंभवे ।  
जंबूवत्, जलबिंदुवत्, जलजवत्, जम्बालवत्, जालवत् ।। "

ज्याच्या कंठातले विष जांभळासारखे, डोक्यावरील गंगा बिंदूस्रोतवत्, डाव्या हाताची गिरिजा एखाद्या सुंदर कमलाप्रमाणें,

कमरेचें व्याघ्राजिन शेवाळ्याप्रमाणें व त्याच्या मायेचा पसारा एखाद्या जाळ्यासारखा सर्वदूर पसरलेला आहे अशा, पण अमंगल स्थानांत वास करणाऱ्या शिवाच्या या प्रसन्न रूपाला पाहून सारा शीण विसरून प्रसन्नतेनें नम्र होतो. ' **अमांगल्यं शीलं** ' असा हा अशिव वाटलेला शिव खरोखरच ' वरद, परम मंगल ' असा आहे हें मनोमन पटतें.

साधारणपणें आपल्याकडे रुसण्याफुगण्याचा अधिकार स्त्रियांना बहाल केलेला आहे. स्त्रियांचा हा हक्क पुरुष वर्गानेंहि अजिबात त्याज्य ठरवलेला नाहीं. सौम्य स्त्रीरागाला रुसणें म्हणतात पण तोच प्रकार पुरुषांनीं केला म्हणजे स्त्रीवर्ग त्याला डोक्यांत राख घालणें असें म्हणतो. म्हणजे स्त्रिया रागावल्या तरी आंतील रागानें त्यांच्या बुद्धीचा स्फुल्लिंग विझून राख होत नाहीं. पण पुरुषांच्या बुद्धीचें प्रखर निखारे विझून त्याची अगदीं राख होते असा स्त्रीवर्गाचा अनुभव असल्यास न कळे. पण माणदेशांत, रागावलेले किंवा पत्नीच्या रागावर डोक्यांत राख घालणारे पुरुष स्थायिक होण्याची परंपराच आहे. पंढरीला रुक्मिणीवर रागावून, डोक्यांत राख घालून, कमरेवर हात देऊन युगानुयुगें ताठरलेला पांडुरंग, इतकीं वर्षें जाऊनहि, रुक्मिणी समजूत घालायला मागें येऊन उभी राहिली तरी ' नाहीं मी बोलत ' चा ताठा अजून सोडायला तयार नाहीं. या डोक्यांत राख घालण्याच्या वैष्णवी संवयीचें, त्याचेंच चिंतन करणाऱ्या शिवाला तरी विस्मरण कसें व्हावें ! त्यानें आपल्या या ध्यानमूर्तीचेंच अनुकरण केलें व तोहि डोक्यांत राख घालून गौरीच्या रागावर इथें येऊन बसला.

' मांगीशमहात्म्य ' सांगते, एकदां कैलासावर गौरी-हर सारीपाटाचा खेळ खेळत होते. आत्मानंदांतच मग्न असलेल्या शिवाला आपल्याच महामायेचा हा मनोरंजनाचा कार्यक्रम पसंत नसला तरी

खेळणें भाग होतें. खेळाकडे लक्ष नसल्यानें महादेव सारीपाटांत सारखे हरतच गेले. आधींच सवतीमत्सरानें फुणफुणणाऱ्या पार्वतीला महादेवांची ही हार आनंदाच्या उकळ्या फोडीत होती; त्यांत शेवटचा डाव तिनें जिंकतांच तिला, सर्व साधारण स्त्रियांना वाटतें त्याप्रमाणें आपल्या नवऱ्याचा नेहमीचाच बावळटपणा पाहून अनावर हंसूं लोटलें. इतकें कीं महादेवाचा राग अनावर झाला. डोक्यांत राख घालून तो तडक शिंगणापूरच्या निर्जन शिखरावर एकटाच येऊन गुहेंत अदृष्य होऊन बसला. आतां गौरीचें हास्य लोपलें होतें. त्याची जागा नवऱ्याच्या चिंतेनें घेतली. तीहि मग शिवाचा शोध करीत करीत शिंगणापूरच्या शिखरावर पोंचली. एका गुहेच्या बाहेर डोकावणाऱ्या जटा पाहून तिनें महादेवाचें स्थान हेरलें व मग तीहि नवऱ्याची समजूत घालीत इथेंच राहिली. पण महादेव गुप्त लिंगाच्या रूपानें गुप्त असल्यानें त्यांचा राग घालवून त्यांना प्रकट होण्यास भाग पाडणें आवश्यक होतें. त्यामुळें ती अपर्णा तुळजापूरला तपस्या करायला गेली. त्या हिमालयकन्येचें हिमगौर मुख तपस्येच्या तापानें म्लान झालें. शरीर कृश झालें. तिच्या तपस्येच्या सामर्थ्यानें तिच्या मदतीला इतर देवहि धांवले. सारे देव पंढरीच्या पांडुरंगाला शरण गेले. तेव्हां त्यांनीं शंकर 'कुतूहल' पर्वतावर असल्याचें सांगितलें. त्याच 'कुतूहल' पर्वताचे दुसरें नांव 'कोथलाचल' असेंहि आहे. शंकराच्या उग्र रागानें पर्वतावरील सारी हरित सृष्टि करपून गेली होती. सारा पर्वत त्यांच्या रागाच्या दाहानें काळसर, राखाडी रंगाचा बनला होता. पण पार्वतीच्या तपस्येनें गौरीवराचें मुख पुन्हां प्रसन्न झालें. गौरीचें म्लान मुखकमल पाहून त्यांना आपल्या क्रोधातिशयाचें दुःख झालें. पार्वतीच्या प्रेमानें नेत्रांतले खदिरांगार विझून, त्यांतून प्रेमाचें ओघळ वाहूं लागले. त्या ठिकाणची सृष्टि हरितरम्य झाली. निर्मळ पाण्याचें स्रोत डोंगराच्या कडेकपारींतून धों धों वाहूं लागले ते आजतागायत. शिव-पार्वतीच्या या नव्या रूपांत, त्यांचा

विवाहोत्सवाचा वाढदिवस मग चैत्र शुद्ध अष्टमी ते पौर्णिमेपर्यंत मोठ्या थाटामाटानें साजरा करण्यांत आला व तो आजतागायत करण्याची पद्धत चालू असून त्याला उभ्या भारतांतले मराठे व इतर लोक मोठ्या हौसेनें येतात. गौरीशंकराच्या भक्तीनें भारतांतल्या साऱ्या पवित्र नद्यांच्या जलाच्या कावडी ते दरवर्षी पाठवतात. पद्म-पुराण—केदारमहात्म्यांत एक्यांशी सिद्धस्थानांत याला मानाचें स्थान देण्यांत आलें आहे.

असा हा श्रुतिस्मृतिपुराणोक्त महादेव इतिहासकालांतहि सुप्रसिद्ध राहिला. स्वतःच्या निशाणावर, आपल्या पराक्रमाचे, धैर्याचे, शक्तीचें प्रतीक म्हणून "वराह" चिन्ह मिरविणाऱ्या राष्ट्रकूट राजांनीं इथलें मूळचें स्थान आपल्या स्थापत्यकलेनें शोभायमान केलें. त्यांच्या स्थापत्य शास्त्रांतल्या डुक्करमुसंडीचें अवशेष आजच्या मंदिराच्या पायाच्या दगडांत इतरत्र 'वराह' रूपानें अजून आढ-ळतात. इ. स. १२३० मध्यें पन्हाळ्याच्या राष्ट्रकूटांचा पराभव देवगिरीच्या पराक्रमी सिंघणदेव यादवानें केला व मग येथें येऊन जीर्ण झालेलें मंदिर विस्तारून व तिथें 'सिंघणापूर' हें आपल्या नांवचें गांव वसवून त्यानें आपली स्मृति कायम राखली. येवढेंच नव्हे तर "**श्री शंकरं च अमृतेशं, गुप्तं, बिल्वं च बाणकं । उदितं भैरवं, स्तंभं, गौरीहर उदुंबरं**" अशीहि इतर शिवमंदिरें यादवकालीन सुंदर स्थापत्याचें नमुने म्हणून बांधून दिली. या राज-पुरुषाचे कोड इथल्या अमृतेश्वर कुंडाच्या पाण्यानें अचानक नाहींसें झाल्यानें, त्यानें अमृतेश्वर कुंड उत्तम बांधून काढलें व तुंगभद्रेपासून ते नर्मदेपर्यंतचें सारे मराठे सरदार दरबार या महादेवाला आपले कुलदैवत मानूं लागले. राजस्थानांतला एकलिंगजी शिंगणापूररूपानें त्यांचें दैवत बनला. राकाटक वंशातलें राजपुरुषहि इ. स. ४ थ्या शतकांत इथें येत असत व भोजराजा व कालीदास या महान् साहित्य सम्राटांनींहि आपल्या भक्तिप्रेमाचा अभिषेक काव्यरूपानें या देवावर

केल्याचें दंतकथा सांगते. सिंघणदेव यादव तर प्रत्येक सहा मैलाला एक शिवालय व पुष्करणी बांधीत आपल्या विजयाची स्मारकें देवगिरीपर्यंत ठेवीत गेला असें समजतें.

विजापूर दरबारांत इथल्या पुजारी बडव्यांची अनेक भांडणें भांडलीं गेलीं व त्यांचें न्यायनिवाडे अजून पहायला मिळतात. शिवछत्रपतींचें आजे मालोजीराव भोसले यांनीं इथें शिवतीर्थ म्हणून तलाव बांधलेला आहे. फलटणच्या जगपाळराव निंबाळकरांची बहिण मालोजीला दिली असल्यानें मालोजीचे सिंगणापूरच्या एकलिंगजीकडें नेहमीं येणें असें. त्यांच वेळीं येथें पंचीकरणावर–कर्णहंस ग्रंथ लिहिणाऱ्या शांतलिंगप्पा या महान साधूंचें वास्तव्य होतें. त्यांचा आशीर्वाद घेणें या राजकीय उलाढाली करणाऱ्या अस्थिर जीवनाच्या राजकारण्यांना आवश्यक वाटत असे. रामदास पंचायतनांतल्या जयरामस्वामी वडगांवकरांच्या कृष्णस्वामी या गुरूचें शांतलिंगप्पा हे गुरु. त्यांच्या मठाचें स्थान येथें पहावयास मिळतें.

आपल्या वाडवडिलांची ही परंपरा शहाजी, शिवाजी, संभाजी अशी पुढेंहि छत्रपती घराण्यानें चालवली. बजाजी निंबाळकरांचें शुद्धीकरण करून त्याला इथेंच पुन्हा हिंदुधर्माची दीक्षा देण्यांत आली. या साऱ्यांची इथल्या देवतेवर येवढी भक्ति होती कीं शहाजी, शिवाजी व संभाजींनी आपल्या अंगावर शंभू महादेवाचें निर्माल्य रोज येऊन पडावें म्हणून तीन शिवलिंगें व त्यावर तीन मंदिरें स्थापन करून, देवाचा निर्माल्य रोज आपल्या या प्रतीकांवर पडेल अशी केलेली व्यवस्था आजतागायत चालू आहे. संभाजीनें दक्षिण बाजूस तळ्याचें घाट बांधून दिले आहेत.

शंकराच्या या पवित्र स्थानाकडे राजकारणी पुरुषांचें सतत लक्ष होतें. छत्रपती शाहूचा एकनिष्ठ सेवक वसंतराव खोजे यानें आपल्या धन्याच्या इच्छेप्रमाणें आपलें सारें धन खर्चीं टाकून इथल्या शंभुमहादेवाच्या मुख्य मंदिराचा जीर्णोद्धार केला व आजचें सुंदर

मंदिर व त्यांतले पितळेच्या पत्र्यानें मढवलेले पांच भव्य नंदी त्याच्या भक्तिभावनेची साक्ष देतात. मलवडीचें घाडगेराजे व म्हसवडचे राजेमाने यांनीं इथली यात्रा सुरू केली. साध्वी अहिल्याबाईचें लक्ष न जातें तरच नवल. तिनें यात्रेकरूंकरतां साखरबावी ही गोडमधुर पाण्याची विहीर बांधली व जुन्या मंदिराचा हेमाडपंती देवालयें उठवून जर्णोद्धार केला.

राजकारणी सत्ताधीशांप्रमाणेंच या स्थानावर संतमंडळींचेंहि प्रेम होतें. तुकाराम महाराजांनीं महादेवाला कावडीचें अभंग वाहिले, तर रामदास स्वामींनीं "सोरटीचा देव माणदेशीं आला, भक्तीचिया काजा पावावया" म्हणून याचे कौतुक केलें. महिपतबुवा, दामोदरस्वामी, योगीराजस्वामी इत्यादि योगीबैरागी लोकांचें मठ व समाध्या व त्यांचें वर्षभर निरनिराळे साजरे होणारे पुण्यतिथी उत्सव इथले त्यांचें वास्तव्य दर्शवते. अलिकडल्या काळांतहि फलटणचें सुप्रसिद्ध साधुपुरुष हरीबुवा हे कांहीं दिवस इथेंच होते. इथल्या शिवालयाच्या मुख्य लिंगाखालीं एक प्रचंड भुयार आहे. त्याला बकुळीचें भुयार म्हणतात. या भुयारांत मशालहि हवेच्या कमतरतेनें टिकत नाहीं. पण हरीबुवा या गुहेंत तीन महिने वास्तव्य करीत होते. तीन महिन्यांनीं ते तिथून बाहेर पडलें तेव्हां मृत म्हणून मानलेल्या या महापुरुषाचें विलक्षण सामर्थ्य पाहून सारे बडवे चकित झाले.

चैत्रशुद्ध द्वादशीला "प्रभात काळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी" ही भूपाळी आपल्या गोड गळ्यानें म्हणून हजारों कावडी साऱ्या महाराष्ट्रांतून व जिथें मराठी भाषेचे मानकरी मान मिळवत आले, त्या साऱ्या भारतभरच्या भूभागांतून इथें येऊन, शंभु महादेवाला आपल्या भक्तीनें अभिषेक करतांत. मुंगी घाटाच्या अवघड चढणीवरून येणारी सासवडचे भूतोजीबुवा तेली यांची शेवटची कावड शंभूमहादेवानें स्वीकारली कीं इथला सारा सोहळा समाप्त होतो. या चैत्रांतील महोत्सवाशिवाय आषाढ, श्रावण सोमवार, अश्विनी

नवरात्र, कार्तिकांतलीं वैकुंठ चतुर्दशी, पौषांतली अलंकारपूजा व देव–पारध देवांनीं केलेल्या शिकारीचा सोहळा व महाशिवरात्र इत्यादि अनेक उत्सव साजरे करून भक्तमंडळी आपल्या भक्तीची तैलधारा अखंडपणें शंभु महादेवाच्या चरणीं वहात असतात.

इथले बसवंतराव खोजांनीं बांधलेलें मंदिर एखाद्या कोरीव लेण्यापेक्षांहि अधिक कला कौशल्यानें नटलेलें आहे. मराठा–क्षत्रीय वृत्तीच्या लोकांचें हें कुलदैवत असल्यानें मंदिराच्या कोरीव कामांत रानडुक्कर, वाघ यांच्या बाण, बंदुका, तरवारीनीं केलेल्या शिकारीची अनेक सुबक चित्रें इथें कोरलेलीं दिसतात. अश्लीलतेलाहि त्यांत भरपूर जागा दिली आहे. इथल्या या मुख्य मंदिराच्या भव्य वास्तूजवळच अनेक सुबक मंदिरें, तलाव, घाट व पुष्करिणींचे जाळें पसरलें आहे. या उंच पर्वताच्या माथ्यावर उभे राहिलें कीं जवळ पासचा शे-पन्नास मैलांतला माणदेशाचा सपाट रखरखीत भूभाग आपल्या डोळ्यांपुढें उभा रहातो. जीवनांत असाच रखरखीतपणाचा पसारा पहाणाऱ्या माणसाला, या माणदेशाच्या मध्यावर उभा राहिलेला हा आशुतोष महादेव जीवनांतला रखरखीतपणा दूर करायला मदत करतो. माणदेशाची माणसें अशीच काळीसांवळी, दिसायला जरा उग्र, थोराड वाटतात. पण थोड्याशा परिचयांत त्या उग्र, असुंदर रूपाखालीं असणारे उदार, अल्प संतोषी दिलदार हृदय पाहिलें, कीं ज्या आशुतोष महादेवाची ते उपासना करतात त्या–जर रागावला तर क्षणांत सारे भस्मसात करणाऱ्या, पण प्रसन्नतेंत स्वतःचें आत्मलिंगहि प्रदान करणाऱ्या–शिवाची भक्ति त्यांच्या रूपानें जणु साकार झाल्यासारखें वाटते. इथला भूभागहि त्याच स्वभावाचा आहे. आपल्या तापटपणानें इथल्या भूभागाला साऱ्या हरित सृष्टीचें, सस्य शामलत्वेचें भस्म करायला जसा वेळ लागत नाहीं, तसाच तो भूभाग येवढयाशा चार पावसाच्या थेंबानींहि त्वरित अपार प्रसन्न होतो व मग दहा वर्षांत जें पीक येणार नाहीं

तें वर्षांत मिळून " घेतां किती घेशिल दो करानें " अशी भूमि-
भक्ताची अवस्था होते. शिवाच्या या वृत्तीला भाळून त्याच्याकडे आलेल्या लोभी इंद्राला एकदां विकटतुंड नांवाच्या शिवगणानें असा तडाखा दिला कीं धांवत जाऊन त्यानें शिवाची पुढील प्रार्थना केली–

**" व्रजेम भवदंतिकम्, प्रकृतिमेत्य पैशाचिकीम् ।**
**किमित्यमरसंपदा, प्रमथनाथ नाथामहे ।**
**भवद्भवनदेहली विकटतुंड दंडाहती ।**
**त्रुटन् मुगुट कोटिभिः मघवदादिभिर्भूयते ॥**

" हे कैलासनाथ, एखादें पिशाच्च होऊन कां होईना, पण मी तुमचा दास होऊं इच्छितो. कारण माझ्या सारख्या स्वर्गाच्या सम्राटाची सारी संपत्ति, सारी सत्ता, सारे वैभव तुझ्या देवडीवरच्या विकटतुंडा-सारख्या एका यःकश्चित् शिपायानें मातीमोल केलें. माझ्या सारख्या सर्वसत्ताधीशाच्या रत्नजडित मुगुटाचें तुझा एक सामान्य दास कोटी कोटी तुकडे करून टाकूं शकतो, येवढा त्याच्या भक्तीचा प्रताप आहे." जिथे इंद्राची ही प्रार्थना आहे, तिथे आपल्यासारख्या सामान्यांची काय कथा ? त्यामुळें शिंगणापूरच्या या शंभु महादेवाला आमच्या-सारख्यानें नम्रतापूर्वक येवढेंच म्हटलें पाहिजे कीं,—

**जगन्नाथ मन्नाथ गौरी–सनाथ ।**
**प्रपन्नानुकंपिन् विपन्नार्तिहारिन् ॥**
**महःस्तोम–मूर्ते समस्तैकबंधो ।**
**नमस्ते नमस्ते, पुनस्ते नमोऽस्तु ॥**

तूं जगाचा नाथ आहेस, अर्थात माझाहि नाथ आहेस. पार्वतीचा पति व शरणागतावर कृपा करणारा असा तूं आहेस. संकटांत सांपडलेल्यांचें दुःख दूर करणारा, तेजस्वी यज्ञाची मूर्ति, अखिल जनांचा बंधू असा तूं आहेस. मी तुला पुनः पुनः नम्रतेनें नमस्कार करतो. याशिवाय तुला देण्यासारखें मजजवळ काय आहे ?

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३६५५८ ......... दि:

३ :

# कुळकजाई येथील कुरंगविलोल नयनांतील अश्रुसंपात

आपल्या लाडक्या, गुणी कन्येच्या अतीव दुःखानें तिचें विशाल विलोल नेत्र मिटलेले आहेत. त्या नेत्रांच्या दोन कडांतून दुःखातिशयानें वाहून गेलेल्या अश्रूंच्या महापुरानें कपोलांवर ठिक-ठिकाणीं अश्रुजलाचें मळकट डाग पडले आहेत. मिटलेल्या, दुःखानें भरभरून येणाऱ्या नेत्रांच्या कडांतून अवचित् एखाद दुसरा अश्रुबिंदु अजूनहि ठिबकत आहे. ज्या नेत्रांतून प्रसन्न उल्हासाचें चांदणें विखुरलें जायचें, पुष्पसुगंध उधळायचा, तेच नेत्र आंतल्या दुःखाच्या कढांनीं आंत आंत खेचले गेले आहेत. ज्या कपोलांवर संध्यारागाचे कोमल रंग सदोदित उमलायचे, तेच कपोल निस्तेज, विकल झाले आहेत. मस्तकावरच्या लांबसडक कुंतलसंभाराच्या क्रीडेनें जिथें सौंदर्याचा आविष्कार व्हावा,त्याच कुंतलांच्या स्नेहशून्य,विस्कटलेल्या, पिंजारलेल्या पसाऱ्यानें त्या अतिम्लान झालेल्या मुखकमलाला आण-खीच कोमेजून टाकलें आहे. आंत दडलेल्या, प्रस्फुटित न होणाऱ्या

दुःखाच्या कढांनीं हृदयांतल्या हालाहलाच्या उकळीसरशी बाहेर पडणाऱ्या उष्ण निश्वासांनीं सारी सजल, सुकोमल सौंदर्यसृष्टीहि करपून टाकली आहे. मानवी जीवन म्हणजे असंख्य, विविध आणि परस्परविरोधी अशा अनुभवांचा सागरच. त्या सागराच्या सुख-दुःखरूप संघर्षमय मंथनांतून बाहेर पडलेलें कोणतें हालाहल **कुळकजाई** मातेच्या नशिबीं आल्यानें ती इतकी विव्हल, इतकी उदास—दुःखी झाली असावी ? इतकें कोणतें तीव्रतम दुःख झालें कीं, माणदेशाची सारी भूमि, सारी सृष्टि तिच्या अतीव दुःखानं उदास, खिन्न झाली ? सारी माणदेशी प्रजा काळवंडली, सृष्टीचीं सारीं स्पंदनें स्फुंदनरूप, उष्ण निश्वासरूप झालीं ? या मातेच्या असीम दुःखाकडे पाहूनच कीं काय साऱ्या हरित वृक्षांनीं आपली सुंदर, हरित वेषभूषा सोडून निष्पर्णता अंगिकारली, कुसुमांनीं देहत्याग केला, हरिणशावकांनीं दुर्वांकुरांच्या करपण्यानें आपलें जीवन व्यर्थ ठरवलें. सारी सृष्टि एका शोकाच्या गडद काळ्या रंगानें माखून गेली. असें कोणतें असह्य दुःख बाणगंगा व माणगंगांना जन्म देणाऱ्या कुळकजाईच्या द्रोणाकार पर्वत-नेत्रांना झालें आहे कीं त्या दुःखाचा विसर अजूनहि या भूमातेला पडूं शकत नाहीं ? स्वतःच्या कन्येचें अपार वियोग-दुःख अजून तिला जाळीत आहे काय ? भूमिकन्या जानकीमुळें मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाच्या मुखांतून निघालेले ते आर्त उद्‌गार—

**हा हा देवि स्फुटति हृदयं स्रंसते देहबंधः ।**
**शून्यं मन्ये जगदविरलज्वालमन्तर्ज्वलामि ॥**
**सीदन्नन्धे तमसि विधुरो मज्जतीवान्तरात्मा ।**
**विश्वङ्मोहः स्थगयति कथं मन्दभाग्यः करोमि ॥**

—हे देवी, हृदय फुटतें आहे, देहबंधन गळतें आहे, ज्याच्याभोंवतीं शोकाची दाट ज्वाला भडकली आहे असें हें जग जळून खाक होत आहे. माझें हृदय होरपळून निघालें आहे. दाट काळोखांत मी सीतेच्या वियोगानें व्याकूळ होऊन उदास बसलों आहे.

माझें अंतर शोकसागरांत बुडत आहे. वैदेहीच्या दुःखानें माझे हातपाय बसले आहेत. मी अभागी काय करूं ?

— अजून रामरायाची ती शोकविव्हल वाणी या भूमातेच्या कर्णविवरांत दुमदुमून राहिल्यानें ती अजून आंतल्या आंत अनावर शोकानें मुसमुसत आहे असें, माणदेशांतल्या दहीवडी-बुध रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या शिखराला द्रोणाकार होऊन माणगंगा व बाणगंगा हे दोन अश्रुबिंदु ढाळणाऱ्या कुळकजाईच्या पर्वतश्रेणीकडे पाहून माणसाला वाटतें नि तो उदास व खिन्न होतो. पुरातन कालांत घडलेल्या त्या उदात्ततम पण शोकपर्यवसायी जीवननाट्याचा अद्‌भुत पण परममंगल ठसा कुळकजाईच्या डोंगरावर येतांच विशेषत्वानें उमटतो. जीवनांतल्या साऱ्या मर्यादा ज्यानें अमर्यादपणें पाळल्या, आपल्या उदात्त व अतिभव्य जीवनाचा ठसा साऱ्या भारतभूमीवर ज्यानें अखेरपर्यंत, दुःखातिशयाच्या ज्वालेंत जळूनच कायमचा ठेवला, त्या मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्राच्या जीवनसुगंधानें उजळून निघालेला, त्या भव्य नाट्याचा साक्षी असा हा पवित्र भूभाग आहे. इथें परम सुकोमल, सौंदर्यसंपन्न, सीतारामांच्या पवित्र प्रेमाचा द्वंद्वप्रसंग कायमचा समाप्त झाला. एका प्रेमळ दंपतीच्या प्रीतीच्या तेजस्वी नाट्याचें भरतवाक्य इथें गायिलें जाऊन अमर झालें. इथला कणन्‌कण, इथले सारे श्वास–निश्वास, इथलें सारें जड–चेतन जणुं सीता–राममय झाल्यानें अतीव पवित्र अतीव तेजस्वी, अतीव सौंदर्यसाक्षात्कारी झालें आहे. देहाचे, मनाचे, चैतन्याचे सारे बंध तटातट जो तोडूं शकेल त्यालाच ‘ अंदर राम, बाहिर राम, जँह देखो तँह रामहि राम ’ या गुरुकृपा अंजनानें मिळालेल्या लाभाचा अपार आनंद लुटतां येईल; सीता-राममय होतां येईल.

माझ्यावर माझ्या आईचें अनंत उपकार आहेत. माझ्या लहानपणींच तिनें माझ्यावर अनेक उत्तम संस्कार केले. जणुं पुढें मी ज्या

विरोधी वातावरणांत दुर्दैवाच्या फेऱ्यांत हिंडणार होतो, त्यांतून माझी जीवननौका सुखरूप पार पडावी, माझे आचारविचार शुद्ध रहावे, माझ्यासमोर ध्येयाचा ध्रुवतारा अचल राहून त्याच्या दिशेनेंच मी आपली जीवननौका हांकारावी, याकरतांच जणुं तिनें मला भगवान् श्रीरामचंद्राचे तारक नाम व चरित्र सांगितलें. त्या बाल वयांत माझ्या मनावर त्याचा इतका खोल ठसा उमटला कीं, आज माझ्या प्रेमळ, भावमंगल मातेला जाऊन अनेक वर्षें होऊनहि तिच्या गोड, भावनाविव्हल गीतांचे—ओव्यांचे आवाज माझ्या कानांत अजून दुमदुमत असतात. ते मधुर स्वर ऐकतां ऐकतां नकळत माझे डोळे सद्भावनांच्या,कृतज्ञतेच्या आवेगानें धळधळ वाहूं लागतात. आईची ती वात्सल्यमय मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर तरळते. रामरायावरचें प्रेम व निष्ठा देऊन तिनें जणुं मला त्याच्या पायावर घातलें. अनेक संकटांत ते पायच मला तारक झाले, माझी जीवननिष्ठा टिकवायला उपयोगी पडले. रामचंद्राची ती धीरगंभीर मूर्ति कृतनिश्चयानें सागराच्या तीरीं धनुष्य घेऊन जोडण्याच्या तयारींत आहे व लक्ष्मणाला करड्या आवाजांत म्हणते आहे कीं—लक्ष्मणा आतां माझा निश्चय ऐक :

**अद्य मे तरणंवाथ मरणं सागरस्य वा ।**
**समुद्रं शोषयिष्यामि पद्भ्यां यान्तु प्लवंगमा : ॥**

—आतां सागर तरी ओलांडीन, सागराचा सर्वनाश करून सुकवून टाकीन व वानरांना पायानें जाण्याची वाट करून देईन.

—रामचंद्र असें म्हणत असतांनाचा एक अतिशय सुंदर फोटो आमच्या घरांत लावलेला होता. त्या फोटोकडे पहात रामाच्या अद्भुत चरित्राचे आईनें दिलेले पाठ मी मनांत कितीतरी वेळां घोळले असतील. आज ती आई व तो फोटो माझ्याजवळ नाहीं. पण तिनें दिलेले ते सुसंस्कार व रामरायाची ती धीरगंभीर मूर्ति अजूनहि मला धीर देत असते; जीवन सुसंस्कारित ठेवण्याची प्रेरणा देत असते.

संसार ही एक फार भयानक गोष्ट आहे. त्याला समुद्राची उपमा देतात. समुद्रांत पहावें तिकडे पाणीचपाणी दिसते, तसा संसार सर्वत्र भरून राहिला आहे. जागृति, स्वप्न, सुषुप्ति या साऱ्यांत तो आम्हांला सोडत नाहीं. त्या संसाराच्या काळज्या, चिंता, आधी–व्याधी–उपाधींनीं मनुष्य हैराण होतो. संसाराचा त्याग करण्याकरतां जंगलांत गेलों तरी तो आपल्याला सोडत नाहीं. तिथेंहि लंगोटीच्या रूपानें तो उभा राहतो. कारण तो देहाला, मनाला इतका चिकटलेला आहे कीं, त्यांतून आम्ही सुटूं म्हटलें तरी तो सुटत नाहीं. ज्ञानदेव म्हणतात, '**जो जो किंजे तरणोपावो । तो तो होय अपावो ।**' हा मायेचा महासागर तरून जाण्याचा जो जो प्रयत्न करावा तो तो तरण्याचा उपाय न ठरतां बुडण्याचेंच साधन ठरत आहे. संसाराची घडी बसली म्हणायच्या आंतच ती विस्कटण्याचें काम सुरू झालेलें असतें. मग मनुष्य भांबावतो. ज्या संसाराचा गाडा चालविण्याकरतां जीवनभर अनंत लांड्यालबाड्या केल्या, अनेकांचे शिव्याशाप घेतले, तत्त्वनिष्ठा गुंडाळली व व्यवहाराच्या नांवावर 'जें नको तें केलें' त्या संसाराचा आयुष्यभरचा जमाखर्च पाहिला तर एकूण जमेच्या बाजूला हीण भाग दिसतो व सारें अस्सल खर्चीं पडलेलें दिसतें. येवढा सारा प्रपंच करूनहि प्रपंचाला स्थैर्य देणाऱ्या बाबींची शिल्लक शून्य निघते. जीवनभर ज्याच्या नांवें सारें चांगलें खर्चीं घातलें त्याची ही वासलात लागलेली पाहून मनुष्य निराश,कष्टी होतो. त्याचें जीवन दुःखमय व जगणें विषमय होतें. तो मग कुठेंतरी आश्रय शोधूं लागतो. कुठेंतरी ध्येयाचा, निष्ठेचा ध्रुवतारा शोधूं लागतो. समाधान मिळवूं इच्छितो. अशावेळीं त्याला मग ज्यांनीं आपलें जीवन आपल्या ध्येयनिष्ठेनें उजळलें, त्याकरितां अनंत हालअपेष्टा सोसूनहि ज्यांनीं आपल्या ध्रुवताऱ्यावरची अचल दृष्टि विचलित होऊं दिली नाहीं, त्यांची आठवण होते. संसारांत सुख व दुःख कोणालाच चुकलेलें नाहीं. पण मनुष्य दुःखाला, संकटालाच घाबरत असतो व

तें अचूकपणें आपलें घर नेमकें हुडकून काढतें असा अनुभव येतो. तत्त्वनिष्ठाहीन जिणें जगूनहि तें टळत नाहीं. उलट साऱ्या निष्ठा गुंडाळून ठेवल्यामुळें, अनिवार आसक्ति बोकांडी बसून अनिवार दुःख मात्र निर्माण होतें. त्यामुळेंच ज्यांनीं निष्ठावान् जीवन जगून दुःखें सोसलीं, शांतपणानें, धीरगंभीरपणानें विचलित न होतां जे अचल राहिले, त्यांच्याबद्दल आदरभाव वाटतो. आपलें जीवन त्यांच्याप्रमाणें दुःखमय असलें तरी निदान त्यांच्याप्रमाणेंच उज्ज्वल, पवित्र, सुंदर, आदर्शमय करावें अशी आंस मनाला लागते.

भारताच्या भाग्यानें असे हिमालयासारखे उत्तुंग, आदर्श पुरुषोत्तम अनादि कालापासून तों आजतागायत या भरतभूमींत निपजले आहेत. त्यांच्या आदर्शाच्या धूपानें व त्याच्या सुगंधानें अनेकांचीं जीवनें उजळलीं, फुललीं, विकसलीं. भारताच्या भूमींत त्यांच्या जीवनाच्या रोपट्याचें सुंदर, डेरेदार वृक्षांत रूपांतर होऊन अनेक सुमधुर फळें त्याला लटकलीं. त्यांचा स्वाद भारतीय मनांत दरवळत राहिला. स्थितप्रज्ञ पुरुषाचा आदर्श, गीतामाउलीच्या मुखांतून मधुरपणें सांगणाऱ्या श्रीकृष्णानें सर्व यादवकुलाचाहि, सर्व संपत्तीसह सर्वनाश त्याच स्थितप्रज्ञतेनें करवून घेतला. त्या सर्वनाशक संहारांतून त्यानें आपल्या आप्तस्वकीयांना, स्वतःच्या पुत्रपौत्रांनाच काय, पण स्वतःलाहि वगळलें नाहीं. जीवनांतील सारें वैभव, सारीं सुखें ज्या अनासक्त बुद्धीनें त्यानें स्वीकारलीं, त्याच अनासक्त बुद्धीनें त्यानें हिमालयासारख्या दुःखाचा कडेलोटहि स्वीकारला. आदर्श पुरुषोत्तमांच्या या मालिकेंत राम-कृष्णरूपीं गेंदेदार गुच्छ उठावदारपणें मनांत भरतात. कृष्णाच्या वांट्याला उत्तरार्ध सोडला तर अनेक सुखमय प्रसंग तरी आले. पण श्रीरामाचें जीवन म्हणजे जणुं अखंड दुःख भोगण्याकरतांच होतें. अनेक नवससायासांनीं झालेल्या या युवराजाला कोडकौतुक होण्याच्या बालवयांतच, विश्वामित्रासह यज्ञरक्षणार्थ जातांना जणुं या तितिक्षेचा '**सहनं सर्व**

**दुःखानाम् अप्रतीकारपूर्वकम्** ' हा गृहपाठ ज्ञात करून घ्यावा लागला नि तो त्याला जीवनाच्या शेवटपर्यंत पुरला. पुढें देहांतच विदेही वृत्तीनें राहणाऱ्या, एक पाय पराच्या गादीवर ठेवून त्याच वेळीं दुसरा पाय तेवढ्याच विदेही वृत्तीनें अग्निज्वालेंत ठेवणाऱ्या जनकाशीं श्रीरामानें जांवयाचें नातें जोडलें. त्या विदेही पित्याच्या संस्कारांनीं घडविलेल्या वैदेहीनें त्याला आपल्या सुकुमार हातांनीं जेव्हां पुष्पमाला घातली असेल त्यावेळीं दोन्ही पाय केवळ शोकाच्या ज्वालेंत सहकुटुंब ठेवूनहि आपल्या पित्याप्रमाणेंच अनासक्त राहूंया, जीवनांत आपल्या वांट्याला आलेला विषाचा प्याला अमृतमय मानूंया असेंच सुचविलें असेल काय ? रघुकुलाच्या ' **त्यागाय संभृतार्थानाम्** ' या वृत्तीनेंच माझा स्वीकार कर म्हणून विनयानें हळूंच सुचविलें असेल काय ? लग्नाच्या वेळींच सात पावलें न चालतां, जानकीनें वियोगांतहि, दुःखांतहि, जानकीजीवनाची साथ अखंडपणें अनाक्रोश केली.

राज्याभिषेकाचा मंगल कलश भरण्याच्या आंतच कैकेयीनें मत्सरानें रामाला राज्यलक्ष्मीपासून दूर केलें. ऐन आनंदाच्या वेळीं हा विषाचा प्याला त्या युगुलानें शांतपणें प्राशन केला. त्यांत कटुता, विषाद यांचा भावहि मुखावर उमटूं न देतां, कौसल्येबद्दल वाटणाऱ्या प्रेमानेंच कैकेयीचा निरोप घेतला. दुःखानें मूर्च्छित होऊन हतप्रभ झालेल्या दशरथाची समजूत घातली. राम वनांत जायला निघाले तेव्हां लक्ष्मणानें बरोबर जाण्याचा हट्ट धरला. तो म्हणाला, ' रामा, तुम्ही मला उत्कृष्ट राजनीति सांगत आहां, पण मला ती आचरणांत आणतां येणार नाहीं. तुमचें काम मी कसा करूं शकेन ? हंस पक्षी का मेरुमंदाराचा भार उचलील ? रामा, तुझ्या प्रेमावर मी पोसलों आहे. मासा ज्याप्रमाणें पाण्याशिवाय राहूं शकत नाहीं त्याप्रमाणें रामाशिवाय लक्ष्मणाचें जीवन व्यर्थ आहे. ' अखेरपर्यंत लक्ष्मण छायेसारखा रामाच्या मागें उभा होता. रामाचीं सारीं अवघड कामें त्यानें केलीं. रामाच्या यशाची धवल पताका फडकत

ठेवणारी जणुं काठीच ! यश रामाचें, कीर्ति रामाची, पण त्याचा कणा मात्र लक्ष्मण. भरताचीहि तशीच अपार भक्ति. रामाच्या वनवासांत त्यानें रामापासून दूर राहून राममय जीवन व्यतीत केलें.

राज्याचा त्याग करतांना रामाला दुःख झालें नाहीं. उलट गोदावरीच्या तीरावर सीता-लक्ष्मणासह उपभोगलेला आनंदाचा काळ म्हणजे सारे ऋतु रमणीय वाटणारा असा गेला. जंगलहि सीता–लक्ष्मणासह मंगल झालें. पण रामासारख्या दूरदृष्टि पुरुषालाहि भवितव्यतेनें **'बुद्धिः कर्मानुसारिणी'** हें पटवलें. नाहीं तर कांचन-मृगासारखा मायावी पशू त्याला फसवता ना !

या आनंदाचा शेवट होतांच त्याचें हृदय शतधा विदीर्ण झालें. वाघ, लांडगे इत्यादि हिंस्र पशूंपासून निर्भय झालेलीं हरणें, राक्षसांपासून सुटलेले व निर्भयतेनें धर्मकार्य करणारे सारे ऋषीजन, आर्य रामभद्राचें तें दुःखोन्मत्त डोळे पाहून दूर गेले असतील. ' सीते सीते ' अशा आर्द्र करुण हांकांनीं सारी वनराजी दुःखानें काळवंडली असेल. गोदामाईचें तरल जल पशुपक्षांच्या दुःखाश्रूंनीं कषाय बनलें असेल. तृणांकुरांनासुद्धां रामाच्या त्या आर्त वाणीनें थरकांप सुटला असेल. रामाच्या सीतेवरील प्रेमानें डंवरलेले पर्वतदुर्ग निश्चल झाले असतील. रामाच्या सीतेवरच्या अपार प्रेमाचें वर्णन त्याच्याच तोंडून ऐकावें :

**अजनि प्रतिदिनमेषा कर्दमशोषा मदंगसंगेन ।**
**प्रतिदिनमपुरि पंपा मदश्रुसंपातिभिः सलिलैः ॥**

—माझ्या आंत जळणाऱ्या विरहाच्या अग्नीनें सारें पंपा सरोवर सुकून आंतला चिखल उघडा पडे. नंतर माझ्या अनिवार अश्रुपातानें सारें पंपा सरोवर भरून जाई.

—रामाच्या अपार शोकानें सारी गोदातीरची भूमीहि अशीच काळवंडून गेली.

आपल्या पत्नीच्या दुःखानें रामाला वर पाहणेंहि कष्टमय झालें.

लक्ष्मणाच्या ‘ रामा, तुम्ही एकसारखे समोर शून्य दृष्टि करून का पाहतां ?’ या प्रश्नाला उत्तर देतांना तो म्हणतो—

**इयं श्वश्रूर्धात्री, कुलपतिः अयं मे दिनकरः ।**
**रघूणां वंशेऽस्मिन् क्वचिदपि न कांताऽपहरणम् ।।**
**इदं जातं स्मृत्वा मयि कुलकलंकोत्थितधियः ।**
**न चाधो चोर्ध्वं वा नयति मुखचंद्रं रघुपतिः ।।**

—मी खालीं पाहीन तर सीतेची माता पृथ्वी मला सीतेबद्दल विचारील. रघुकुलाचा आदिपूर्वज सूर्य वर तळपतो आहे म्हणून त्याच्या प्रश्नाच्या शंकेनें मी वर पाहूं शकत नाहीं. कारण ज्याची लाडकी पत्नीहि हरण केली गेली असा माझ्यासारखा कुलकलंक साऱ्या रघुकुलांत कुणी झालाच नाहीं.

रामाकडे ज्यावेळीं मानवांतून झालेला महामानव म्हणून आम्ही पाहतों, त्यावेळीं त्याच्या दुःखाचा, भावनेच्या उद्रेगाचा वेग आपल्याला भासतो. रामाच्या अपार करुणेचा रस आपल्याला जाणवतो. **‘राम त्वन्नाम महिमा, वर्ण्यिते केन वा कथं, यत् प्रभावात् अहं राम ब्रह्मर्षित्वम् अवातपवाम्** ’ हें सांगणाऱ्या ब्रह्मर्षिपासून तों वानरांपर्यंत रामाचें अत्यंत कनवाळू वागणें आपण ओळखूं शकतो.

**यान्ति न्यायप्रवृत्तस्य तिर्यंचोऽपि सहाय्यताम् ।**
**अवंथानंतु गच्छंतं सोदरोऽपि विमुंचति ।।**

—न्यायपथानें वागणाऱ्याला अस्वल व माकडें देखील सहाय्य करतात, अन्यायानें वागणाऱ्या रावणासारख्या महापराक्रमी पुरुषाला बिभीषणासारखे भाऊहि सोडतात.

—या रामरावणयुद्धाच्या तात्पर्यानंतर धवलशीला सीतेनें मेघश्याम रामासह इतर अनेकांच्यापुढें अग्निदिव्य केलें.

**यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात् ।**
**तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः ।।**

—जर माझें हृदय रामाशिवाय कुठें जात नसेल, तर अग्निदेव

अनुक्रम 36५५८ ........ दि: ..................
क्रमांक .................. नों दि १६-९१-६६


सर्वांच्यासमोर माझें रक्षण करो !

—असें म्हणून तिनें अग्निदिव्य केलें व सर्वांची खात्री पटवली. रावणाच्या कैदेंत **'राहुग्रस्त निशापतेरिव कला लावण्यहीनप्रभा'** अशी राहूनें ग्रासलेल्या चंद्राप्रमाणें कलाहीन झालेली सीतामाई पुन्हा रामाला प्राप्त झाली.

या चौदा वर्षांच्या दुःखमय प्रवासानंतरचें हें मधुर मीलन, दीर्घ तापत्रयानंतरचा हा अमृतवर्षाव किती रम्य व मधुमय वाटला असेल ! आपल्या निर्दोष पत्नीवर कोसळलेली संकटपरंपरा, तिच्यावर झालेले घोर अन्याय, जिला घराबाहेरचा उंबरठा माहीत नाहीं त्या सुकोमलेला चालावी लागलेली खडतर वाट, ठेचाळून ठेचाळून तिच्या आरक्त पदकमलांतुन वाहिलेलें रक्त, या साऱ्या कटुतम आठवणी विसरायला लावायला प्रेमाचे मुग्ध आलापच समर्थ होते. सीता-रामांचें पुष्पक विमान अयोध्येकडे परत जायला लागलें. मागच्या साऱ्या रम्य आठवणी काढतां काढतां रात्र रात्र अपुरी पडत होती. एक एक स्थळ, त्या ठिकाणीं दोघांनीं घालवलेले ते रम्य दिवस, घडलेले विविध प्रसंग, यांवर बोलतां बोलतां परस्परानुरक्त युगुलाला काय बोलावें नि काय नको असें व्हावें यांत काय नवल ? त्या दुःखानंतर, त्या वादळानंतर अवतरलेली शांति, निसर्गाची रम्यता, अद्‌भुतता नि प्रसन्नता कोण वर्णन करूं शकेल !

शरद् ऋतु सुरू झाला आहे. ठिकठिकाणीं जलनिधी निर्मळ होऊन प्रसन्नतेनें हंसत आहेत. निळ्या आकाशांत शुभ्रधवल बगळ्यांच्या रांगा पिकलेल्या साळीच्या शेतावरून क्रँव क्रँव नाद उमटवीत फिरत आहेत. मंदमधु वाहणारा समीर वहात आहे. विमल तेजानें पृथ्वीला शांतदांत करणारा पौर्णिमेचा चंद्र उगवला आहे. निराशेचा सारा वर्षा ऋतु संपला आहे. सारें सारें ' रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा ' झालें आहे. पत्नीच्या अपार सोशि-

कतेनें अधिकच प्रेममय बनलेला श्रीराम पत्नीला अयोध्येकडे नेत आहे. कविसम्राट कालिदासाची सरस्वती अखंड स्रवते आहे–

**क्वचित्प्रभालेपिभिरिन्द्रनीलैर्मुक्तामयी यष्टिरिवानुविद्धा ।**
**अन्यत्र माला सितपंकजानाम् इन्दीवरैरुत्खचितान्तरेव ॥**
**क्वचित् खगानां प्रियमानसानाम् कादंबसंसर्गवतीव पंक्तिः ।**
**अन्यत्र कालागरुदत्तपत्रा भक्तिर्भुवश्चंदनकल्पितेव ॥**
**क्वचित्प्रभा चांद्रमसी तमोभिः छायाविलीनैः शबलीकृतेव ।**
**अन्यत्र शुभ्रा शरदभ्रलेखा रन्ध्रेष्विवालक्ष्यनभः प्रदेशा ॥**
**क्वचित् कृष्णोरगभूषणेव भस्मांग रागा तनुरीश्वरस्य ।**
**पश्यानवद्यांगि ! विभाति गंगा भिन्न प्रवाहा यमुनातरंगैः ॥**

–हे धवलशीले जानकी, या गंगेच्या प्रवाहांत यमुनेचें तरंग घुसून त्याला कसे खंडित करीत आहेत तें पहा ! कुठें असें भासतें कीं, जणुं मोत्यांच्या माळेंत ओवलेले इंद्रनीलमणी त्यांच्या प्रभेला निस्तेज करून टाकीत आहेत. कोठें असें वाटतें कीं, जणुं श्वेतकमलांच्या हारांत नीलकमलें गुंफिलीं आहेत. कोठें मानस सरोवराकडे जाणाऱ्या शुभ्र हंसांबरोबर काळे कादंब पक्षी उडत आहेत असें वाटतें, तर कोठें शुभ्र चंदनानें सारवलेल्या भूमीवर कृष्णागरूचीं चित्रें काढलीं आहेत असें दिसतें. कोठें चंद्राच्या प्रभेबरोबर छायेंत झोंपलेल्या अंधःकाराची क्रीडा चालली आहे, तर कोठें जणु शरद ऋतूंतील शुभ्र मेघांच्या पाठीमागून आकाश थोडें थोडें दिसत आहे आणि कोठें असें दिसतें कीं, जणुं काय महादेवानें आपल्या भस्मचर्चित देहावर कृष्णसर्पांचीं आभूषणें धारण केलीं आहेत.

किती रम्य दृश्य ! वर पुष्पक विमानांत बसून मेघश्याम रघुवीर व धवलशीला जानकी चौदा वर्षांच्या अपार कष्टमय जीवनानंतर अयोध्येस पोंचण्यास आतुर झालीं आहेत; आणि खालीं इन्दीवर-शामा कालिंदी व सुधाजला जान्हवी एकमेकींना प्रेमालिंगन देऊन सागराकडे आतुरतेनें पळत आहेत. हें दृश्य पाहून काव्याच्या फांदी-

वर बसलेले अनेक वाल्मीकी, कालिदास, भर्तृहरि काव्याचा कोकिल-रव काढीत कूं ऽ हुं–कूं ऽ हुं गात असतील; त्यांच्या अमृतकाव्याचे तुषार उधळीत असतील.

पण रामाच्या या धवल कीर्तीचें, सीतेच्या पावित्र्याचें लोक-मानसाला काय? लोकांचीं मलिन वस्त्रें धुतां धुतां मलिनमानस झालेल्या एका सामान्य धोब्यानें, आपलें मलिनता काढून टाकण्याचें अमल काम सोडून, रागाच्या भरांत सीतेच्या–असलेच्या–शीला-वरच मालिन्याचे डाग पाडले. पुरुषोत्तम रामानें आपल्या शीलाला जागून कठोर निर्णय घेतला. लक्ष्मणावर आपल्या प्रियदर्शिनी पत्नीला अरण्यांत सोडण्याचें कटुतम कर्तव्य सोंपवलें. ज्या जानकीला–

**त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं ।**
**त्वं कौमुदी नयनयोः अमृतं त्वमंगे ।।**
**इत्यादिभिः प्रियशतैः अनुरुध्य मुग्धाम् ।**
**तामेव शान्तमथवा किमिहोत्तरेण ।।**

–तूं माझें जीवन आहेस, माझें जणुं दुसरें हृदयच आहेस, तूंच माझा चंद्रमा, तूंच माझ्या नयनांचें अमृत आहेस, अशा शत मधुर वचनांनीं त्या मुग्धेला ऋजु हृदयाच्या रामानें गोंजारलें तें हृदय सीतेच्या त्यागाला कसें तयार झालें? लक्ष्मणाच्या अशा आक्षेपांना कर्तव्यकठोर रघुवीर एकच उत्तर देऊं शकला–

**अवैमि चैनामनघेति किन्तु लोकापवादो बलवान्मतो मे ।**
**छाया हि भूमेः शशिनो मलत्वेनारोपिता शुद्धिमतःप्रजाभिः ।।**

–निर्मल चंद्रावर कलंकाचा आरोप येतो, त्याप्रमाणें निर्मलशीला, निष्पाप सीतेवर हा अकारण आरोप आहे हें मी जाणतो. पण लोकापवादाला मला मान दिलाच पाहिजे.

सीतेच्या करुण स्वरांत उमटलेल्या–

वाच्यः त्वया मद्वचनात् स राजा,
वन्हौ विशुद्धामपि यत्समक्षम् ॥
मां लोकवाद श्रवणात् दहासी:
श्रुतस्य किं तत्सदृशं कुलस्य ॥

—मी विशुद्धशील आहे याची अग्नीनें साक्ष देऊनहि तूं माझा केवळ लोकापवादाकरतां त्याग करतोस हें तुझ्या रघुकुलाला शोभते काय?

—या आक्षेपालाहि रामभद्रानें मूकपणें, जड हृदयानें तिचा त्याग करून उत्तर दिलें व स्वत: तपस्वी जीवन कठोरपणानें पाळलें. त्या काळांत अनेक स्त्रिया करण्याची रीतच होती. पण रामराजानें आपलें एकवचनी, एकपत्नी, एकबाणी व्रत सोडलें नाहीं. त्याच्या पित्यानेंच अनेक स्त्रिया केल्याचें उदाहरण त्याच्यासमोर असूनहि अश्वमेधयज्ञासाठींहि त्यानें सुवर्णाची सीता उभी केली, पण सीतेबद्दलचें प्रेम व निष्ठा सोडली नाहीं. पत्नीवर एवढें एकनिष्ठ प्रेम असलेल्या रामाची सीतेशिवाय काय बरें स्थिति झाली असेल! एक पत्नी असतांना इतर स्त्रियांविषयीं त्याच भावना ठेवणाऱ्यांना त्याची काय कल्पना येणार?

कुळकजाईच्या डोंगरावर पोंचलेल्या सीतेच्या करुण विलापांनीं, मोरांनीं आपलें नृत्य बंद करून अश्रू ढाळले. वृक्षांनीं पुष्परूपी अश्रू गाळले. कोमलहृदयी हरणें गवत खाण्याचें सोडून स्तब्ध झालीं. कुळकजाईची सारी सृष्टि कोमेजून गेली. सारा आसमंत शोकसागराच्या उर्मींनीं कषाय बनला. देवीवांचून शून्य असलेल्या जगांत रामहि उदास जीवन जगत होता. त्यांत जानकी गर्भवती होती. रामरायाच्या मनाला ती बोंचणी आरपार भेदत होती. ज्या कोमलांगीचें स्थान आपल्या ऋजु हृदयांत व भव्य राजवाड्यांत असायचें ती राज्यलक्ष्मी शून्य काननांत एखाद्या पालापाचोळ्यासारखी आपण भिरकाविली. तिच्यासमोर त्यानें दुःखाश्रूचा एखादा थेंब गाळला असतां तरी रामाचें आपल्यावरील प्रेम पाहून तिला धीर आला

असता. वैदेहीच्या आवडत्या वस्तू पाहून, तिच्यावर केलेल्या अन्यायानें रामाला विलक्षण दाह वाटत असे. राम म्हणतो—

दलति हृदयं शोकोद्वेगात् द्विधा तनु भिद्यते ।
वहति विकलः कायो मोहं न मुञ्चति चेतनाम् ॥
ज्वलयति तनुं अन्तर्दाहः करोति न भस्मसात् ।
प्रहरति विधिर्मर्मच्छेदी कृन्तति जीवितम् ॥

—शोकानें, उद्वेगानें माझें हृदय दळलें जात आहे, पण अजून त्याचे दोन तुकडे होत नाहींत. शरीर गळाठून गेलें आहे. मन सीतेच्या स्मरणानें वेड्यागत झालें आहे, तरी अजून मरण येत नाहीं. आंत होणाऱ्या आगीनें शरीर होरपळतें आहे, पण भस्मसात् होत नाहीं. हें नशीब मर्मभेदी असूनहि जीवन नाहींसें करीत नाहीं.

कुरंगाविलोल नेत्रांच्या सीतेला हें वर्ष अतिहालाचें आहे. कारण तिचा गर्भ वाढत आहे. गर्भारपणानें तिची काया चंद्राप्रमाणें शीतल, सौम्य व कमलतंतूसारखी कोमल झाली आहे. मांस झडल्यानें अंग कृश झालें आहे. अशा त्या हृदयवल्लभेला एकाकी वाल्मिकी आश्रमाजवळच्या भयाण रानांत मी सोडलें. ज्या कुलभूषणेचे डोहाळे पुरवून घेण्याची हौस, या विशाल अयोध्येच्या राजगृहांत मोठ्या थाटामाटांत पुरी व्हायची, त्याच पुरंध्रीला वनांत काय खावें लागत असेल? ज्या मैथिलीनें राजगृहाच्या बागेंत आपल्या कोमल करकमलांनीं वृक्ष, लता, हरिणींचें मोठ्या मायेनें पालनपोषण केलें तीच सारी रम्य सृष्टि आज मला विषसमान झाली आहे. त्यांतील एकेक गोष्टीकडे पहातांच अनघा सीतेची सात्विक, कोमल, सुंदर मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते. पक्षांच्या गोड किलबिलीनें जानकीच्या मधुवचनांची आठवण होऊन मन उदास व खिन्न होऊन जीवन भाररूप होतें; नको तें जगणें असें वाटतें.

राजीवनेत्र रामाच्या विलोल नयनांतून याच विचारांनीं किती अश्रुसमुदाय भूमींत लीन झाले असतील !

**एकपत्नीव्रतो रामो राजर्षि सर्वदा: शुचि: ।
गृहमेधीयमखिलम् आचरन् शिक्षयन् जनान् ॥**

एकपत्नी, शुचि राम लोकशिक्षणाकरितां राजधर्म पाळीत होता. वसिष्ठांच्या मुखांतून जीवननिष्ठा जीवनांत मुरविण्याकरितां योग-वासिष्ठाचे पाठ गिरवीत होता.

भारतांत ज्या स्त्रीरत्नांचा त्याग त्यांच्या पतींनीं केला, त्यांच्याच पोटीं प्रत्यक्ष पित्यापेक्षां पराक्रमी, तेजस्वी सिंहशावक उपजले. शकुंतलेचें पांग भरतानें फेडले; सीतामाईचे लव-कुशांनीं ! अश्वमेध यज्ञाच्या यशस्वितेकरितां युद्ध करणाऱ्या साऱ्या रघुवंशाचा त्यांनीं आपल्या अप्रतिम युद्धकौशल्यानें पराभव करून शेवटीं आपल्या पित्यालाच कुळकजाईच्या युद्धभूमीवर यावयास लाविलें. पितापुत्रांचें द्वंद्व संपून पति–पत्नींचें द्वंद्व सुरू झालें. धवलशीला सीतेनें पुन्हा जनमानस शांत करण्याकरितां सत्वपरीक्षा दिली. पण राम सीतेला मात्र कायमचे अंतरले.

**रामादन्यं यथाहं वै मनसापि न चिंतये ।
तथा मे धरणी देवी विवरं दातुमर्हति ॥**

—रामभद्राशिवाय अन्य कुणाचें मनानेंहि मी चिंतन केलें नसेल, तर ही भूमाता मला आश्रय देवो !

आपल्या सुशील कन्येच्या या यातना, आपल्या जांवयाच्या या लोकविलक्षण वेदना, कुळकजाईच्या पर्वतशिखरावरील भूमातेला पाहवेनात. आपल्या शिखराला द्रोणाकार देऊन आपल्या सोशीक, अबोल कन्येला आपल्या पोटाशीं तिनें कायमचें मायेच्या पदराआड केलें, पण जांवयाला वियोगाच्या खाईत लोटलें. आपल्या प्रेमळ,सुशील, मुग्ध सहचारिणीच्या जीवननाट्याचा हा अखेरचा पडदा पडलेला पाहतांच रामचंद्राच्या डोळ्यांतून अश्रूंच्या उष्ण अति उष्ण धारा त्या द्रोणांत वाहूं लागल्या. शोकाग्नीचें तें उष्ण अश्रुजल दोन्ही बाजूंना

खिंडारें पाडून त्या द्रोणाकार पर्वतशिखराच्या दोन बाजूंना वाहूं लागलें. त्या शोकाग्नितपित जलानें माणगंगा व बाणगंगांच्या तीरींची सारी भूमि ( माणदेश ) शोकाच्या काळ्या गडद रंगानें माखली. सारी वनसृष्टि करपून गेली. सारी सुंदरता, रमणीयता कोमेजून तिचें निर्माल्य झालें. रामकथेचा हा करुण रस द्वापारयुगापासून आजतागायत माणगंगा व बाणगगा यांच्या रूपानें कुळकजाईच्या द्रोणांतून वहात आला आहे. सारा भूभाग नि कुळकजाईचा पर्वत ‘ सीते–सीते ’ अशी उदास, करुणतम वाणी उच्चारीत असल्याचा आपल्याला भास होतो. जवळपास थरथरणाऱ्या तृणांकुरांतूनहि तीच कातर वाणी आपल्याला ऐकूं येते. इथें घडलेल्या त्या उदात्त, भव्य, पण शोकपर्यवसायी नाट्यगीताचे आलाप उष्ण वायूच्या रूपानें आपल्या कर्णकुहरांत शिरून आपल्याला बेचैन करतात. त्या उदास नाट्याचा अंत पाहून आपल्या हृदयाची कोमल कालिका सुकून जाते. एका सुशील साध्वीचा आम्ही आमच्या संशयानें केलेला छळ पाहून मन उदास व खिन्न होतें; जीवन भार वाटतें !

●●●

## ४ सज्जनगडचे
## " ज्ञानी आणि उदास् "

लोणावळ्याला माझ्या डोक्याचं मडकं भाजण्याचं काम ज्या कुंभार मास्तरांनीं अगदीं मनापासून केलं, त्यांनीं आम्हां विद्यार्थ्यांना ' मनाच्या श्लोकांनीं ' रामदासांची ओळख करून दिली. करुणाष्टकांचे करुण आलाप माझ्या वडिलांच्यामुळें माझ्या हृदयांत कायमचे घर करून राहिले. पण रामदासस्वामींची जी भीति दासबोधाचा ग्रंथ पाहून माझ्या मनानें घेतली ती अनेक वर्षें कायम होती. हातांत छडी घेऊन माझ्यासारख्या दुबळ्या मनाच्या विद्यार्थ्याला डोळे वटारून शिकवणारे रामदास मला पटायला जरा जडच वाटायचे. हा साधु फार मोठा, समर्थ असला तरी आपल्यासारख्या ' येरा गबाळ्या ' करतां नव्हे. कर्तव्यकठोरतेनें आपलें कर्तव्य स्वतः करून, स्वतःच्या अनुयायांना करायला लावणारा हा वटारलेल्या डोळ्यांचा, भव्य देहयष्टीचा, उग्र, दाढी-मिशाधारक आपल्यासारख्या गबाळ्याला एक मिनिटभरदेखील जवळ उभा करणार नाहीं अशी माझी भावना होती. त्यापेक्षां घटकेंत रडणारा, घटकेंत आनंदानें हसणारा, क्षणांत विठाईला आळवणारा तुकाराम मला फार आवडे.

ज्ञानोबामाऊलीच्या ज्ञानेश्वरीची एक ओवीहि न समजतां मला त्या माऊलीबद्दल प्रेम वाटे. साऱ्या समाजाकडून अतोनात छळ होऊनहि त्या समाजाबद्दल रोषाचा वा द्वेषाचा अपशब्द न उच्चारणारी ती क्षमामूर्ति माझ्यासारख्या अखंड चुका करणाऱ्या, बथ्थड विद्यार्थ्याला क्षमा करील, हृदयाशीं धरील, प्रेमानंच कुरवाळील असा मला विश्वास वाटायचा. पण रामदासांच्या ग्रंथांशीं माझा जसजसा परिचय होत गेला तसतसा हें श्रीफल वरून कठोर भासलें तरी आंतून इतर संतांसारखेंच मधुर आहे हा समज दृढ होत गेला व भीति कमी कमी होत जाऊन प्रेम निर्माण झालें. त्यामुळें '**कौमार आचरेत् प्राज्ञो, धर्मान् भागवतानिह**' (धर्माचें आचरण लहानपणींच सुरू झालें पाहिजे) ही भगवद्भक्त प्रल्हादाची भागवत धर्मातील आज्ञा आचरणांत आणण्याकरितां व 'आधीं केलें मग सांगितलें' हें प्रत्यक्ष कृतींत उतरवावें म्हणून, नाशिकजवळच्या टाकळीला समर्थांचें जें तपस्यास्थान आहे, त्याचें दर्शन घेतलें व त्यानंतर समर्थांची समाधि ज्या सज्जनगडावर आहे त्याला भेट देऊन आपण पावन व्हावें ही इच्छा अंतरीं उद्भवली व दिवसेंदिवस वाढीला लागली.

सज्जनगड साताऱ्यापासून केवळ सहा मैलांवर एका चांगल्याच उंच व सह्याद्रीच्या इतर फाट्यांपासून वेगळेंपण दाखविणाऱ्या डोंगरावर वसलेला आहे. इतर डोंगरांच्या भल्या मोठ्या विस्तीर्ण खोऱ्याच्या एका बाजूला, पण इतर डोंगरांपासून पुढें येऊन उभा राहिलेला, चारी बाजूंनीं तासून काढलेला असा हा डोंगर पाहून सज्जनगडाची वास्तु उभी केली गेली. जवळ जवळ शे-पन्नास मैलांचा प्रदेश या गडावरून पाहतां येत असावा. भव्यतेच्या दृष्टीनें इतर ठिकाणीं असलेले कितीतरी किल्ले सज्जनगडापेक्षां अधिक भव्य आहेत. पण सज्जनगडाचें वैशिष्ट्य त्याच्या नांवांतच आहे. शिवाजी राजांसारख्या राजकारण्यांना राजकारणांत बरेंवाईट करावें लागतेंच. स्वराज्यसंस्थापनेच्या

आड येणाऱ्यांना कंठस्नान घालतांना दयामाया विसरावी लागल्यानें माणूस माणुसकीलाच विसरतो. पण भारतांतल्या राजांत शिवाजीराजांचें वैशिष्ट्य दोन गोष्टींनीं इतरांपासून श्रेष्ठत्वानें उठून दिसतें. एक म्हणजे कल्याणच्या सुभेदाराची सून सन्मानानें परत पाठवणें व दुसरें म्हणजे त्यागाचें प्रतीक असा जो भगवा ध्वज समर्थांसारख्या संतांनीं दिला, त्याचा स्वीकार करणें. सर्वसंगपरित्यागाची आंस लागलेला हा थोर राजा अनेकवेळां राज्यवैभवावर पाणी सोडून रामदास व तुकाराम यांच्या पायावर, स्वतःला संन्यासदीक्षा द्या म्हणून पडला. स्वतःची मानमान्यता, पराक्रम, वैभव व अधिकार अशा एकाहून एक मोहमयी गोष्टी स्वतःजवळ असतांना असा मानसिक व प्रत्यक्ष संन्यास जो करूं शकतो तो लंगोटी लाऊन, संसार सोडून, जंगलांत जाऊन, लंगोटीचाहि भव्य संसार करूं शकणाऱ्या कषायवस्त्रधारी संन्याशापेक्षां कितीतरी मोठा संन्यासी ठरतो. अशा या अपूर्व संन्याशाला, जन्मभर देशधर्माचा संसार करून महाराष्ट्रांत आनंदवनभुवन उभारण्याकरितां जन्म घेतलेल्या आपल्या थोर गुरूला एखादें निवांत स्थान द्यावें असें वाटलें तर नवल काय? त्यामुळेंच समर्थांकरतां विजापूरकरांकडून जिंकलेला हा गड राखून ठेवून राजांनीं त्याला सज्जनगड हें सार्थ नांव दिलें. या गडावर समर्थांच्या निवासामुळें अनेक सज्जन वास्तव्य करून गेले.

आधीं नेटका संसार करावा व मग परमार्थाच्या भानगडींत पडावें असें रामदासांनीं सांगितलें, असा अर्थ आम्ही कामदासांनीं त्यांच्या ग्रंथांवरून मतलबसिंधूला धरून काढला. अगदीं त्याचप्रमाणें सज्जन गडाच्या साडेसातशे पायऱ्या चढतांना हबकून गेलेले, सज्जनगडावर 'पिक्‌निक्' करतांच आलेले पण दर्शन व यात्रेचें नांव सांगणारे, या चढण्याच्या श्रमांनीं थकून गडाच्या या उंचीची कल्पना न देणाऱ्या, मध्यें चहाची हॉटेलें न ठेवणाऱ्या व रुपाया-आठ आण्यांत डोलीच्या 'हेलिकॉप्टर'नें वर न नेणाऱ्या व्यवस्थेला नांवें ठेव-

तांना आढळतात. समर्थांसारखा महापुरुष उतारवयांतहि आतां-सारख्या व्यवस्थित पायऱ्या नसतांनाहि हा अवघड चढ चढत असे. पण स्वैर जीवनानें शक्तिपात झालेले आणि तरुणवयांतच वृद्धत्व प्राप्त झालेले कांहीं नवजवान व युवती, परमार्थाचा हा गड खास तयार केलेल्या सोपानमार्गानें चढतांनाहि धापा टाकीत कासावीस होतात. '**पुण्यस्य फलमिच्छन्ति, पुण्यं नेच्छन्ति मानवाः !**' (मनुष्यास पुण्याचें फळ हवें असतें पण त्याकरतां कष्ट करायला नको असतात.) पण सृष्टीचा 'आधीं कष्ट मग फळ' असा कठोर नियम असल्यानें त्यांना 'कल्याण–दर्शन' व्हायलाहि धांपा टाकाव्याच लागतात. पण तपस्येनें विषयवासनेचा खडक चढून वर येतांच अमृताचा जिवंत झरा परमात्मा अवश्य उपलब्ध करतो, तद्वतच गडाचा अर्ध्याच्यावर रस्ता पार करतांच समर्थांचे शिष्योत्तम श्री कल्याणस्वामींचें छोटें मंदिर पाहून हायसें वाटतें व माणूस तिथेंच जरा विसावतो.

'**भक्तिचेनि योगें देव, निश्चयें पावती मानव**' या समर्थांच्या उक्तीवर एकशे एक टक्के विश्वास ठेवणाऱ्या महात्मा कल्याणस्वामींनीं '**नाहीं देहाचा भरंवसा, केव्हां सरेल वयसा**' हें जाणून या स्थानावर आपला देह झोंकून दिला होता. समर्थांसारखे समर्थ गुरु 'अल्प धारिष्ट' पहाणारेच होते व अशा सद्गुरूंच्या समर्थ हातांत आपलें सर्वस्व सुरक्षित होते हें त्यांनीं सिद्ध करून दिलें. एकदां वरच्या कड्यावर समर्थ बसले असतांना त्यांचें उत्तरवस्त्र वाऱ्यानें उडून कड्याखालीं जाऊं लागतांच समर्थांनीं 'त्या वस्त्राला झट्दिशी धरा' म्हणून आज्ञा दिली. त्यावेळीं कल्याणस्वामींशीं इतर बाबतींत बरोबरी करणारे सारे शिष्य मागें पडले, पण समर्थांच्या एका शब्दासरशी कल्याणस्वामींनीं त्या वस्त्रावर आपला देह झोंकून दिला व या तुच्छ देहाला सद्गुरूंच्या शब्दापेक्षां कमी मोल आहे हें सिद्ध केलें. समर्थांच्या कृपेनें ते त्या वस्त्रासह या स्थानावर अलगद

उतरले व चमत्काराला भुकेलेल्या लोकांनीं कल्याणस्वामींच्या जय-जयकारांत या प्रसंगाचें स्मारक कल्याणस्वामींच्या मूर्तीच्या रूपानें इथें कायम केलें. कल्याणांच्या त्या कल्याणमूर्तीला नमस्कार करून '**लाखेचिया मांदुसे, आगीचें ठेवणें कायसें, आंतबाहेरी सरीसे, करुनी घाली**' असें सांगून, ज्या समर्थांनीं कल्याणाला अंतर्बाह्य स्वतःसारखा समर्थ बनवला, त्या समर्थांच्या दर्शनाकरतां पावलें चटचट उचललीं जातात. जरा वर जातांच समर्थ ज्या घळींत पुष्कळ वेळां येऊन बसत त्या घळीकडे जाणारी वाट दिसते. पण वरचा भव्य दरवाजा आपल्याला वर यायचा पुकारा करीत असतो.

त्या भव्य दरवाजाच्या आंत किल्ल्याचा कांहीं इतिहास अक्षरबद्ध करून ठेवलेला आहे. त्यापुढें अरबींत कोणा कविहृदयाच्या कल्पना शब्दरूप झालेल्या आहेत. शिवाजीराजांच्या अकाली निधनानंतर दख्खन जिंकण्याच्या मनीषेनें दिल्लीचा बादशहा औरंगजेब महाराष्ट्रांत उतरला. औरंगजेब म्हणजे मानवी मनाच्या गुंतागुंतीचा एक नमुना होता. परधर्माबद्दल असहिष्णु असून राज्यपिपासेनें वेडा झालेला हा माणूस स्वतःच्या भावांशीहि क्रौर्यानें वागला. त्यांनाहि कंठस्नान घालणारा, हा निर्दय वाटणारा माणूस,स्वतःच्या व्यक्तिगत जीवनांत शुचितेची जोपासना फार कठोरतेनें करतांना दिसतो. सारे ऐष-आराम नि वैभव पायीं लोळण घेत असतांना, अत्यंत साधेपणानें वागणारा, दिवसांतून पांच वेळा नमाज—प्रार्थना करणारा, कुराण शरीफच्या प्रती स्वतःच्या हातानें लिहून व त्या विकून त्यावर स्वतःचा खाजगी खर्च चालवणारा, स्वतःच्या कन्येबद्दल अत्यंत हळवा असणारा, हा बादशहा आमच्या विरोधांत उभा असल्यानें त्याचे हे सद्गुण आम्हाला दिसत नाहींत. असा हा जिद्दी माणूस महाराष्ट्राच्या भूमीवर सतत वीस वर्षे नेटानें उभा राहून मराठ्यांना नामोहरम करण्याकरितां दिल्लीचें अपार धन, मनुष्यबळ व सतत लढाया करून नाहींसें होणारें सुख, हें सारें खर्ची टाकून, महाराष्ट्राच्या

अनु० ३५५५८ ........ वि: ..................
क्रमांक .................. नों दि: १६-११-..


भूमीवर अखेरची निद्रा घेतां झाला. त्यानें सातारा, परळी, सज्जनगडाच्या मोहिमा स्वतः चालविल्या व गड ताब्यांत घेतला. पण मराठ्यांच्या परशराम त्रिंबक प्रतिनिधींनीं हा किल्ला परत मिळविला व किल्ला सोडण्यापूर्वीं विटंबना टाळण्यासाठीं बुजवलेलें समर्थांचें समाधिमंदिर पुन्हां उकरून त्यावर श्रीराममंदिराची उभारणी केली. मराठ्यांच्या शौर्य–धैर्याची, असीम त्यागाची, जिद्दीची, अपार देशप्रेमाची व बलिदानाची करुणरम्य कहाणी इथला दगड न् दगड आपल्याला सांगत असतो. आपल्या पूर्वजांच्या त्या कहाण्या आपले डोळे ओले करतात. असा त्याग, अशी भक्ति, असें शौर्य–धैर्य आमच्यांत, आमच्या महाराष्ट्रांत कायम असूं दे, अशी त्या भव्य वास्तूला प्रार्थना करून माणूस जड, भारावलेल्या अंतःकरणानें वरच्या पायऱ्या ओलांडूं लागतो. उपनिषद म्हणते–

अथ खलु आहु : काममय एवं अयं पुरुष इति
स यथा कामो भवति तत् क्रतुः भवति
यत् क्रतुः भवति तत् कर्म कुरुते
यत् कर्म कुरुते तत् अभिसंपद्यते ॥

–हा पुरुष काममय आहे असें द्रष्टे म्हणतात. जशी त्याची इच्छा असते, तसा त्याचा निश्चय होतो. निश्चयानुरूप कर्म घडते. कर्मानुरूप फल मिळते.

वर चढून जातांच समोरच पूजनीय श्री श्रीधरस्वामींची कुटी आपल्याला दिसते. '**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया, दुर्गः पथस्तत् कवयो वदन्ति ।**' (वस्तऱ्याच्या तीक्ष्ण धारेवरून चालणें दुःखद असतें. आत्मज्ञानाच्या मार्गावरील चालहि तशीच दुःखद व खडतर असते.) असें सर्व मेधावत सत्पुरुष सांगतात, त्यांतलें सत्य स्वामीजींच्या कष्टमय व एकांतवासी जीवनाकडे पाहून आपल्याला उमगतें. त्यांच्यासारखे तपस्यामय जीवन व्यतीत करणें आपल्याला कधीं तरी शक्य होईल का या विचारांतच डाव्या बाजूच्या बुरुजा-

कडे सहजच दृष्टि जाते. तिथें असलेल्या मंदिराच्या एका ओट्यावर समर्थ कित्येक वेळां आत्मचिंतनाकरितां व राजकारणाची गूढें उकलण्याकरितां बसत असत. त्यानंतर बुरुजापलीकडे दूरवर पसरलेला हरिततृणांचा मखमली गालिचा व त्या गालिच्याचेंच पांघरूण घेऊन बसलेली सह्याद्रीचीं गिरिशिखरें थेट क्षितिजापर्यंत पसरलेली दिसतात. जीवनांत दूरदृष्टि प्राप्त व्हावी व स्वतःचें क्षुद्रत्व पटावें यासाठीं निसर्गाचें हें भव्य रमणीय दृश्य अतिशय उपयुक्त ठरतें.

पाण्याकरतां असलेले तलाव मागें टाकून गेल्यानंतर समोरच समर्थ रहात त्या मठाची वास्तु समोर उभी दिसते. तिथें समर्थांनीं वापरलेला पलंग, त्यांची भव्य छाटी, खडावा, पिकदाणी, गुती इत्यादि साधनें जतन करून ठेवलेलीं आहेत. सारा जन्म—देश, देव, धर्म यांकरतां झिजवून समर्थांनीं इथेंच सहजरीतीनें आपल्या देहाचा पापुद्रा अलगद उतरवून ठेवला. समर्थांचे ज्येष्ठ बंधु श्रेष्ठ, यांच्या वंशजाकडे आज त्याची व्यवस्था आहे. ‘ शुकासारखें पूर्ण वैराग्य ’ बाळगलेल्या समर्थांच्या या वंशजांच्या क्षुद्र गोष्टींकरतां झालेल्या धडपडी ऐकून मन जरा विषण्ण होतें. ‘ जन्मतेन प्रसंगें स्त्रीदेह शिवणें अंगें ’ अशा ब्रम्हचाऱ्यांच्या संबंधित व्यक्तींनीं ‘ आधीं संसार करावा’ हा पूर्वार्धच फक्त आचरणांत आणला हें पाहून जरा वाईट वाटतें येवढें खरें.

त्यानंतर त्याच्या बाजूलाच समर्थांच्या समाधि-मंदिराची व त्यांच्या दैवताच्या मंदिराची भव्य वास्तु दिसते. समर्थांची समाधि राममंदिराच्या भुयारांतच आहे. पुरुषोत्तम श्रीरामाच्या चरणतळीं, महाराष्ट्राचे आनंदवन करण्याकरितां झटणारा हा महान् संत विसावला आहे. त्यांच्या निर्याणाच्या वेळीं त्यांचे शिष्योत्तम कल्याणस्वामी जवळ नव्हते. समर्थांनीं देह ठेवल्यावर, त्यांची समाधि बांधल्यानंतर ते सज्जनगडाला पोंचले व समर्थांच्या प्रत्यक्ष दर्शनाशिवाय त्यांचें समाधान न झाल्यानें ते समाधिपाशी धरणें धरून बसले

आपल्या शिष्याचा हा लडिवाळ हट्ट समर्थांनीं समाधींतून वर येऊन पुरवला. त्याची खूण म्हणून समाधीला पडलेली चीर पूजेच्या वेळीं दाखवली जाते. समर्थांनीं प्रगट होऊन कल्याणस्वामींना '**कळे आकळे रूप तें ज्ञात होता। तिथें आटली सर्वसाक्षी अवस्था। मना उन्मनीं शब्द कुंठीत राहे। तो गे, तोचि तो राम, सर्वत्र पाहे॥** असें म्हणून त्यांचें समाधान केलें असेल काय ?

या मंदिराच्या मागेंच पिसाटकडा उभा आहे. एकदां समर्थांनीं वेड्याचें रूप घेऊन या कड्यावर आपला मुक्काम ठोकला. एका हातांत नग्न तलवार घेऊन ते येणाऱ्याजाणाऱ्याच्या अंगावर धांवून जात. सारे शिष्य समर्थांच्या या अद्‌भुत रूपानें हतबुद्ध झाले. त्यांना समजावून शांत करण्याचे प्रयत्न व्यर्थ ठरले. समर्थ खरोखरच पिसाट झाले आहेत अशी वार्ता सर्वत्र पसरली. ती कल्याणस्वामीं-पर्यंत पोंचतांच ते तिथें हजर झाले. पहातात तों समर्थांच्या सोबतीला फक्त तिथला मारुतराय उभा. बाकी सारे भयभीत होऊन तोंड लपवून बसलेले. समर्थांच्या वेडाच्या हकीगती ऐकून ते मनमुराद हंसले. त्यांना भूत लागल्याच्या गोष्टीहि त्यांनीं गंमतीनें ऐकल्या. आपल्या वृद्ध मातेचे अंतःचक्षू उघडल्यावर समर्थांनीं त्या भुताची

**'होतें वैकुंठीचे कोनीं, शिरले अयोध्याभुवनीं,**
**लागे कौसल्येचे स्तनीं, तेंचि भूत गे माय'**

म्हणून ओळख करून दिली होती.

**'जालें साधनाचें फळ, संसार झाला सफळ,**
**निर्गुण ब्रह्म तें निश्चळ, अंतरीं बिंबलें।'**

'**भक्ताचेनि अभिमानें कृपा केली दाशरथीनें**' म्हणून ज्या समर्थांनीं जीवन कृतार्थ झाल्याचें, सारी खळखळ धुवून गेल्याचें अत्यंत सार्थ उद्‌गार काढले, ते समर्थ पिसाट झाले असे सांगणाऱ्या इतर शिष्यांचा मानससंकोच पाहून कल्याण पुढें झाले. समर्थांच्या साऱ्या

दमदांडगाईला न जुमानतां त्यांनीं कड्यावरून त्यांच्याबरोबरच उडी घेतली व त्यांचे पाय घट्ट धरून ' हे मातुके, आतां पुरे ' म्हणून विनविलें, आणि ते समर्थांसह आश्रमांत परतले. पण लोकमानसांत मात्र तो पिसाट-कडा अजून तसाच रुजला आहे.

या कड्याच्या वर उभे राहून दूरवर दृष्टि टाकली कीं दूरपर्यंत पसरलेली हरिततृणांकित पर्वतराजी व त्यांमधून खळखळणारी ' उरमोडी ' आपल्या डोळ्यांना सुखावते. या पर्वताच्या बेचक्यांत अलगदपणें उतरून विहार करणारा एखादा मेघदूतहि आपले डोळे सुखावतो. त्या पर्वतमाथ्यावरच्या वस्तींतून बाहेर गिरक्या घेणारे धूम्रवलयहि त्या मेघाशीं स्पर्धा करतांना दिसतें. त्यावर आपले शुभ्र-धवल प्रकाशकिरण परावर्तित करून एक अद्‌भुत, भव्य, तेजोरूप देखावा सूर्यनारायण आपल्या डोळ्यांपुढें उभा करतो. साहजिकच आपल्या अंतर्मनांत येतें कीं—

**हिरण्मये परे कोशे, विरजं ब्रह्म निष्कलम् ।**
**तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिः तत् यत् आत्मविदो विदुः ॥**

—हिरण्मय अशा आनंदकोशांतून प्रकाशमान होणारें ब्रह्म हें निष्कल म्हणजे पूर्ण आहे. तें धवल, निरंजन ब्रह्म, तेजाचें तेज, ज्योतीच्या ज्योती होत. तें ब्रह्म म्हणजेच आत्मतत्त्व आहे. समर्थां-सारख्या आत्मज्ञानी पुरुषोत्तमाला त्याचेंच ज्ञान या सुंदर दृश्याकडे पहातां पहातां होत असेल काय ? त्याची अनुभूति आपल्याहि जीवनांत कधीं येईल का ? आपल्याहि अपूर्ण जीवनांत त्या पूर्णाचा स्वल्पसा अमृतस्पर्श उमटेल का ?

● ● ●

## ५ : मत्स्येंद्रगडचे ‘ शिष्य आणि गुरुनाथु ’

ब्रह्मगिरीच्या उत्तुंग शिखरावरून एखाद्या पंचवर्षीय मधुबाले-प्रमाणें उल्हास—आनंदाचें गाणें गात धांवत पळत सुटलेली कृष्णा रेठऱ्याच्या जवळ आली म्हणजे अडखळते. मुग्धा बालेचें रूप धारण करते. तिचा अवखळपणा नि स्वैर धांवपळ मंदावते. समजूत आलेल्या एखाद्या मुलीप्रमाणें ती जरासें गांभीर्य धारण करते. पुढें येणाऱ्या पौगंडावस्थेची जणुं ती सुरुवात असावी. तिच्या अवखळ सुधासुंदर जलाचे अमृततुषार आतां पीयूषलहरींत रूपान्तरित होतात. मंदमुग्ध हास्यलहरींनीं नटलेल्या या प्रसन्नवदनेच्या दर्शनानें आस-पासची सारी कोमल—शामल धरा पुलकित होऊन हारेतरोमांचित होते. तिच्या निर्मल, सलिल स्नेहानें वृक्षवेलींना भव्य दिव्य रूप येतें. पूर्वसागराकडे निघालेल्या त्या स्नेहमयी मातेच्या रुचिर जलानें तिच्या तटींचीं फुलें, फळें, शाखा, कंद, सारे चारु रूप धारण करून रुचिरतम होतात. या नयनकौमुदीच्या स्नानपानानें इथलें जनमानस प्रफुल्ल होतें. मांगल्याचे, दिव्यतेचे अद्‌भुतविलोल स्रोत त्यांतून काव्य-

रूपानें वाहूं लागतात. या तरल तरंगेच्या शामल तटीं किती संस्कृतींचें जनन-जतन–उत्थापन झालें असेल तें त्या लीलामयीलाच ठाऊक ! त्या शामल सरितेच्या अमल परिसरांत किती योगी–विरागी, शूर–वीर, साधु–संत आपल्या विमल चारित्र्यानें फुलले, त्यांचा जीवनगंध किती दूर दरवळला तें त्या सर्वान्तरवाहिनींनेंच साक्षी वृत्तीनें निरखिलें असेल. ही हरिहररूपिणी, सर्वपूज्या, सत्–चित्–आनंदरूपा, प्रेमला माता आपल्या तीरावर फुलणारें, नाचणारें, हर्ष-खेदयुक्त नटनाट्य पाहून कधीं तरल तरंगांचें मुग्ध हास्य, तर कधीं विषादाचें निस्तरंग गांभीर्य धारण करती झाली असेल. आज तिच्या प्रांगणांत डोलणाऱ्या उसांच्या भरदार गालिच्यानें तिला मानवाच्या उद्यमशीलतेचें कौतुक वाटत असेल, तर कधीं कधीं त्याच मानवसमूहाच्या आसुरी भावनांच्या तांडवानें ती विव्हल, व्यथित-हृदया होत असेल. तिच्या रुचिर जलाच्या प्राशनानें मानवी मनः-सरोवरांत उठणारे विविध परस्परविरोधी तरंग पाहून तिला आपल्या सामर्थ्याचें भान येऊन काय वाटत असेल ? त्या स्नेहमयी, धवलतरंगा, विपुलसलिला अंबेला त्या दृष्यांची क्षण-भंगुरता ठाऊक असल्यानेंच कदाचित् ती फक्त साक्षीरूपानें राहूं शकत असेल. या प्रसन्नवदना मातेच्या एका कुशींत मच्छींद्र-गड कनकगिरी विसावला आहे. आपल्या मातेच्या प्रेमानें पुलकित होऊन, स्तब्ध-शांत होऊन तो अबोल बनला आहे. पण त्याच्या शिरावर स्थानापन्न झालेल्या 'शिष्य आणि गुरुनाथु' यांच्या 'बोधचंद्राचिया कळा' पाहूनहि त्याला कदाचित् हें प्रौढत्व प्राप्त झाल्यानें त्यानें हें सर्वार्थसाधक मौन धारण केलें असेल. एका महान् सद्गुरुनाथानें आपल्या शिष्याला गुरुपदवीवर चढण्याचा उपाय दाखवतांना आपलें जगद्गुरुत्व सोडून अतीव लघुत्व स्वीकार-ल्याचें पाहून, या कनकगिरीनेंहि लघुत्वाचा अंगिकार केला असेल. काय कारणानें त्यानें ही स्थितप्रज्ञता स्वीकारली व ती त्याला कशानें

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ९३५५०
५०



रुचली तें पहायला दहाव्या शतकापर्यंत घड्याळाचे कांटे उलटे फिरविले पाहिजेत.

दहाव्या शतकांत याच स्थानावर, याच कृष्णामाईच्या परिसरांत एक प्रचंड अरण्य उभें होतें. दाट, किर्र ऽ ऽ झाडींनें सूर्याच्या सर्वगामी किरणांनाहि भूमीला स्पर्श करण्याची शक्ति नव्हती. उत्तुंग वाढलेल्या वड, पिंपळ, उंबर, बेल, पिंपरी, साग, शिसवी, चंदन इत्यादि डेरेदार वृक्षराजांनीं इथें आपलें साम्राज्य विस्तारलें होतें. या वृक्षांच्या साम्राज्यांत करवंदी, साबर, गुळवेल, वासनी, धत्तुरा, आंबरवेल, हरनदांड इत्यादि लतांचीं छोटीं छोटीं राज्यें, वसाहती करून होतीं. कळकांच्या, बोरूंच्या, घायपातींच्या, बोरी, बाभळी, खैर, हिंवर, यांच्या कंटकमय साहचर्यानें साऱ्या रानाची दुर्गमता अधिकच वाढली होती. वाघ, सिंह, अस्वलें, चित्ते यांच्या डरकाळ्यांनीं वनाच्या गूढतेंत अद्‌भुतता व भयाणता यांनाच स्वैर संचाराला वाव होता. हरणें, गायी–बैल, शेळ्या–मेंढ्या यांचे कळप या वनसंचाराला भीत, पण, या गूढगंभीर वनाचे अनभिषिक्त राजे होण्याचें भाग्य ज्या रामोशी, कोळी, भिल्ल, जातींच्या वांट्याला आलें होतें, ते या वनांत मुक्तसंचार करूं शकत. वाल्या कोळ्यांतून महाकवि वाल्मिकीचें रत्नरूपांतर होऊनहि, या कोळशाच्या खाणींतल्या इतर आदिवासींच्या नशिबीं कोळसा म्हणूनच जगणें आलें होतें. या भयानक आडरानांत एखाद्या वाटसरूचा वा नागरी समूहाचा प्रवेश होणें म्हणजे त्यांच्या मृत्यूलाच निमंत्रण होतें. काळेकभिन्न, आडदांड, पिळदार शरीराचे हे मांग, रामोशी, भिल्ल नुसता त्यांच्या धनाचाच अपहार करीत नसत तर त्यांचें प्राणधनहि हरण करीत. त्या वनराईत मुक्त संचार करणारे पशू व त्यांच्याच संस्कारांचे हे मानव, यांच्या तडाख्यांतून सुटण्याचें भाग्य एखाद्याच्याहि वांट्याला येणें दुर्घट होतें. लोखंडाचें सोनें करणारा एखादाच नारदासारखा परीस वाल्याचा वाल्मिकी बनवूं शकतो. त्या

पाशवी वासना दबणें अतिकठीण. त्यांतहि जीवनकलहाच्या अघोरी संघर्षात मानवी भावनांचा उगमहि दुरापास्त होतो. चार पायांच्या पशूंशीं साधें जगण्याकरितांहि जिथें अहोरात्र जाग्रत राहून झगडावें लागतें तिथें या सुकोमल भावनांची जोपासनाच कठीण होते. त्यामुळें या असल्या वनांत येण्याचें धाडस सहसा असंभव होतें.

पण जिथें जायला सामान्य माणूस तयार नसतो तिथेंच जायला उत्सुक व तयार असणारे हरीचे लाल सर्वकाळीं, सर्वत्र आढळतात. जिथें अंधार, औदासीन्य आहे, जिथें दैन्य, दु:ख, दारिद्य आहे, जिथें मानवतेचे पराकोटीचें अध:पतन झालें आहे, त्याच ठिकाणीं सहाय्याची, प्रकाशाची व ज्ञानाची आवश्यकता असते. पडलेल्या मानवतेला उचलून उठवण्याची जरूर असते. निर्बलांनाच बलराम हवा असतो. त्यामुळेंच या भयानक अरण्याकडे सर्व भारतभर आपल्या अमोघ वाणीनें ज्ञानसूर्याचा प्रकाश पसरवणाऱ्या, आद्य शंकराचार्यानंतर वैदिक तत्त्वज्ञानाचा उद्धार करणाऱ्या मच्छींद्रनाथ व गोरखनाथ या अलौकिक सद्‌गुरु व सत्‌शिष्याची जोडी वळली. तिलोत्तमेच्या मोहक, कोमल पाशांतून आपल्या श्रीगुरुनाथांना मोकळे करून गोरखनाथ भारतभर धर्मचक्राचें प्रवर्तन करण्याकरतां पायाला भिंगरी लावून फिरत होते. गुरुपुत्र मीननाथाला आपल्या बलिष्ठ खांद्यावर बसवून 'अलख निरंजन' चा घोष करीत ते पुढें चालले आहेत. त्यांच्यामागें आपल्या या समर्थ शिष्याची अद्‌भुत साधना, अमोघ तप, अद्‌भुत गुरुभक्ति यांचें कौतुक करीत मंदमंद पावलें टाकणारी मच्छींद्रनाथांची धीर-गंभीर, तेजस्वी मूर्ति वाट चालत होती. रानांतील पांखरांच्या मधूनमधून ऐकूं येणाऱ्या किलबिलाटाची, खांद्यावर बसलेल्या मीननाथाला गंमत वाटत होती. कधीं या भयानक, गूढ अरण्यांत निर्भयतेनें संचार करणारें हें त्रिकूट पाहून वनाचे राजे असलेले वाघ-सिंह लांबूनच गुरगुरत जात होते. वनाचा हा अति-

दुस्तर पथ चालतां चालतां हे गुरुशिष्य कृष्णामाईच्या तटावर येऊन दाखल झाले. सर्वांनीं कृष्णेचें मधुर जल प्राशन केलें. आपल्या कक्षेंतल्या भिक्षेच्या झोळ्या खालीं ठेवून त्यांनीं अंग मोकळें केलें. नंतर मच्छिंद्रनाथांनीं आपण बहिर्दिशेस जाऊन पाठोपाठ येतोंच म्हणून त्याला मीननाथांसह समोरच्या गिरीकडे पुढें जाण्यास सांगितलें. इतका वेळ स्वतः फार काळजीपूर्वक संभाळलेली झोळी त्यांनीं गोरखनाथाजवळ दिली व ते म्हणाले, " गोरखनाथा, इथें चोरदरोडेखोरांचें भय तर नाहीं ना ? असें मघांपासून मी विचारीत होतो तें या झोळीच्या काळजीनेंच. आतां मात्र तूं ती नीट संभाळून घेऊन जा. मी तुझ्यापाठोपाठ येतोच. "

गोरखनाथांनीं ती झोळी आपल्या खाकेंत अडकवली. मीननाथाला अलगद खांद्यावर बसवलें व ते झपझप कृष्णामाईच्या किनाऱ्यानें दिसेनासे झाले. आपल्या गुरूंना मोहाच्या पाशांत अडकवणारी अशी दुसरी कोणती वस्तु आतां उपलब्ध झाली याचा गोरखनाथांना विचार पडला. 'येवढ्या थोर योग्यतेचीं, हिमालयाच्या भव्यतेचीं हीं माणसें अशा मोहाला कशीं बळी पडतात, मायेच्या पसाऱ्यांत पुन्हा कशीं गुरफटतात, याचा त्यांना अचंबा वाटला. वराहाचें रूप धारण करून पृथ्वीचा उद्धार करणारा विष्णूहि आपल्या अपत्य स्नेहाच्या मोहमय पाशांत गुरफटल्यानें आपलें वराहरूप सोडण्यास तयार होईना. शेवटीं शंकराला आपल्या त्रिशूळानें त्याचा वध करून त्याला मायेच्या त्या मोहक जाळ्यांतून सोडवावें लागलें. श्रीमत् आद्य शंकराचार्यांसारखे थोर जगद्गुरुहि राजाच्या शरिरांतून आपल्या संन्याशी शरीरांत परत यायला विसरलें, आणि शेवटीं त्यांच्या सत्‌शिष्याला बहुरूप्याचें सोंग घेऊन त्यांना जागृत करावें लागलें. आपल्याच सद्गुरूंना तिलोत्तमेच्या स्त्री–राज्यांतून आपण नुकतेच परत आणलें असतांना कुठली मोहमयी वस्तु या झोळींत त्यांनीं ठेवली आहे !' गोरखनाथांनीं झोळी

उघडून पाहिली. तिलोत्तमेनें वेळप्रसंगीं उपयोगी पडावी म्हणून एक सोन्याची भली मोठी वीट दिली होती. ती वीट पाहतांच त्यांना अनावर हंसूं लोटलें. मीननाथानें आपल्या आईच्या देणगीचा वृत्तान्त त्यांना सांगितला. गोरखनाथांनीं ती वीट वर उचलली व कृष्णामाईच्या गूढ गंभीर पाण्यावर ती भिरकावली. एखाद्या भाकरीप्रमाणें पाण्याचीं वर्तुळें त्या निस्तरंग जलावर उठवीत ती वीट दिसेनाशी झाली व मग गोरखनाथ झपाट्यानें पर्वतगिरीकडे चालूं लागले. त्या हरितवृक्षांनीं डंवरलेल्या पर्वताच्या पायथ्याशीं येऊन एका विशाल वटवृक्षाखालीं मीननाथाला बसवून ते मच्छींद्र-नाथांची वाट पाहूं लागलें. येवढ्यांत पायथ्याशीं असलेल्या रामोशी, मांग, बेरडांच्या वस्तींत कुणी जोगी आल्याची बातमी पसरून सारे काळेकभिन्न, धिप्पाड देहयष्टीचे, अंगाला काव फांसलेले लोक हातांत फरशा, भाले इत्यादि आयुधें घेऊन आपल्या विक्राळतेचें, क्रौर्याचें प्रदर्शन करीत त्या दोघांभोंवतीं जमा झाले. कुणी त्यांच्याजवळ नुसत्याच कुतूहलानें उभे राहिले तर कुणी त्यांच्या तेजस्वी, सुंदर रूपाची वाखाणणी करूं लागले. येवढ्या भयानक अरण्यांत, येवढया हिंस्र पशूंच्या गराड्यांतून ज्याअर्थीं हे सुरक्षित येऊं शकले, त्या अर्थीं हे कुणी देवाचे दूत असले पाहिजेत असें मानून त्यांच्यांपैकीं कांहीं आदरानें त्यांच्याभोंवतीं उभे राहिले. इकडे मच्छींद्रनाथ त्या दाट अरण्यांतून वाट काढीत तिथें येऊन पाहतात तों मध्यभागीं मीननाथ व गोरखनाथ आणि भोंवतालीं त्यांना वेढा देऊन बसलेले हे काळेकभिन्न अक्राळविक्राळ सैन्य ! त्यांना पाहून वेढयांतले लोक दूर झाले व मच्छींद्रनाथ त्या दोघांजवळ येऊन उभे राहिले. त्यांनीं गोरखनाथांना इथें कांहीं भीति तर नाहीं ना, म्हणून हळूंच विचा-रले. गोरखनाथ नम्रतेनें म्हणाले, "महाराज, भीति तर मागेंच राहिली. आतां भीति कसली ? चला, आपण या पर्वतशिखरावर जाऊं. तिथें एक सुंदर पुण्यपावन तीर्थ आहे. तिथेंच स्नान-संध्या

अनुक्रम ३५५५८ ........ दि: ..................
क्रमांक ..................... नों दि ..२५-११-६४



करून विश्राम करूं व मग उद्यां वाटल्यास पुढच्या मुक्कामाला जाऊं."

तिघेहि त्या जनसमुदायांतून वाट काढीत चढण चढूं लागले. खालचा जनसमूह त्यांच्या मागोमाग अंतर ठेवून येऊं लागला. तिघेहि तीर्थाजवळ आपलीं वस्त्रें उतरून स्नानाची तयारी करूं लागले. इतक्यांत मच्छींद्रनाथांची दृष्टि आपल्या झोळीवर गेली. घाईघाईनें ते पुढें होऊन ती रिकामी झोळी चांचपूं लागले. त्यांच्या मुखावरचे भाव बदलूं लागले. त्यांनीं तिघांच्या झोळ्या तपासल्या. त्यांत सोन्याची वीट नाहीं हें पाहतांच ते मटकन् खालीं बसले आणि कपाळावर हात मारून त्यांनीं एखाद्या लहान मुलाप्रमाणें मुक्तकंठानें रडण्यास सुरुवात केली. आपल्या गुरूचा हा अद्भुत अवतार पाहून गोरखनाथ स्तंभितच झाले. ज्या सद्गुरूंच्या कृपा-कटाक्षानें आपलें सारें जीवन तसेंच हजारों शिष्यांचें जीवनहि सार्थ झालें, त्या विरागी मूर्तीनें एका सोन्याच्या तुकड्यासाठीं धाय मोकलून रडावें याचा अर्थच त्यांच्या लक्षांत येईना.

सर्वस्वाचा त्याग केलेल्या त्या तपोमूर्तीला सोन्याच्या तुकड्याचा लोभ करतांना पाहून त्यांचा स्वतःवरच विश्वास बसेना. आपल्या गुरूंच्या करुण विलापाचें गूढ त्यांना उलगडेना. जमलेल्या साऱ्या जंगलच्या लोकांनाहि त्या वृद्ध साधूचा विलाप ऐकून अतिशय वाईट वाटलें. सोन्याच्या एका विटेकरतां हा रडतो आहे हें पाहून त्यांना एका परीनें संताप आला; पण आज त्यांच्याजवळ ती सोन्याची वीट असती तर आपला केवढातरी फायदा झाला असता या विचारानें तेहि बेचैन झाले. गोरखनाथांनीं कृष्णेच्या अथांग खोल डोहांत ती वीट भिरकावून दिल्याचें मीननाथानें सांगितलें, तेव्हां तर ती वीट परत मिळण्याची आशाच संपली. तें ऐकून सारे-जण मोठमोठ्यानें ओरडूं लागले. इकडे त्या लोकांना आपली कड घेतांना पाहून मच्छींद्रनाथ अधिकच धाय मोकलून रडूं लागले. त्यांनीं आपली छाती व डोकें बडविण्यास सुरुवात केली.

जमिनीवर पडून ते गडबडां लोळूं लागले. त्यांचा तो करुणतम विलाप, तो उच्च स्वरांतला आक्रोश पाहून जमलेले सारे लोक गोरखनाथांना अद्वातद्वा बोलूं लागले. मच्छींद्रनाथांनीं काकुळतीनें साऱ्या लोकांना सांगितले कीं, " आपल्या शिष्यानें आपल्या साऱ्या जन्माची कमाई, आपल्या बायकोनें वेळप्रसंगीं उपयोगाला यावी म्हणून दिलेली प्रेमाची भेट उद्धटपणानें फेंकून दिल्यानें मी संकटांत सांपडलों आहे, मोठ्या खड्डयांत पडलों आहे. त्या धनावर या साऱ्या रानच्या लोकांना कितीतरी वर्षें जेऊंखाऊं घातलें असतें, त्यांना घरें बांधून दिलीं असतीं, तरीसुद्धां किती धन शिल्लक राहिलें असतें. " तेव्हां असल्या मूर्ख चेल्याला बरोबर घेतल्यानें मत्स्येंद्र-नाथांचें किती नुकसान झालें याची त्या लोकांना कल्पना आली व सर्वजण रागारागानें गोरखनाथांवर धांवून जाऊं लागले. कुणी आपल्या भाषेंत देतां येतील त्या शिव्या देऊं लागले. जमलेल्या स्त्रियांनीं, गोरखनाथांना तळतळाट देत बोटें मोडलीं. त्या जंगलच्या लोकांचा तो अनावर क्रोध निरनिराळ्या तऱ्हांनीं व्यक्त होत होता व तो पाहून मच्छींद्रनाथ अधिकच व्याकुळ होऊन रडत होते.

गोरखनाथ हा देखावा पाहून बराच वेळ स्तब्ध झाले. आपल्या गुरुच्या या शोकनाट्याचें त्यांनीं कांहीं वेळ मनांत कौतुक केलें. पण बराच वेळ होऊनहि तें संपेना तेव्हां मात्र ते उठले. " सोनें सोनें करून एखाद्या साध्या माणसासारखे शोक काय करतां आहांत ! तुमच्यासारखे थोरच असें वागूं लागले तर या लोकांनीं काय करायचें ? त्यांनीं आपले शोक-मोह कसे आंवरायचे ? त्यांचा धनाचा लोभ मग कसा सुटायचा ? त्यांना या धनाच्या लोभानें चोरी, दरोडे-खोरी, खून, मारामाऱ्या कराव्याशा वाटल्या तर त्यांना जंगली म्हणून हिणवण्यांत काय फायदा ? तुमचा हा लोभ, हे मायेच्या जाळ्यांत गुरफटणें पाहून साधु-बैराग्यांवर लोक कसा विश्वास ठेवतील ? " इत्यादि खूप गोरखनाथांनीं त्यांना सांगून पाहिलें, पण

आपल्या शिष्याचा उपदेश मनावर न घेतां मत्स्येंद्रनाथांनीं आपला विलाप चालूच ठेवला.

शेवटीं गोरखनाथ उठले. त्यांनीं मंत्र म्हणत आपल्या हातानें त्या पर्वत–शिखरावर जलसिंचन केलें व आपल्या गुरूंना रागानें म्हटलें, "घ्या किती हवें तेवढें सोनें!" त्याबरोबर सारा पर्वत दैदिप्यमान सुवर्णाचा होऊन लखलखूं लागला. जवळपासचा अंधःकारमय जंगलाचा सारा प्रदेश त्या प्रकाशानें न्हाऊन निघाला. त्यांच्या या अद्भुत सामार्थ्यानें जमलेले रामोशी, मांग, भिल्ल स्तिमित झाले. "गोरखनाथ महाराज की जय" या जयघोषानें सारा आसमंत दुमदुमून त्याचा नाद वर गगनांत गेला. सारे लोक गोरखनाथाभोंवतीं उल्हासानें नाचूं लागले. कपडे, फरशा, भाले आकाशांत उडवून साऱ्यांनीं जल्लोष केला. गुरूपेक्षां हा चेलाच मोठा आहे, महान् सामर्थ्याचा आहे याची सर्वांनाच जाणीव झाली मच्छेंद्रनाथहि एखाद्या नम्र शिष्याप्रमाणें गोरखनाथाजवळ येऊन त्यांची स्तुति करूं लागले, हात जोडूं लागले. तें पाहून इतरांनींहि गोरखनाथांना डोक्यावर घेऊन त्यांच्या नांवाचा जयजयकार केला.

बहुजनांची वृत्ति ही कुठल्यातरी फळाशिवाय कोणतेंहि काम करण्याची नसतें. त्यांना ज्या ठिकाणीं कांहीं प्राप्ति दिसेल त्या ठिकाणीं ते जीवहि टाकतील. चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं. फळ नसेल तर सत्कर्महि नको. कर्म करायचें तर तें फळासकट घेऊं, फळ टाकायचें तर कर्मासकट टाकूं असा हा लोकांचा स्वभाव आहे. चमत्काराशिवाय आम्ही कुणाला सत्पुरुष मानायलाच तयार होत नाहीं. चमत्कार हीच आपल्या देशांत अध्यात्मज्ञानाची कसोटी मानण्यांत येते. पण जिथें फलाकांक्षा असते तिथें अध्यात्मविद्या वाऱ्यालादेखील उभी रहात नाहीं. पण या लालची लोकमानसाला चुचकारण्याकरितां व अध्यात्मविद्येची गोडी लावण्याकरितां अनेक सत्पुरुषांनीं, थेट आद्य शंकराचार्यांपासून तों नवनाथ, तुकाराम,

ज्ञानदेव, रामदास व अनेक आधुनिक संतांपर्यंत, अनेक चमत्कार केल्याचें दिसतें. अगदीं प्रथम शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्याला शाळेंत जाण्याची गोडी लागावी म्हणून आपणहि एखादी लिमलेटची गोळी व इतर खाऊ देतों. त्या गोडीनें तरी तो शाळेंत जाईल व शिकण्याची गोडी त्याला लागेल हाच त्यामागचा उद्देश असतो. शिकणें हें साध्य असतें व त्याकरितां लिमलेटची गोळी हें साधन वापरावें लागतें. पण तेंच साध्य नव्हे हें आपणांस ठाऊक असते. पुढें विद्येची गोडी लागलेला विद्यार्थी अभ्यास न करण्याबद्दल तीच गोळी दिली तरी अभ्यास टाकण्याऐवजीं गोळीचाच त्याग करील. तोच प्रयोग संतपुरुषांना जनमानसावर करावा लागतो. उपासनांची खटपट करणाऱ्यांना प्रयत्नाचें फळ म्हणून कांहीं ना कांहीं अवश्य मिळतें, पण हें सर्व आतिमर्यादित व क्षणजीवी असतें.पण सद्गुरुंच्या आज्ञेप्रमाणें म्हणजे गुरुबोधाला अनुसरून व त्यावरच विसंबून जें जें केलें जातें वा हातून घडतें, त्याचा प्रभाव असा अद्भुत असतो कीं, एकाद्या झाडाला इतकीं फळें यावीं कीं त्याच्या भारानें तें झाडच मोडून पडण्याचा संभव निर्माण व्हावा, त्याचप्रमाणें फळांचा नित्य नवा वर्षाव होत राहतो.

गोरखनाथांकडे कौतुकानें पहात मत्स्येंद्रनाथ म्हणाले, " गोरखनाथा, तूं धन्य आहेस. तुझ्यासारखा परीस मला मिळाला असतांना हें सोनें घेऊन मी काय करूं? हंस मिळत असतांना कावळ्याला कशाकरतां जवळ घेऊं ? कामधेनूला सोडून ताकाकरतां दारोदार कां फिरूं ? अरे, खरें सोनें जवळ असतांना किमयेचें सोनें घेऊन काय करूं ? तुझ्यासारखा चिंतामणी जवळ असतांना उद्यांची चिंता कोण करील ? तूंच माझं सर्वस्व आहेस ! तूंच माझा गुरू आहेस ! "

गुरूंच्या या नात्यानें गोरखनाथांना आपल्या चमत्काराचाहि विसर पडला.पण ते मत्स्येंद्रनाथांची योग्यता जाणून असल्यानें नम्रतेनें त्यांच्या पायावर प्रणिपात करते झाले. "आपले सद्गुरु म्हणजे

अमूर्त चैतन्यच; उत्पत्ति-स्थिति-लयाला अदृश्य अधिष्ठानवत्! कारण सृष्टीच्या दिक्कालावगुंठित चित्रविचित्र प्रपंचानें झांकलें गेलेलें पण स्फूर्तिमात्रतेनें क्षणाक्षणांत व कणाकणांत संचारलेलें, तत्, चित् आनंदमय लीला सत्‌शिष्याला प्रत्यक्ष दाखविणारें जें अमूर्त चैतन्य, तेंच सद्‌गुरुरूपानें विलसत आहे. हें गुरुपण शिष्याचें रक्षण करतांना स्वतःचें गुरुपण सोडून लघुत्तमत्व स्वीकारतें, त्यामुळें शिष्यच जगांत सुप्रसिद्ध होऊन जातो, महापुरुष–सत्‌पुरुष म्हणून गौरविला जातो, वंदिला जातो. ज्यामुळें हें सारें घडतें तें गुरुपण असून नसल्यागत होतें." "**राखो जातां शिष्यातें, गुरुपणहि धाडिलें थितें**" असें होऊन बसतें. ज्या काठीवर शिष्याच्या थोरपणाची पताका फडकत असते ती काठी कुणालाच दिसत नाहीं. त्या पताकेचीच सर्वत्र द्वाही फिरते. तिचाच मोठेपणा सर्वांना माहीत होतो. तें गुरुपण शिष्याला पुढें करून त्याच्यामागें लपून बसतें, आणि लपूनच सारी मौज पहात राहतें. लोकांना केवळ शिष्यच दिसतो, त्याचीच वाणी त्यांना ऐकूं येते, त्याच्याच अद्‌भुत, सिद्ध राहणीचा विलास त्यांना दिसतो. लोकांना वाटते, हा सारा शिष्याचाच प्रताप. पण ही सद्‌गुरूचीच लीला असते. शिष्यानें 'इदं न मम' म्हणूनहि लोकांना तें पटत नाहीं. शिष्याच्या मागें राहून तें गुरुपण हें सर्व पहात असतें. त्या देखाव्यानें तें सुखावतें. शिष्याच्या माध्यमांतून तें गुरुपण या साऱ्या लीला करवीत असते.

"गुरुदेव, आपण ही लीला कशाकरतां केलीत?" गोरखनाथ नम्रतेनें म्हणाले, "आपल्याला कशाचीच कमतरता नसतांना ही सोन्याची वीट कशाकरतां बाळगलीत तें मला सांगाल काय?"

"गोरखनाथा," मत्स्येंद्रनाथ म्हणाले, "या भागांत आपण आलों. या दाट काळोखांत प्रकाशाचे किरण, ज्ञानाचे किरण जर कधींच प्रवेश करणार नाहींत तर इथला निबिडतम अंधार दूर होणार तरी कसा? या साध्याभोळ्या पण शूर लोकांत भक्तीचा,

प्रेमाचा संचार तरी कोण करील ? आपलंच ना तें काम आहे ? यांच्या भावभक्तीचा अंकुर त्यांच्यापुढें कांहीं भव्य दिव्य उभें केल्याशिवाय कां अंकुरणार आहे ? आतां भारतभरचे सारे संत-महंत आपण इथें आणून हा सारा प्रदेश हरिभक्तीनें माखून टाकूं या, यांच्याहि जीवनांत कोमल पुष्पपरागांचा बाग फुलवूं या."

थोड्याच वेळांत साऱ्या भारतभरचे संत, महंत, योगी, विरागी मत्स्येंद्रगडावर जमले. ईश्वरी प्रेमाच्या अद्‌भुत रसायनानें सारे सुस्नात झाले. नामघोषगौरवानें सारें आकाश दुमदुमून गेलें. सारे रामोशी, भिल्ल, मांग व जवळचे नागरजन या अपूर्व सोहळ्याकरतां एकत्र झाले. 'कृण्वंतो विश्वं आर्यम् !' साऱ्या विश्वाला आम्ही आर्य–सुसंस्कृत-बनवूं ही त्या प्राचीन ऋषीमुनींची घोषणा प्रत्यक्षांत आली. कनकासारख्या क्षुद्र नामाभिधानाचा त्याग करून कनकगिरीनें मत्स्येंद्रनाथांना स्वत:वरच स्थान करून देऊन मत्स्येंद्रगड हें नांव मोठ्या अभिमानानें धारण केलें. जिथें काळोख होता तिथें सर्वांग-सुंदर अद्‌भुत प्रकाश खेळूं लागला. या प्रकाशाचे किरण आंत-बाहेर सर्वत्र संचरले. त्या किरणांशिवाय कशाचेंच भान उरलें नाहीं. त्या अद्‌भुत, अमृत स्पर्शानें साऱ्या मानवी देहांतील कण न् कण पुलकित झाला. त्या कणांकणांतून आनंदाच्या लहरीवर लहरी उसळूं लागल्या. आज हजार वर्षे होऊनहि कृष्णामाईचे धवल, तरल तरंग त्याच चिन्मय विलासाचें गीत गात असतात व त्या पीयूषलहरींतून अमृताचे तुषार सर्वत्र, सर्वांतरीं उधळत असतात. गुरुश्रेष्ठ मत्स्येंद्रनाथांचें थोरपण अजूनहि कृष्णामाईला गुणगुणतांना ऐकून आपलें मन त्या मधुगुंजनानें तृप्त व शांत होतें.

● ● ●

## ६ : कृष्णातीरींचे ‘ भक्त, भागवत, भगवान् ’

एखाद्या विस्तीर्ण जलाशयाचें धवलशुभ्र अथांग जल सुदूरपर्यंत पसरलेलें असावें, त्या जलाशयावरचे धवल फेनतरंग वाऱ्याच्या झुळकीनें इतस्ततः पसरत असावेत, त्यांवर सूर्याचे सुवर्ण रंगानें माखलेले किरण थेट आरपार घुसून त्या अथांग जलावर जणुं हिरे, माणिक, मोत्यांच्या राशीच्या राशी ओतीत असावेत, आजूबाजूच्या काळ्याशार किनाऱ्यावर उगवलेल्या हरितरम्य गालिचानें त्या दृश्याला अधिकच उठावदार करावें, अशा या पार्श्वभूमीवर त्या हरितरम्य गालिचावरून अचानक काळ्याकभिन्न, धिप्पाड, मत्त गजांचा समुदाय त्या शांत, प्रसन्न पात्रांत घुसावा व त्यानें आपल्या धिप्पाड देहांनीं व प्रचंड सोंडांनीं तें सारें अथांग जल घुसळून काढून पाण्याचे अनंत तुषार अस्मानांत बेफामपणें उधळण्यास सुरुवात करावी, या गजसमुदायाच्या भयप्रद क्रीडेनें साऱ्या पात्रांत खळबळ माजून किनाऱ्याच्या दोन्ही थडांवर पाण्याचे लोटच्या लोट आपटूं लागून त्यांच्या ‘ थडक् थडक् ’ अशा निनादानें आसमंत गाजून उठावा; या अचानक उठलेल्या आवाजानें घाबरून जाऊन

पाण्यांत इतका वेळ बकध्यान लावलेल्या पांढऱ्याशुभ्र बगळ्यांच्या समूहानें आकाशांत झेंप घेऊन शत्रूचा शोध घेण्याकरतां त्या विस्तीर्ण जलाशयावर रांगारांगांनीं मोर्चा धरावा; आपल्या या प्रतिस्पर्ध्यांचा हा मोर्चा कुठल्या शिकारीवर अथवा शत्रुसैन्यावर लुटीकरतां धांवून जात आहे या चिंतेनें आपल्या कावकावच्या शंखध्वनीनें काळ्या कावळ्यांच्या समुदायानें पेंढाऱ्यांच्या बेशिस्तींत त्या धवलशुभ्र गणवेशधारी शिस्तशीर सैन्याच्या रांगेंत घुसून थैमान घालण्यास सुरुवात करावी आणि हा सारा कोलाहल पाहून आकाशांत अति उंच तरंगणाऱ्या घारी-गिधाडांनींहि या बक-काक समुदायाला कोणती येवढी लुटीची पर्वणी प्राप्त झाली आहे व त्यांत आपल्यालाहि वांटा मिळेल कीं नाहीं या चिंतेनें, या साऱ्या समुदायाच्या वरून तरंगत, आपल्या गिधाडी दृष्टीनें चौफेर पहात फिरूं लागावें, म्हणजे जें दृश्य निर्माण होईल तें दृश्य रामलिंग, बहे, नरसिंगपूर या त्रिस्थळींच्या परिसरांत निर्माण झालें आहे. नरसिंगपूरला आलेली कृष्णा प्रौढ, गूढगंभीर, विशाल, विस्तीर्ण होऊन अंगानें खूप सुटलेली चार बालकांची आई शोभते आहे. तिचें मुख प्रसन्न, शांत, तृप्त दिसतें. तिच्या विस्तीर्ण, शांत पात्रांत एखादा लहानसाच दगड जरी टाकला तरी त्यानें निर्माण झालेलीं वर्तुळें लहानाचीं मोठीं होत होत थेट दूरच्या कांठापर्यंत जाऊन भिडतांना दिसतात. जणुं लहान सहान प्रसंगांच्या द्वारेंच आपल्या शांत, स्वस्थ निर्मळ जीवनांत आपल्या सुकोमल बालकांना संस्कारित करणारी एखादी सुसंस्कृत कुटुंबांतील वयस्कर समाधानी माताच! त्या कुटुंबांत सारेच जणुं समजुतदार, सुसंस्कारित, त्यामुळें आरडाओरड, खळबळ, आदळ आपट, भांडणतंटा यांना वावच नाहीं. सारें कसें शांत, उदात्त, समाधानी वातावरण! त्यामुळें इथल्या कृष्णेला पाहून माणूस उचंबळत नाहीं, तर इथल्या गूढ, प्रसन्न वातावरणानें तो सुखावतो. पण हीच गहनगंभीरा ज्यावेळीं दोन मैलांवरच्या

रामलिंगला येते त्यावेळीं तिथें हें सारें स्वरूपच पालटतें. मघांशी शांत, गंभीर असणारी ती गूढहृदया इथें वेगानें खळाळू लागून उच्छृंखल, बडबडी, नटवी अशी होते. एखाद्या प्रौढ वृद्धेचा वृद्ध पति म्हातारपणानें उच्छृंखल होऊन ' नविये आवडीचेनि भरी ' मुली शोभणाऱ्या पोरीबाळींच्या मागें धांवूं लागावा व आपल्या नवऱ्याचा हा म्हातारचळी शृंगार व आपल्याकडचें दुर्लक्ष दूर करण्याकरितां तिनेंहि मग आपल्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर रंगरंगोटी करावी, निस्तेज डोळ्यांत काजळ-सुरम्याची रेघ ओढावी व तारुण्याच्या उसन्या अवसानांत ' बुढ्ढी घोडी लाल लगाम ' असा शृंगार करून त्या चळलेल्या नवऱ्याला आंवरायचा केविलवाणा प्रयत्न करावा, तसें कृष्णेचें हें उच्छृंखल वागणें पाहून वाटूं लागतें. एखाद्या वृद्धा पतिव्रतेनें जीवनांतील सारीं सुखदुःखें सोसून, जीवनाबद्दलची आसक्ति सोडून विरागिता धारण करावी, शृंगाराला व चंचलतेला तिलांजलि देऊन गंभीरता, गूढता धारण करावी, कथा-कादंबऱ्यांचें वाचन सोडून भक्त-भागवतांच्या कथा-तत्त्वज्ञान वाचावें, स्वतःच्या संसारापासून अलिप्त होऊन आजूबाजूच्या लेकी-सुनांच्या संसारांना निष्काम भावनेनें अडल्यापडल्यावेळीं मदत करावी अशी आपण अपेक्षा करीत असावें, या जीवनसमाप्तीच्या मार्गानें ती जाणार असें मानावें तोंच त्या स्त्रीनें एखाद्या नवयौवना स्त्रीचा शृंगार करायला लागून, आपल्याला अपेक्षाभंगाचा जोरदार धक्का देऊन दिङ्मूढ करावें तसें नरसिंगपूरला दिसलेल्या कृष्णेचें गूढ, गंभीर, निर्मल पात्र अधिक पुढें गेल्यावर आणखीच विस्तीर्ण, गूढगंभीर झालेलें आपल्याला दिसेल अशी आपली अपेक्षा असतांना रामलिंगाच्या जवळ येतांच तिला बालिश बडबड करीत, उड्या मारीत, फवारे उडवीत खळाळतांना पाहून आपण आश्चर्यचकित होतों. रामलिंगच्या जरा आधीं कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रांत काळ्याकभिन्न प्रचंड खडकांचे ढीगच्या ढीग सर्व पात्रभर एखाद्या हत्तींच्या कळपासारखे सर्वत्र रांगारांगांनीं

पसरलेले आहेत. उतारावरून सागराकडे वेगानें निघालेली धवलजला कृष्णा या प्रचंड राशीसमुदायावर वेगानें येऊन धडकते व इतका वेळ शांत असलेल्या तिच्या विस्तीर्ण पात्रभर प्रचंड खळखळाट होऊन सारें पाणी फेंसानें भरून जातें. कृष्णेच्या धडकीसरशी शिला-राशींच्या प्रतिकारानें तिचें खंडित जल तुषाररूपानें सर्व पात्रभर उडूं लागते. सूर्याच्या चकचकित किरणांनीं इंद्रधनूचीं सप्तरंगी धनुकलीं जिकडे तिकडे दिसूं लागतात. त्यांवर उडणाऱ्या शुभ्रधवल बगळ्यांच्या रांगा, काळ्याशार कावळ्यांच्या समुदायाची काव काव व काळ्या जमिनीवर दोन्ही बाजूला थेट क्षितिजापर्यंत पसरलेली उंसाची हरितरम्य विस्तीर्ण शेती यांमुळें साराच देखावा मोठा रोमांचकारी होतो. धवलहृदया कृष्णामाईचें मनहि येथें येतांच द्विधा झाल्यानें तिचें प्रचंड पात्रहि रामलिंग बेटाजवळ द्विधा होतें व कराडच्या प्रीतिसंगमानें एकत्र आलेल्या कृष्णा नि कोयना फुटून वेगळ्या होतात व रामलिंग बेटाच्या दोन्ही बाजूंनीं पूर्वींचीं नामरूपें—कृष्णा व कोयना—धारण करून वाहूं लागतात. पण या प्रेमळ बहिणींचा रुसवाफुगवा लगेच थांबतो व रामलिंग बेट मागें टाकतांच गट्टी फू सोडून पुन्हा त्या प्रेमळपणानें एकजूट करून कृष्णा या एकाच नांवानें वाहूं लागतात. त्यांच्या या मुक्त स्वैरपणाला, या खळखळाटाला, या वृद्धानारी पतिव्रतेचा, असूयेचा, उपेक्षेचा, जीवनाच्या हताश वृत्तीचा गंधहि नाहीं. उलट जीवनभर वैराग्याची कडक उपासना करून, खडतर तपस्या आचरून मिळवलेल्या उल्हसित वृत्तीचा, जीवन कृतार्थ झाल्यानें होणाऱ्या आनंदाचा त्याला सुगंध आहे. कृष्णेचा हा आनंद, उल्हास त्या प्रकारचा आहे. चंद्रकिरणें प्राशन करणाऱ्या चकोरानें वाळवंटाकडे पाहूं नये, आत्मसुखानें धालेल्या, नित्य तृप्त झालेल्या योग्यानें विषय सांडले यांत जसें नवल नाहीं, तसें कृष्णेनें भगवान श्रीरामाच्या पावन दर्शनानें तृप्त झाल्यावर असल्या क्षुद्र विषयवासना न ठेवतां आत्मानंदानें

उल्लसित होऊन धांवावें यांत नवल काय ? रामप्रभूचीं तीं आरक्त पदकमलें कृष्णेनें इथें द्विभंग होऊन कायमचीं हृदयांत सांठवल्यामुळें ती पूर्णार्थानें आनंदमयी झाली आहे, कृतार्थतेनें अंतर्बाह्य उजळत आहे, फुलत आहे, विहरत आहे.

हजारों वर्षांपूर्वीं लिहिलेल्या रामायण–महाभारतांसारख्या ग्रंथांची जादू भारतीय मनावर अजून कायम आहे. हे ग्रंथ नित्य-नूतन वाटतात याचें कारण या महाकवींची अपूर्व प्रतिभा व मानवी मनाची मोठ्या कुशलतेनें व मृदुतेनें त्यांनीं केलेली उकल हें आहे. विश्वाच्या रंगभूमीवरील नाटकांत काम करणाऱ्या प्रत्येक पात्राचें मन समजून घेऊन त्यांचें मोठें सुंदर, मनोज्ञ चित्र रेखाटलें आहे. त्यामुळें मानवी मनाचें सौंदर्य–कुरूपता, आशा–आकांक्षा–निराशा, हीण–अस्सल येथें हळुवारपणें प्रगट झालें आहे. त्यांतील कुठलेंच पात्र आपणांस अपरिचित वाटत नाहीं. उलट हीं सारीं पात्रें निरनिराळ्या रूपानें आजहि आपल्याभोंवतीं वावरत आहेत असा आपल्याला अनुभव येऊन त्या ग्रंथांची गोडी आपुलकीनें आप-णांस चाखतां येते. इथें कुठलेंच पात्र भडकपणानें एकांगी न ठेवतां हळुवार हातानें प्रत्येकांतले गुणदोष चितारले आहेत. त्यामुळें दुर्योधनाचें मित्रप्रेम, अभिमान, शौर्य जसें दिसतें तशी धर्माची भीरुता व हळुवारपणाहि दिसतो. कर्णाच्या सूडबुद्धीबरोबरच त्याचें दातृत्व, मित्रावरील निष्ठा व असीम शौर्य दाखवलें आहे. कुठल्याच पात्रांत संपूर्ण अवगुण वा संपूर्ण गुण न दाखवल्यानें तें चित्रण आपल्याच मनाचें प्रतिबिंब वाटतें. आपल्या मनाचे सारे संघर्ष, साऱ्या आशा-आकांक्षा, शंका–कुशंका यांचें एक भव्य चित्रण या ग्रंथांच्या रूपानें मोठ्या कुशलतेनें चित्रित झालेलें पाहून या ग्रंथांची अपूर्वता आप-ल्याला पटते. आपल्याच मनांतलें सारें रामायण-महाभारत जणुं महर्षी व्यास व आदिकवि वाल्मिकी शब्दबद्ध करीत आहेत. वाल्मिकींनीं

रेखाटलेला रावणहि असाच गुण-अवगुणांनीं रंगलेला आहे. समुद्राला जशी उधाण भरती येते तशीच फार मोठी ओहोटीहि येते, हा सृष्टीचा नियम आहे. तीच गोष्ट मानवी मनाची, सद्गुण–दुर्गणांची आहे. जो मानव विवेकी, प्रेमळ असतो तोच त्या आसक्तीनें मारला म्हणजे क्रोधी व अविवेकी बनतो. जीं माणसें फारशीं मायाळू नसतात, कांटेकोरपणें व्यवहार करतात तींच मनाच्या समतेची अधिक उपासना करून त्याचा तोल कधीं जाऊं देत नाहींत. पण ध्येयाकरितां वा मान-अपमानामुळें ज्यांना उधाण येते त्यांनाच अतीव, उत्कट अशा आनंदाचा लाभ होतो त्यांनाच तीव्र धक्के, तीव्र मनःक्षोभ यांना बळी पडावें लागतें. मुक्त हास्याची सीमारेषा मुक्त तीव्र रोदनानेंच रेखाटली जाते. रामायणांत आदिकवि वाल्मिकीनें याच स्वभाव-विशेषांचें रेखाटन मोठ्या कुशलतेनें केलें आहे. इथें रावणाच्या राक्षसी तीव्र स्वभावाचे सारे चढउतार मोठ्या मार्मिकतेनें प्रगट केले आहेत. तसेंच मनाच्या स्थितप्रज्ञ वृत्तीचें चित्रण रामरूपानें केलें आहे.

लंकेंतून कुबेरानें साऱ्या राक्षसजातीचा पराभव करून त्यांना निर्वासित केलें होतें. तेव्हां आपल्या जातीचा उच्छेद करणाऱ्या पराक्रमी कुबेरासारखा महान् योद्धा आपल्याकडे असल्याशिवाय कुबेराचा पराभव अशक्य आहे हें जाणून सुमाली नांवाच्या एका राक्षस-प्रमुखानें आपली देखणी कन्या कैकयी हिला कुबेराचाच बाप जो विश्रवा त्याच्याकडे पुत्रप्राप्ति होण्याकरितां पाठविलें. ‘कुबेरासारखा ऐश्वर्यसंपन्न पुत्र होण्यासाठीं तूं ब्राह्मण असलेल्या विश्रव्याशी लग्न कर’ असें तिला सांगितलें. पण विश्रव्यानें या अनार्य वंशाच्या मुलीशीं विधिवत् लग्न करण्याचें टाळून, प्रेमाचें सोंग मात्र केलें. या अनार्य कन्येला त्याच्यापासून रावण, कुंभकर्ण व बिभीषण हे पुत्र व शूर्पणखा ही कन्या झाली. आधींच सौंदर्याचा सार्थ अभिमान व ताठा असल्यानें तिनें पूर्वीं अनेकांना झिडकारलें

• ... ... संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अ... 36558 ...... वि: ..................
क्रमां ... नों दि 96-99-..


होतें. पण राक्षसजातीच्या अस्मितेकरतां तिनें बापाच्या सांगण्यावरून हा हीन अपमानकारक मार्गहि स्वीकारला. पण ज्या आर्य जातीचा उच्चपणा अनार्य स्त्रीशीं संबंध ठेवूनहि उच्चच राहतो त्या जातीबद्दल कमालीचा द्वेष, असूया तिच्या मनांत नक्कीच निर्माण झाली असेल. या ढोंगी धर्मपालनाला तिचे तळतळाटच मिळाले असतील. या विषाच्या ज्वलजहाल विषवृक्षाचें बीजारोपण त्या मानी स्त्रीनें रावण–कुंभकर्णांत नक्कीच केलें असेल. रावणासारख्या महापराक्रमी, बुद्धिमान, तपस्वी पुत्रानें आपल्या मातेच्या हा अपमान, ही उपेक्षा पाहून साऱ्या आर्य जातीबद्दल कमालीचा द्वेषभाव बाळगावा यांत नवल नव्हतें. आजहि आपण अशा तऱ्हेचा द्वेषभाव समाजांत ज्यांच्यावर पिढयान् पिढया घोर अन्याय झाले त्या जातीजमातींत पाहतोंच. त्या काळचा हा झगडा निरनिराळ्या रूपानें व नांवानें समाजांत अजून चालूच आहे. तो भारतांतच काय, पण इतरहि पुढारलेल्या देशांत चालू आहे. स्वतःला श्रेष्ठ मानून इतरांना तुच्छ लेखण्याची वृत्ति साऱ्या समाजांत जात, पैसा, सत्ता अशा अनेक आधारांच्या सहाय्यानें पूर्वींपासून जोपासली गेली आहे. माणूस त्या मानीव मोठेपणाशिवाय व दुसऱ्यांना हलके मानण्याशिवाय जणुं राहूंच शकत नाहीं. हे दुरभिमान, पददलित म्हणून स्वतःला जे म्हणवितात त्यांनाहि सोडतां आले नाहींत. आपल्या लहानशा डबक्याचाहि अभिमान जणुं कुणालाच सुटत नाहीं. कौरवपांडवांच्या काळींहि याच दुराभिमानानें एकलव्यासारख्या अनार्याला आपला धनुर्विद्येचा आधार असा अंगठा तोडावा लागला. एकलव्यानें तो त्याग केला, पण रावणाला तसें करण्याचें कारण नाहीं. आर्यांच्या साऱ्या तपस्या त्यानें वरचढपणानें पुऱ्या करून गोकर्णमहाबळेश्वरला व कैलासावर शिवाला प्रसन्न केलें होतें. आर्यांच्या साऱ्या यज्ञयागांच्यापेक्षां लंकेचें आकाश यज्ञांच्या धूमानें अधिक भरलें होतें. इंद्र, कुबेर आदि साऱ्या आर्यदेवताप्रमुखांचा त्यानें

पाडाव करून त्यांना कैदेंत टाकलें होतें. सहस्रार्जुन व वाली यांच्याशिवाय त्याचा साऱ्या पृथ्वीतलावर कोणी पराभव करूं शकला नाहीं. अजिंक्य, जगज्जेता म्हणूनच तो प्रसिद्ध होता. साऱ्या आर्य राजवंशाची, त्यांच्या आश्रयानें राहणाऱ्या ऋषिमुनींची त्यानें धूळधाण उडविली होती. अशा महान् सत्तेची धुंदी कोणाला चढणार नाहीं? ज्यांच्या हातांत दोन नव्या पैशांची सत्ता आली तेहि सत्तेनें बेभान, उन्मत्त झालेले आपण पहातों, मग जगज्जेत्या, पराक्रमी, तेजस्वी रावणाचा तो अहंकार फारसा गैर, मनुष्यस्वभावाला सोडून होता असें म्हणतां येणार नाहीं. साऱ्या आर्यवंशीय राजांपेक्षां त्याचें तपःसामर्थ्य अधिक होतें. गर्व उदंड होता. त्यांना तो कस्पटासमान मानीत होता. त्यामुळेंच त्याच्या तपस्येनें प्रसन्न झालेल्या ब्रह्मदेवाला **'सुपर्ण नाग यक्षाणां देवतानां तथा सुरैः। अवध्यत्वं तु मे देहि तृणभूता हि मानुषाः।'**–' मी गरुड, सर्प, यक्ष, देव व दानव या साऱ्यांना अवध्य असावें, बिचारीं इतर माणसें तर मला गवतासारखीं आहेत, त्यांच्यापासून मला भय नाहीं ' असा वर मागितला. यांत त्याचा दर्प, अहंकार, पराक्रम व स्वतःच्या गुणांची खात्री दिसते. अशा या महापराक्रमी, गर्विष्ठ रावणानें इंद्राच्या राजधानीपासून तों कुबेराच्या नगरीपर्यंत सारी पृथ्वी जिंकली. त्या राजपुरुषांना आपल्या पराक्रमानें संपूर्ण पराजित करून, त्यांची सारी संपत्ति, वैभव लुटून त्यांना कैदेंत टाकलें. पण यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या राजांच्या कुलस्त्रिया त्यानें आपल्या घरांत आणल्या नाहींत, त्यांच्यावर जुलूम अत्याचार केला नाहीं. त्या काळच्या राजांनीं असे जुलूम अत्याचार केल्याचे दाखले असूनहि रावण या बाबतींत अपवादात्मक चांगला होता. आजच्या या सुधारलेल्या युगांतहि एखाद्या अल्पसंख्य जातीच्या स्त्रियांना भररस्त्यावर विवस्त्र करून मिरवणुकीनें हिंडवल्याचें व या हिडिस, भयानक प्रकाराला षंढ बनलेल्या लोकांनीं अजिबात विरोध वा प्रतिकार न केल्याचें दुःखदायक वृत्त आपण

वाचतों. त्या प्रकारची, त्या अन्यायाची, त्या राक्षसी अत्याचाराची बोंचहि समाजांत विशेष प्रगट झाल्याचें दिसत नाहीं, खंतहि आढळत नाहीं. या पार्श्वभूमीवर रावणासारख्या अनियंत्रित जगज्ज्येत्याचा चांगुलपणा लक्षांत घेतला तर त्याची थोरवी अधिक वाटते. अशा या मानी, गर्विष्ठ, पराक्रमी रावणाचा सीतास्वयंवरांत शिवधनुष्य त्याच्या अंगावर पडल्यानें, तो कोसळल्यानें दारुण अपमान आर्य राजांच्या हंसण्यानें झाला असेल; ज्यांना त्यानें रणांत पळायला लावले ते सारे आर्यपुत्र अनार्य रावणाला हंसले असतील; रावणाच्या मानी मनांत ती जखम कायम स्वरूपांत राहिली असेल; हा सार्वजनिक अपमान त्याला असह्य झाला असेल. पुढें वनवासांत रामानें त्याच्या बहिणीची—शूर्पणखेची भ्राता लक्ष्मणाकडून नाककान कापून विटंबनाच केली होती. त्यामुळें क्रुद्ध झालेला रावण या आर्यपुत्रावर सूड घेण्यास उद्युक्त न झाला तरच नवल ! निर्मल, उदात्त रामचरित्रावर शूर्पणखेची विटंबना, वालीचा अकारण वध, व जंबूकावरचा अन्याय हे कलंकच वाटतात. शूर्पणखेच्या विटंबनेचा सूड घेण्याकरतांच रावणानें सीतेचें हरण करण्याचा उपाय केला असला पाहिजे. नाहींतर जानकीचें हरण करणें, त्याच्यासारख्या जगज्जेत्याला, तिचें रामाशीं लग्न होण्याआधीं अगदीं शक्य होतें. पण तें त्यानें केलें नव्हतें. त्यामुळें त्यानें सीतेला राक्षसस्त्रियांच्या पहाऱ्यांत ठेवलें तरी तिच्यावर पिसाट मोंगली अत्याचार करण्याचें त्याच्या एकंदर चारित्र्याकडे पाहतां कांहीं कारण दिसत नाहीं. शत्रूचा सूड घेणें हाच एक भाव त्यांत असावा. त्यानें सीतेची लंकेंत असतांना केलेली मनधरणीहि त्याच्या अ-पाशवी वृत्तीचीच निदर्शक आहे. आपला पराभव एका फक्त भगवान् विष्णूलाच करणें शक्य आहे व तेंहि आपल्याला मिळालेल्या वरानें भगवंताला मानवी रूप घेऊनच करावें लागेल हें त्याला ठाऊक होतें. त्यामुळें विष्णूनें घेतलेल्या रामरूपाकडे तो त्याच दृष्टिकोनांतून पहात होता.

पण एकदां वैरी म्हटल्यानंतर तितक्याच शौर्यानें तो तुटून पडला. सारे पुत्र, बंधू, मित्र, एकापाठोपाठ एक मारले गेल्यानंतर मंदोदरीनें 'रामाला शरण जा' म्हणून विनविले. त्यावर तो तिला सांगतो कीं—

**घातयिता राघवेण जिवामि वनगोचरः ।**
**रामेणसह योत्स्यामि रामबाणैः सुशीघ्रगैः ॥**
**विदार्यमाणो यास्यामि तद्विष्णोः परमं पदम् ।**
**जानामि राघवं विष्णुं लक्ष्मीं जानामि जानकीम् ॥**

—हे भद्रे मंदोदरी, युद्धांत राघवाकडून माझ्या पुत्र-मित्र-बंधूंचा वध करवून आतां मी राज्य सोडून तुझ्या सांगण्याप्रमाणें वनवासी कसा होऊं ? आतां तर मी रामाशीं युद्धच करीन व अमोघ रामबाणानें त्या विष्णुपदाला जाईन. कारण राम हा विष्णूचा व जानकी ही लक्ष्मीचा अवतार आहे हें मला ठाऊक आहे. तेव्हां रामाच्या हातून मरण येणें हें त्या विष्णुपदाला जाणेंच आहे.

रावणासारख्या महापराक्रमी, गर्विष्ठ, तपस्वी व जगज्जेत्या वीराला रामभद्रासारख्या ईश्वरी अवताराकडून युद्धांत आलेलें वीरोचित मरण लाचार जीवनापेक्षां अधिक कांक्षणीय वाटलें तर नवल काय !

**' हरेः पादः अतिश्लाघ्या अश्लाघ्यं खररोहणं,**
**स्पर्धाऽपि विदुषां श्लाघ्या अश्लाघ्या खलमित्रता । '**

—'सिंहाच्या पंजाच्या फटकाऱ्यानें आलेलें मरण हें गाढवावर बसून मिरविणाऱ्या लाचार जीवनापेक्षां अधिक चांगलें; दुष्टाच्या मैत्रींत अपमानित जीवन जगण्यापेक्षां विद्वान् पुरुषांशीं केलेल्या वैरानें भोगावें लागणारें मरणहि चांगलें, असें त्या मानी पुरुषाला वाटलें तर तें त्याच्या साऱ्या जीवनाशीं सुसंगतच ठरतें.

अशा या अनार्य परंतु भद्र, तपस्वी व पराक्रमी पुरुषाला रामचंद्रानें आपल्या पराक्रमानें युद्धांत नामशेष केलें होतें. स्वतःच्या कीर्तीच्या रक्षणाकरितां, जानकीच्या मुक्ततेकरितां तें अत्यावश्यक

काम होतांच श्रीरामानें 'मरणान्तानि वैराणि' (मरेपर्यंतच वैरभाव असावा, वैरी मेल्यानंतर तो वैरभाव ठेवण्याचें कारण नाहीं) हें जाणूनच बिभीषणाकडून रावणाची मरणानंतरची सारी उत्तरक्रिया यथासांग सन्मानानें करवून घेतली व तो पुष्पक विमानानें अयोध्येकडे परत चालला होता. त्यानें मारलेल्या रावणाचे दुर्गुण आतां रावणाबरोबरच गाडले गेले होते. आतां आठवत होतें तें त्याचें तप, त्याचा मानी स्वभाव, आर्य जातीनें केलेली त्याची उपेक्षा, अपमान! भगवान् रामचंद्राचें सारें जीवनहि अशा तापत्रयानें, क्लेशानें भरलें होतें. भरल्या राज्य-लक्ष्मीच्या ताटावरून त्याला उठावें लागून अनेक क्लेश, कष्ट त्याला सहन करावे लागले होते. त्याच्या पूर्वानुभवानें त्यानें रावणाच्या मानसिक यातना जाणून घेतल्या. एक आवश्यक गोष्ट म्हणून रावण—वध केला तरी एका तपस्वी, पराक्रमी, जगज्जेत्या पुरुषाच्या वधाला आपण कारण झालो ही बोंच त्याला लागून राहिली. हा कलंक धुवून टाकण्याकरतां, पापाचें परिमार्जन व्हावें आणि मनःशुद्धि व्हावी म्हणून, एका सुप्रभाती पुष्पक विमानांतून जानकी, लक्ष्मण, मारुती या परिवारासह कृष्णामाईच्या या सुंदर, पवित्र, प्रदेशांत तो उतरला. अयोध्येला जाण्याआधीं लंकेच्या हत्याकांडानें मलीन, उदास, खिन्न झालेलें मन पुन्हा प्रफुल्ल, उत्साहित, अमल व्हावें म्हणून कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रांतील एका उंच जागेवर शिवाची पिंडी स्थापन करून अनुष्ठान करण्यासाठीं तो इथें थांबला. सीतेच्या ऐनवेळीं आलेल्या मासिक रजोदर्शनामुळे त्यानें तिला जवळच्या बहे-तांबवे या गांवांत एका घरांत ठेवलें व मारुती, लक्ष्मणांच्या मदतीनें एका शिवलिंगाची स्थापना करून तो एकाग्रतेनें अनुष्ठानास बसला.

पण या परमपवित्र प्रसंगीं, आपल्या पात्रांत अनुष्ठान करणारी श्रीरामाची ती तपस्वी मूर्ति पाहून कृष्णामाईचा ऊर आनंदानें भरून आला. श्रीरामभद्राच्या दर्शनाकरतां ती उत्साहानें अनावर,

आनंदानें बेभान झाल्यानें प्रचंड खळखळाट करीत, उसळ्या मारीत वेगानें अनुष्ठान–स्थानाजवळ येऊन वाहूं लागली. तिच्या त्या कलकलाटानें, त्या उसळ्यांनीं सारा आसमंत निनादून गेला. पण तिच्या या उत्साहातिरेकानें, या बडबडीनें एकाग्रतेनें शिवध्यानांत मग्न असलेल्या आपल्या स्वामींची एकाग्रता भंग पावणार, या विचारानें रामसेवक हनुमंताला कृष्णेच्या या उच्छृंखल वृत्तीचा विलक्षण राग आला. रागारागानें तो कृष्णेच्या वरच्या पात्रांत शिरला. त्यानें आपले दोन्ही बाहू कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रांत पसरले व कृष्णेचा धांवणारा प्रवाह आपल्या विशाल बाहूंनीं अडवून, तिचें वहाणेंच त्यानें बंद करून टाकलें. आपल्या पात्रांत उभी राहिलेली ही प्रचंड भिंत ओलांडणें कृष्णेला अशक्य झालें. पण रामावरच्या प्रेमानें ती थेट उगमापासून वेग वाढवून वहातच राहिली. मारुतीच्या दोन प्रचंड बाहूंनीं त्याहि वाढणाऱ्या प्रचंड जलौघाला अडवून ठेवलें. कृष्णेचें पात्र त्यामुळें फुगूं लागून, थेट तिच्या उगमापर्यंत–महाबळेश्वरपर्यंत–जिकडे तिकडे, पाणीच पाणी झालें. जवळपासचीं नगरें, पुरें, तिच्या या प्रचंड पुरांत बुडूं लागलीं. माणसें, शेतीभाती सोडून वाट फुटेल तिकडे या वाढणाऱ्या पाण्याच्या भीतीनें पळत सुटलीं. जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. सारे देव, दानव, मानव, प्रभु रामचंद्राचा धांवा करीत रामलिंगला आले. पण कोपायमान झालेली महारुद्र हनुमन्ताची पाणी अडवून ठेवणारी, ती विशालकाय मूर्ति पहातांच सारे चूपचाप झाले. शेवटीं त्यांनीं कृष्णामाईलाच, या संकटाचें तूंच निवारण कर म्हणून प्रार्थना केली. तेव्हां त्या दोघी बहिणी कृष्णा–कोयना–मानवी स्त्रीरूपें धारण करून श्रीरामाच्या जवळ गेल्या व त्यांनीं हात जोडून त्याची स्तुति आरंभिली. रामचंद्राचें अनुष्ठान संपतांच त्यांनीं डोळे उघडून पाहिलें, तों या दोन बहिणी उभ्या. महारुद्र, परमसेवक हनुमन्ताला त्यांनीं कृष्णेचा प्रवाह सोडून देण्यास सांगितलें. रामाच्या आज्ञे-

बरोबर मारुतीनें आपलें विशाल बाहू उचलून कृष्णा-प्रवाहाला पूर्ववत् वहाण्यास परवानगीं दिली व तो फक्त शिवलिंगाच्या रक्षणाकरतां पूर्वभागीं जाऊन उभा राहिला. त्याबरोबर एकरूप झालेल्या दोन बहिणी पुन्हा विभक्त झाल्या व रामलिंगाच्या दोन बाजूंनीं, कृष्णा व कोयना या पूर्व नांवानें वाहूं लागून, या बेटानंतर पुन्हा एकरूप झाल्या. त्या दोघींच्या अंतःकरणांत गुंजलेली ही रामकथा गात, कृष्णा-कोयनेचें जल रामलिंग बेटाजवळ येतांच अजूनहि आनंदोर्मींनीं खळाळूं लागतें. रामलिंग बेटाला जलधारांनीं वेढून टाकण्याकरतां त्यांच्या पात्रांत पसरलेल्या काळ्याशार शिलाराशींवर आदळून आनंदाचें चीत्कार ते नील नभांतून घुमवतें. रामभद्रानें अनुष्ठानाकरतां स्थापिलेल्या त्या पवित्र शिवलिंगाचें रक्षण, अजूनहि वज्रदेही हनुमान, वेगानें धांवणाऱ्या कृष्णा प्रवाहाला आपल्या मजबूत देहानें अडवून, करीत आहे. श्रीरामासमोर नेहमीं नम्रतेनें, भक्तीनें लीन दिसणारा हा दास इथें कुसुमांचें मृदुत्व सोडून 'वज्रादपि कठोराणि' असा झालेला दिसतो. त्याच्यासमोरच, त्याच्याकडे पाठ असलेल्या रामलक्ष्मणाच्या सुबक मूर्ती, त्या शिवलिंगाकडे, अजूनहि ध्यान धरून बसलेल्या आहेत. श्रीरामाची प्रियदर्शिनी जानकी मात्र समोरच्या बहे गांवच्या मंदिरांत बसून आपल्या हृदयवल्लभाची पूजा-अनुष्ठान-संपून, आपण त्या रम्य अयोध्या नगरीकडे केव्हां जातो, याची वाट पहात आहे. रामकथा-गंगेचा हा पावन ओघ द्वापारयुगापासून वहात आहे. आपलें जीवन शुद्ध, पवित्र, निर्मल करण्याकरतां, या भक्त—भगवानांची भागवत—कथा ऐकण्याकरतां अनेक रामदास इथें आले. समर्थ रामदासांच्या अकरा हनुमंतांपैकीं एक जण इथें बह्यांत येऊन राहिला. त्यांच्यानंतर इथें रहाणाऱ्या एका तपस्व्यानें, आपल्या तपोबलानें कृष्णामाईला येवढें भुलवलें कीं, त्याचा नैवेद्य ती आपला हिरण्मय कंकण असलेला हात त्या जलांतून वर काढून रोज ग्रहण करी. त्याच्या या भक्तिप्रेमाची, तपस्येची

कीर्ति ऐकून रामदास पंचायतनांतले सुप्रसिद्ध संत, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर त्याच्या दर्शनाकरतां आले. पण ब्राह्मण दर्शन देण्यास ताठ्यानें बाहेर येईना. शेवटीं आनंदमूर्ति देवळालाच साष्टांग नमस्कार करून तसेंच करवीरला गेले. पण इकडें कृष्णामाईनें त्या संतमूर्तीचा अपमान केला म्हणून स्वतःच्या हातानें ब्राह्मणाचा नैवेद्य घेण्याचें बंद केलें. ब्राह्मणहि हट्टाला पेटून प्रायोपवेशन करूं लागला. शेवटीं कृष्णेनें त्याला दृष्टांत दिला-व मग आनंदमूर्तींना शरण जाऊन ब्रह्मनाळहून त्यानें त्यांना पुन्हा रामलिंग बेटावर आणलें. मोठा उत्सव साजरा करून त्यांचा सत्कार केला व मग कृष्णामाईनें आपलें हिरण्मय कंकणयुक्त दोन्ही हात, पात्रांतून वर काढून त्याचा नैवेद्य ग्रहण केला. आजहि इथली ही चमत्कार-परंपरा अजून चालू आहे. बहे गांवांत रहाणारे श्री तुकाराम महाराज उर्फ तुकाराम बाळा निकम हे साधु पुरुष कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रांतून, आपण सांगू त्या ठिकाणाहून, आपण मागूं तो प्रसाद, रिकाम्या हातानें जाऊनहि काढून देतात. १८९५ सालीं जन्मलेले, वारकरी पंथाचे हे साधुपुरुष इथले पिढीजात रहाणारे. त्यांच्या धार्मिक मातेच्या संस्कारांत वाढलेले, खानापूर तालुक्यांतले गार्डी धनवाडच्या, जन्मभर अखंड मौन पाळणाऱ्या, कुलकर्णी महाराजांचे हे सत्शिष्य. या कुलकर्णी महाराजांचा मुक्काम अनेक वर्षें इथें होता. पलुसच्या सत्पुरुष धोंडीबुवांचें त्यांच्यावर फार प्रेम. त्यांनींच तुकाराम महाराजांना या कुलकर्णी महाराजांकडे पाठवले. त्यांनीं केलेल्या अनेक चमत्कारांनीं त्यांची निष्ठा तिथें कायम झाली. कुलकर्णी महाराजांनीं समाधि घेतल्यावरहि तुकाराममहाराज तेवढयाच निष्ठेनें त्या समाधीची सेवा करूं लागले. त्यांच्या कृपेनें यांनाहि अनेक सिद्धी प्राप्त झाल्या. गुरूंच्या पुण्यतिथीला हजारों लोकांना ते अन्नदान करीत व त्यांत कधीं तुटवडा येत नसे. आम्हीं ज्यावेळीं बुवांना फारच आग्रह केला, तेव्हां आमच्या रिकाम्या

रुमालाची घडी आम्हांला झटकायला सांगून बुवांनीं, आम्ही मोठ्या दक्षतेनें पहात असतांना, त्यांना आमच्या हातांतल्या रुमालाला हातहि लावूं दिला नसतांना, त्यांतून पेढे, खडीसाखर, कुंकू, बुक्का इत्यादि अनेक प्रसादाच्या वस्तूंचा आमच्यासमोर बैठकीच्या मध्यभागीं, पांच-पन्नास लोकांसमोर ढीग पाडला. कृष्णेच्या प्रवाहांतून सांगू तेथून बुडी मारून बदाम, मनुका, बेदाणा, कोरडें हळदकुंकू, बुक्का इत्यादि वस्तू काढून दिल्या. त्यावेळीं लोकांनीं दिलेल्या लंगोटी-शिवाय त्यांच्या अंगावर लपवण्यालाहि कांहीं नव्हतें. बुवाहि नेहमी मौन पाळतात, पण त्यांच्या खाणाखुणाहि शब्दांपेक्षां अधिक आशय व्यक्त करतात. एखाद्या गरीब शेतकऱ्यासारखा साधा मांजरपाटाचा कुडता व धोतर असा त्यांचा वेश असतो. डोक्यावरच्या जटा व गळ्यांतल्या तुळशीमाळा यांशिवाय त्यांच्या अंगावर कांहींच दिसत नाहीं. एका चंद्रमौळी झोपड्यांत राहून ते व त्यांचा मुलगा शेती करतात. त्यांच्या या अद्‌भुत् शक्तीचा परिचय झालेला माणूस मग कृष्णेच्या उगमाच्या दिशेला वळून नरसिंगपूरच्या शांत, प्रसन्न, विस्तीर्ण डोहाजवळ येतो.

पांच शतकांपूर्वीं किर्लोस्करवाडीच्या जवळच्या कुंडलला एका राजधानीचें भाग्य प्राप्त झालेलें होतें. तिथला क्षत्रिय राजा परम धार्मिक, पराक्रमी व देवदेवतांचा भक्त होता. एकदां कृष्णेच्या रम्य परिसरांत ससैन्य भ्रमण करीत असतांना त्याला स्वप्न पडलें. त्यांत त्याला एक नरसिंहाची सुंदर मूर्ति कृष्णेच्या पाण्यांतून आपल्याला वर काढ म्हणून सांगतांना आढळली. राजानें सारे सैनिक कृष्णेच्या विस्तीर्ण डोहांत उतरवले व शोधाशोध सुरू केली. त्याला देवदेवतांच्या अनेक मूर्तीं तिथें विसावलेल्या दिसल्या. मूर्तीं आढळतांच तो जवळच्या गांवकऱ्यांच्या संमतीनें त्यांच्या गांवांत त्यांची स्थापना करूं लागला. जवळपासच्या साऱ्या गांवांतून लोकांचे थवेच्या थवे या मूर्तीं शोधण्याचें काम पहायला येत होते. पण अनेक

दिवस प्रयत्न करूनहि स्वप्नांतील नरसिंह मूर्तीचा शोध लागेना. राजा हट्टाला पेटला. त्यानें मूर्ति सांपडेपर्यंत उपोषण करण्याचा निर्धार केला. तीन दिवसांनीं राजाला स्वप्नांत मूर्तीचा ठिकाणा दिसला. सकाळींच राजानें आपले पाणबुडे तिथें उतरवले. अनेक बुड्यांनंतर नरसिंहाची मूर्ति पाणबुड्यांनीं वर काढून कृष्णेच्या तीरावर आणून ठेवली. चमचमणाऱ्या काळ्या गंडकी शीळेची ती भव्य मूर्ति पाहून राजाचें देहभान हरपलें. जणुं नरसिंहाची सचेतन मूर्ति कलाकारानें अचेतनांत साकार केली होती. नरसिंहाच्या तोंडावर, भक्त प्रल्हादाला छळणाऱ्या हिरण्यकश्यपूचें पोट, त्याला आपल्या मांडीवर घेऊन फाडतांना जणुं भक्ताच्या हालअपेष्टांच्या आठवणीनें, मूर्तिमंत क्रोध उमटला होता. त्याचे प्रचंड सुळे, विक्राळ तोंड, शक्तिस्वरूप अष्टभुजा व हातांत धारण केलेलीं शंख, चक्र, गदा, इत्यादि आयुधें व एखाद्या पहिलवानाला लाजवणारें शरीरसौष्ठव, मांडीवर पडलेल्या हिरण्यकश्यपूची शेवटची धडपड व या भगवन् रूपाला ' शांत हो, सौम्य हो ' म्हणून प्रार्थना करणाऱ्या प्रल्हादाची नम्र मूर्ति व या नरसिंहरूपाच्या मागें, दशावताररेखांकित करणारें सुबक वलय, यांमुळें ही मूर्तिमंत सौंदर्यप्रतिमा कुंडलला आपल्या राजधानींत न्यावी, अशी राजाला इच्छा झाली. सेवकांनीं मूर्ति मोठ्या कष्टानें, सावधानतेनें वरच्या चढावर नेली. पण तिथें जातांच मूर्ति एकदम अतिशय जड झाली. राजसेवकांनीं रात्र झाल्यानें नाइलाजानें ती तिथेंच पहाऱ्यांत ठेवली. रात्रीं राजाला स्वप्नांत मूर्तीनें आदेश दिला कीं माझी स्थापना मी सध्यां आहे तिथेंच कर, कुंडलला येण्याची माझी इच्छा नाहीं. मूर्ति हलण्याचें चिन्ह न दिसल्यानें नाइलाजानें राजानें तें मान्य केलें. मूर्तिभोंवतीं एक कोट बांधण्यांत आला व कृष्णेच्या पुरापासून त्या मंदिराला सुरक्षित करण्यांत आलें. पण मूर्ति तटाच्या उंचीच्या खूप खालीं असल्यानें भुयार तयार करून

अनु. क्र. 35558 दि:
क्रमांक नों. दि:


त्यावर मग विस्तीर्ण मंदिर बांधण्यांत आलें. आजहि मूर्तीच्या दर्शनाकरतां या मंदिराच्या तळघरांतच उतरावें लागतें व त्याकरतां खूप वळणें घेणारें व एकसारखें खोल जाणारें मोठें भुयार ओलांडावें लागतें.

१८५७ च्या क्रांतियुद्धानंतर सेनापती तात्या टोपे यांचे एक चिरंजीव या भुयारांत येऊन राहिले होते. इंग्रजांच्या विरुद्ध झालेल्या उठावांत अपयश आल्यानें, त्यांनीं इथें येऊन नरसिंहाची उपासना सुरू केली. दिवसभर ते या तळघरांत उपासना करीत व रात्रौ भगव्या वस्त्रांत कृष्णामाईच्या परिसरांत मुक्त जल-वायूंच्या सहवासांत आपली साधना चालू ठेवीत. या स्वामी महाराजांची देहयष्टि अत्यंत भव्य असून त्यांचीं पावलेंच जवळजवळ एक फूट लांबीचीं होतीं व ते चालत त्यावेळीं जमीन हादरत असे. जवळ जवळ साडे सात फूट उंचीचे, भव्य व तेजःपुंज देहयष्टीचे हे स्वामी वयाच्या शंभर वर्षांपर्यंत जगले. गांवच्या देशभक्त पाटलामुळें ब्रिटिशांना यांचा तपास देशांत सर्वत्र सामसूम होईपर्यंत कधींच लागला नाहीं. स्वामी योगक्रियेंत अतिशय निपुण असून, ते लोकांत फारसे मिसळत नसत. मौनावस्थेंतच रहात. त्यांनीं देहविसर्जन करण्याच्या दिवशीं आपल्या विश्वासाच्या व्यक्तींना बोलावून आपण कोण त्याचा खुलासा केला व आपली समाधि कृष्णेच्या विशाल पात्राच्या किनाऱ्यावर बांधण्यास सांगितलें.

या धवलजला कृष्णेच्या कांठीं या रम्य स्थानीं आल्यावर माणसाचें खरोखर भान हरपतें. या सुरतटिनी मातेचे नील नभांत उडणारे तरंग, तिचें प्रसन्न, हास्यानें खळखळणारें धवलपात्र पाहून, त्याच्या हृदयाच्या साऱ्या ग्रंथी सुटतात. मन मोकळें होऊन भावभक्तीनें तो त्या पावन भक्त, भागवत, भगवान यांच्या प्रेमळ कथांनीं पुलकित होतो. सर्व अंग प्रत्यंगांतून एका प्रेममय अनुभूतीचा संचार होतो. डोळे त्या श्यामल रामभद्राला सर्व विश्वांत पसरलेला पहातात. कृष्णेच्या त्या कलरवांतून, त्याला त्या मधुरातिमधुर शब्द ब्रह्ममयी वेणुध्वनीचे नाद ऐकूं येतात. नासिका नित्यनिरंतर सौरभाचा अनु-

भव घेते. जिव्हा त्याच प्रेमसुधेचें पान करतें. आकाशांत तोच नाद, वायूंत तोच स्पर्श, जलांत तोच रस व पृथ्वींत तोच अमृतगंध त्याला येतो. जणुं भगवंताच्या अमृतानुभवाचा स्तोत कृष्णारूपानें वहातो आहे. त्यामुळें सर्वत्र प्रेमच प्रेम, आनंदच आनंद, अमृतच अमृत त्या धवल तरंगांच्या उडणाऱ्या अनंत बिंदूंतून जणुं क्षणाक्षणाला अखंड उधळत आहे असें त्याला वाटतें. स्वतःचें अस्तित्व लोपून आपणच जणुं या साऱ्या रूपानें, अनुभवानें नटलों आहोंत व आपल्याशिवाय दुसरें कांहीं नाहींच असें त्याला वाटूं लागतें.

●●●

## ७ : प्रीति संगमावरील श्रुति-स्मृति तरंग

एखाद्या गूढ, निबिड, एकान्त स्थळीं आपण अंधुक सांजवेळीं बसलेलें असावें, दूरचें स्पष्ट तर दिसत नाहीं पण दिसणें लोपण्याइतका गडद अंधारहि झालेला नसावा, दुरून कुठल्यातरी मधुर संगीताचे श्रुतिमधुर आलाप ऐकूं येत असावेत, त्या श्रुतिमधुर संगीताच्या लहरींबरोबरच मधूनमधून मुरलीची, मृदुंगाची, किंकिणीची तालबद्ध लय संगतीला असावी, पण त्या आनंददात्री संगीताचा निर्माता तर न सांपडावा; या स्वरमधुर आलापांच्या लहरी आपणांस रमवीत असतांना मध्येंच विलाप-शोकाचे हृदयद्रावक, कर्णकटु स्वर ऐकूं येऊन मनावर उदासीनता, खिन्नता यांचें मळभ दाटून येऊन रसभंग व्हावा; वरच्या चमचमणाऱ्या नील नभोवितानांतून उल्हास-उत्साहाच्या चंदेरी, अमृतधवल चांदण्याचा अंगावर वर्षाव होऊन रोमरोमांतून सुखाच्या लहरी उसळून याव्यात, तर क्षणांत त्या शारदीय चंद्राच्या साऱ्या प्रभाविलासाचा लोप काळ्याकुट्ट मेघांच्या समूहानें करावा, आणि सारें अंग शिरशिरून टाकणाऱ्या थंडगार वायूच्या झुळुकेनें अंगाला थंडीचा गार हात लावावा, दूरवर अद्‌भुत,

स्तब्ध शांतता पसरलेली असावी, रातकिड्यांचें गुंजनहि थांबलेलें असावें, या अपूर्व शांतता-साम्राज्याशीं आपलें अहर्निश विकार पावणारें मनहि उन्मनस्क होऊन एकरूप होऊं पहात असावें, स्वशनाचाहि व्यापार थांबलेला असावा, शरीर निश्चल झालेलें असावें, नेत्र अर्धोन्मीलित व्हावेत, अशावेळीं मधूनच कुठेंतरी गिधाडाच्या कर्णकटु चीत्कारानें या अवस्थेला बाध यावा; उच्च पातळीवर स्वच्छंद विहरणारा, पंख पसरून हवेंत तरंगणारा निर्भय, निश्चित मनाचा पक्षी या स्वच्छंद विहाराच्या आनंदातिशयानें भारला जात असावा, तोंच वरच्या स्तरावर आपल्या दाहक नजरेनें पहाणारा, एखादा क्रूर बहिरी ससाणा दृष्टीस पडावा व या निरागसानें झटकन् आपले पंख मिटून भूमीवर आपटावें। आणि तो आनंदमय, स्वच्छंद विहार क्षणांत संपून दुःखानें, आघातानें त्यानें विव्हळत पडावें, तसेंच कृष्णामाईच्या अतिपुरातन प्रीतिसंगमावर येऊन त्या जलराशींच्या, प्रीतिलहरींच्या अद्‌भुत मीलनाकडे पाहून आपल्याला होतें.

अशा या जलराशींच्या चौफेर पसरलेली काळी, कसदार भूमि, त्या श्यामलेच्या अंगावर आनंदानें डोलणारे हरिततृण-धान्याचे रोमांच, त्या विस्तीर्ण परिघाच्या कडेला आपल्या उंच शिखरांनीं आकाशाला गवसणी घालूं पाहणाऱ्या या श्यामल वर्तुळा-भोंवतीं हातांत हात घालून फेर धरणाऱ्या हरितरक्त गिरीमाला व मध्यभागीं या संगमाच्या कडेला उभी राहून आपल्या भव्य राऊळ देऊळांनीं शोभणारी वृद्धानारी क्ऱ्हाडनगरी, हा सारा देखावा पाहून आपलें मन भारावून जातें. त्या संगमजलाकडे आपण अनिमिष नेत्रांनीं तन्मय होऊन पाहूं लागावें तों आपल्या हें लक्षांत येतें कीं, हा प्रीतीचा जलसंगमहि सातत्यानें भासत असला तरी तो तसा नाहीं. क्षणाक्षणाला त्या प्रवाहांतील जीवन बदलत आहे. म्हणजे येत आहे नि जात आहे. क्षणाक्षणाला त्यांतील बिन्दू न् बिन्दू

आपल्या स्थानापासून दूर दूर जात आहे. त्या बिन्दूच्या ठिकाणीं नवे नवे बिन्दू येतात नि क्षणांत ते स्थान सोडून जातात. पुन्हा त्यांची जागा दुसरे भरून काढतात. या प्रचंड जलराशींत कुणालाच एके ठिकाणीं क्षणकालहि राहतां येत नाहीं. त्यामुळें हा संगम-प्रवाह, हा देखावा एक भास आहे, पण क्षणाक्षणाला बदलणारा जलबिंदु हें सत्य आहे. देखाव्यानें मोहित होऊन सत्याकडे पाठ फिरविणें म्हणजे भ्रमात्मक जीवन जगणें. नित्य बदलणाऱ्या जलबिंदूंप्रमाणें आपल्याला येत असलेले अनुभव, ज्ञानदेखील येतें आणि जातें. त्यांचा हा नैसर्गिक स्वभाव आहे. त्याकडे लक्ष देतां, जें येत असतें व जात असतें त्यांपैकीं जें आवडेल तें तसेंच रहावें, तसेंच असावें, तें जाऊंच नये असें वाटणें तीच वासना. म्हणून वासना निसर्गनियमांविरुद्ध असते. तीच, मृत्यूचें, म्हणजेच जें आवडतें, हवेंहवेंसें वाटतें—असावेंसें वाटतें त्याच्या वियोगाच्या वा नाशाच्या भयाचें बीज मनांत रोंवते. भयाचें हें यथार्थ स्वरूप लक्षांत येतांच तें आपोआप नाहींसें होतें. आणि मग प्रवाही पाण्याचें येणें व जाणें जसें एकरूप असतें, तशींच जीवन आणि मरण हीं एकरूप आहेत, चैतन्यप्रवाहाचीं तीं अविभाज्य अंगें आहेत याची साक्ष पटते. या प्रवाहाच्या बाह्य रूपांतहि मग ही एकरूपता पहातां येते.

वर्षाऋतूंत घोंघों करीत येऊन, शांत स्वभावी कृष्णामाईला आपल्या आडदांड हातांनीं विळखा घालणारी उन्मत्त स्वभावाची कोयना आपल्या जलप्रवाहाचें तांडव आपल्या या शालीन भगिनीला दूर लोटून करते. कृष्णेच्या अभिजात शालीनपणानें, जन्मजात उच्च जीवनानें ती जरी अशी विनयानें, आपल्या या आडदांड अत्युत्साही कोयनाभगिनीच्या एका बाजूनें संकोचते तरी तिला हें ठाऊक आहे कीं, शेवटीं या आडदांड, उछृंखल पण निष्पाप पोरीला आपल्याच

मायेच्या पदराआड व्हावें लागेल. त्या प्रौढत्वाच्या, समजूतदारपणाच्या अबोल, शालीन वर्तनानें शेवटीं कोयनेला आपल्या या मायाळू भगिनीच्या पदरांतच लाजून, संकोचून लपावें लागतें, व ती कृष्णामय होऊनच पुढें प्रवासाला निघते. शारदीय चांदण्यांत उत्साहाचें, आनंदाचें वस्त्र पांघरलेला हा जलसंगम ग्रीष्मांत कृशतनु होऊनहि आसमंतांतल्या वासंतिक महोत्सवाची तयारी करण्यांत गढून जातो. हे सारे उन्हाळे–पावसाळे पाहूनहि कृष्णा-कोयनेचा तो प्रीतिसंगम तसाच अखंड भासतो. पण त्यांत अखंड क्रिया-प्रक्रिया, जनन-मरणाचीं स्पंदनें हीं होत असतातच. नित्य-नूतनताच त्या अखंडत्वाच्या रूपानें सळसळत असते. तिच्या तटींच्या नगरीचेहि अनादि कालापासून असेच क्षणाक्षणाला विरणारे, स्फुरणारे असे श्रुतिस्मृतितरंग दिसतात. पण ती तीच भासणारी नगरी क्षणाक्षणानें, कणाकणानें एकसारखी बदलत आहे. हा तरंग उठला, विरला; पुन्हा दुसरा तिसरा...शंभर–हजार–लाख–अनंत अशा श्रेणीनें अनादि कालापासून हें चाललें आहे. त्यांतला एक बिंदू पहावा तर तो क्षणांत नाहींसा होतो. त्याची जागा दुसरा–तिसरा याप्रमाणें घेतो. क्षणाक्षणाला हा बदल, ही जडणघडण, हें जननमरण चालू आहे. पण भास मात्र एकत्वाचा आहे. जीवनांतील सारी मौज, सारें सत्य, शिव, सुंदर, सारी सत्‌चित् आनंदमयता येण्या-जाण्याच्या, जीवनमरणाच्या, घटित–विघटित होण्याच्या प्रक्रियेंतच सांठली आहे. या प्रक्रियेचें दर्शन घडतांच आनंदमय सत्य, साक्षात्कार काय आहे याची क्षणकाल का होईना साक्ष पटते. आवड–नावड–निवडशून्य जाणीव, अक्रिय, अविकारी अशा अखंड पण तरलतम सावधानतेनें क्षणाक्षणाला कायम ठेवतां आली तरच सत्यसाक्षात्कार संभवनीय आहे. ही क्षणक्षणता म्हणजेच अनंताचें स्पंदन आहे. आपल्या अंतःकरणाला बद्ध करणारी अशी एकहि वासना व तज्जन्य आशा–आकांक्षात्मक ध्येयेंहि तरंगलीं नाहींत तर

सर्व जीवनव्यापी सघन शांति व तिचेच क्षणाक्षणाला स्फुरणारे, दिसणारे, विरणारे तरंग यापरता आपल्या मनांत कृष्णामाईचे हे श्रुतिस्मृतींचे तरंग पाहून दुसरा अर्थ स्फुरणार नाहीं. या शांती-च्याच महोदरांतून हें समग्र ब्रह्मांड आकारास आलें आहे आणि चित्रवैचित्र्यानें नाचत-बागडत आहे याचें आपणांस ज्ञान होईल.

अनंत कालाच्या दाट काळोखांतून श्रृति–स्मृति–पुराण इतिहा-साच्या अरुणोदयाकडे आपलें लक्ष वेधलें म्हणजे त्या अरुणप्रभेच्या पहांटफुलींत आपणांस दूर क्षितिजावर अंधुक अंधुक आकृती दिसूं लागतात. त्या आकृतींच्या आकाराच्या भासावरून आपण आपल्या कल्पनेचें वारू भरधांव सोडले म्हणजे त्या अरुणप्रकाशांतल्या चित्रा-कृती जराशा स्पष्ट होऊं लागतात. आपल्या स्मरणाच्या जरतारी सणंगाच्या कडा चमचमूं लागतात. हा पीतांबर, ही पैठणी, हा शालू, हा सणंगाच्या संगतींत राहणारा बासनाचा साधासुधाच कपडा इत्यादि खाणाखुणा पटूं लागतात. तें बासन व त्या मौलिक आभरणांची रास यांचा आपल्या गरजेप्रमाणें हवा तसा उपयोग करतां येतो. जें पहावेसें वाटतें, तें पाहतां येतें. जें नकोसें वाटतें तें त्या अल्पमोली बासनांत घडी करून ठेवतां येतें.

स्कंद पुराणान्तर्गत करहाटकमाहात्म्य सांगते——

**मध्यदेशे महाक्षेत्रंनाम्ना श्रीकरहाटकं ।**
**यत्र श्रीकृष्णवेण्यायाः कुकुद्मत्यास्ति संगमः ।।**
**तादृशः संगमः पक्षिन् नास्ति भूमंडलेःक्वचित् ।**
**यत्रोत्तरो महालक्ष्मी ब्रह्मविद्‌भिः सुसेविता ।।**
**वर्तते पीठमध्यस्था देवी सर्वार्थदा नृणाम् ।**
**साध्वष्ट गुणसम्राज्ञी सायुधा स्वगणैर्वृता ।।**

मध्य देशांत ‘श्रीकरहाटक’ नांवाचें एक महान् क्षेत्र आहे.

तिथें श्रीकृष्णावेण्यांचा कुकुद्मति ऊर्फ कोयना हिच्याशीं अतिमनोहर असा संगम आहे. असा प्रयागसंगम इतर कुठें असण्याचा क्वचितच संभव आहे. या महाक्षेत्रीं विद्वान् दशग्रंथी ब्राह्मण, कर्मउपासना करणारे अग्निहोत्री ब्राह्मण, ब्रह्मचारी, संन्यासी, गृहस्थी, जपी—तपी, साधु-योगी असे नाना तऱ्हेचे श्रेष्ठ उपासक, त्या ठिकाणीं असलेल्या जगदंबा श्रीमहालक्ष्मीची सेवा करून आपलें जीवन सार्थकी लावण्याचा प्रयत्न करीत असतात. या इंद्रपुरीशीं स्पर्धा करणाऱ्या नगरींत गोपुरें, गृहें, मंदिरें यांची रेलचेल असून सुदूरपर्यंत या सुंदर नगरीची आभा पसरली आहे. इथल्या उत्तुंग, विशाल श्रीमहालक्ष्मी मंदिराचा सुवर्णाचा रत्नखचित चमचमणारा कळस पाहून पौर्णिमेचा चंद्रहि राहूनें ग्रासल्यासारखा निस्तेज झाला. सुवर्ण, माणिक, वैडूर्य, मोती यांनीं रंगलेल्या त्या विशाल मंदिराच्या भिंती अशा लखलखतात कीं, क्षणकाल लखलखून जाणारी सौदामिनीहि लज्जेनें इथें कधीं आपला लखलखाट दाखवीत नाहीं. या मंदिराला सूर्यचंद्रांची उपमाहि अपुरी आहे. कारण ते सुद्धां मावळतात; पण इथल्या मंदिराची शोभा, पावित्र्य एकरसपणें अखंड असते. या भव्य मंदिराची प्रतिमा कृष्णेच्या संगमांत दूरपर्यंत दिसते. त्यावेळीं जणुं त्या जलांत लक्षावधी चमचमणाऱ्या माशांचा समुदाय या भगवतीच्या दर्शनाकरितां तिच्या मूळ स्थानापासून-सागरांतून-आला आहे असें वाटतें. या भव्य मंदिराला सुवर्णाचे चार गजप्रवेशालायक प्रचंड दरवाजे आहेत व मंदिराच्या आंत रमाचक्र लखलखतें आहे. या भगवतीच्या पूजासाहित्याकरितां इथें इतक्या खोल्या आहेत कीं, नित्य नव्या रूपासारखाच माणसाला त्यांच्या संख्येचाहि बोध होत नाहीं. शिवाय समीर कोनांत रेणुका, ईशान्य—कोनीं महिषासुरमर्दिनी चंडी, अग्निकोनीं धनदा, नैऋत्य-कोनीं दुरितनिवारणी अंबिका अशा तिच्या सख्या आपल्या सर्व ऐश्वर्यासह तिथें निवास करून, कमलाच्या एक एक पाकळीनें उत्फुल्ल होऊन साऱ्या कमळाची शोभाश्री वाढवीत असावें

तशा या परमोत्कर्षेचें वैभव वाढवीत असतात. या महामातेच्या सेवे-करतां विद्वान् ब्राह्मणांचा जो अहोरात्र सुघोष होतो, त्यानें सारें आकाश भरून जातें. इथल्या मंदिरांतील दीपांच्या तेजानें सारा आसमंत प्रकाशमय होत असल्यानें दिवसरात्रीचें भानहि येथल्या पौरजनांना होत नाहीं. इथल्या मंदिरांतल्या धूपदीपांच्या सुगंधानें आसमंतांतली निंब, वड, पिंपळ इत्यादि वृक्षांची दाटी बाह्यत: जरी त्या आकारांत दिसली तरी त्यांच्या अंतरंगांत चंदनाचा सुवासच घमघमतो येथें निवास करणाऱ्या क्षत्रियकुलाचा धाक प्रत्यक्ष इंद्रकुबे-रांना असल्यानें त्यांनीं आपली सारी संपदा त्यांच्या चरणांशी सादर केली. हे सारे क्षत्रिय सदाचारी,शुचिष्मंत व वेदविद्याप्रेमी असल्यानें त्यांच्या धनानें इथलें मंदिर संपन्न होत राहतें. जणुं श्रीमहालक्ष्मी व या क्षत्रियांत कोण कुणाला अधिक दान करते याची स्पर्धांच लागली आहे. या सुंदर नगरींत कुणी भिकारी, कोणी अपंग दिस-तच नाहीं. सारे नागरजन संपूर्ण ऐश्वर्यानें संपन्न, सद्गुणी व सदाचारी असल्यानें इथून दुःख, रोग, चिंता, असूया, भय इत्यादि विकारांनीं आपलें तोंड कायमचें काळे केलें आहे. इंद्रनगरीच्या सुरासुरांनाहि आपली नगरी सोडून इथें जन्म घ्यावा अशी वासना होते. अशा या श्रीकरहाटक क्षेत्राचा महिमा होता. दशदिशांतून या प्राचीन नगरींत देव, यक्ष, राक्षस व मानवांचे समूह नित्य येत व ही पावन पुण्यनगरी पाहून स्वतःचें जीवन धन्य धन्य समजत.

एकदां विनीतेचा प्रथमपुत्र अरुण सूर्याचें सारथ्य करीत दूर गेला होता. तिचा दुसरा पुत्र गरुड हा "भूक–भूक" करीत विनीतेला त्रास देऊं लागला. तेव्हां विनीतेनें त्याला कृष्णानदीच्या दोहों बाजूंस पसरलेलें घनदाट दंडकारण्य दाखवलें व त्यांतला एखादा प्राणी खाऊन आपली भूक शमन कर म्हणून आज्ञापिलें. गरुडानें एका झेंपेंत तें घनदाट अरण्य गांठलें व समोर दिसलेल्या एका दरोडे-खोरांच्या टोळीच्या नायकाचें मानगूट पकडलें. जिवाच्या भीतीनें तो

नायक गरुडाच्या पाया पडूं लागला. जीव वांचत नाहीं हें पाहून शेवटीं तो गरुडाला म्हणाला, " बाबा रे, मला खातोस तर खा, पण तुला ब्रह्महत्येचें पाप लागेल व तूं देवलोकांतून भ्रष्ट होशील याची आठवण टेव. " त्या नायकाचें तें भाषण ऐकून गरुडानें त्याला "मग ब्राह्मणाच्या कुळांत येऊन ही वृत्ति तूं का स्वीकारलीस?" असें विचारलें. तेव्हां त्यानें आपला वृत्तान्त कथन केला:—" माझें नांव मित्रदत्त. एका दशग्रंथी ब्राह्मणाचा मी वृद्धपणीं झालेला पुत्र, पण कुसंगतीनें चोऱ्या करू लागलों. शेवटीं राजानें मला श्रीकरहाटक क्षेत्रांतून हद्दपार केलें. पण इथें आल्यावर माझ्या या चौर्यकर्मविशारदत्वावर दंडकारण्यांतल्या या चोरांचा राजा बेहद्द खूष झाला व त्यानें आपली कन्या मला देऊन त्याच्या दरोडे घालणाऱ्या टोळीचा नायक बनविलें. माझ्या दरोडेखोरीच्या धंद्यांत मी अतिशय कुशल असल्यानें राजाचें सारें सैन्य माझ्याच हाताखालीं असतें व आतां राजाला माझ्यामुळें कसलीच काळजी न राहिल्यानें तो आतां मद्य-मांस-मिथुन या तीन मकारांतच अहोरात्र बुडून गेला आहे. राज्याच्या रक्षणाची सारी भिस्त माझ्यावर टाकून तो आतां मजेंत असतो. येवढें माझें विलक्षण कौशल्य आहे. " ब्राह्मणाचा हा वृत्तान्त ऐकून गरुडाला त्याची कींव आली. " कृष्णामाईच्या परिसरांत राहून, तिचें निर्मल, पुण्यसलील पिऊन तूं इतका अधम कसा झालास " म्हणून त्यानें त्याची हेटाळणी केली, आणि " तूं आतां तुझ्या बायकोला सोडून माझ्याबरोबर श्रीकरहाटक नगरांत चल," असें गरुडानें त्याला सांगितलें. ते दोघेहि श्रीकरहाटक क्षेत्रीं आले. त्या क्षेत्राचें महात्म्य ऐकून व ती सुंदर नगरी आणि तेथील श्रीमहालक्ष्मी यांचें दर्शन करून गरुड स्वतः तिथें हजार वर्षांच्या तपास बसला. त्याच्या तपानें शंकर, विष्णु इंद्र—सारे देव प्रसन्न झाले. विष्णूंनीं त्याचा वाहन म्हणून स्वीकार केला आणि या देवत्रयीच्या वरदानामुळें गरुड ज्या ठिकाणीं दररोज स्नान करी, त्या तीर्थाला 'गरुडतीर्थ' हें नांव पडलें. जे कोणी

निष्काम भावनेनें, अहंकार सोडून या तीर्थांत स्नान करून आपलें तन व मन शुद्ध करतात, त्यांना अहंकारानें हजार अश्वमेध यज्ञ करून जी मानसशुद्धि मिळत नाहीं ती मिळते, असें निरकंठ आपल्या कऱ्हाड-माहात्म्यांत सांगतो.

हाटकेश क्षेत्रींचा एक महातपस्वी ऋषि श्रीकर, दंडकारण्यांत एकदां समिधा गोळा करायला गेला असतां, कल्माषपाद नांवाचा राक्षस त्याला खाण्याकरितां धांवून आला. आपल्या दंडांतील बलानें व आपल्या मागें पाठिंब्याला उभ्या असलेल्या राक्षस-सैन्यामुळें त्याला भीति हा शब्दच ठाऊक नव्हता. आजपर्यंत धर्मकृत्यांकरितां समिधा आणण्यासारखें निरागस काम करणाऱ्या विप्रांचा त्यानें कैकवेळां सत्यानाश केला होता. त्यांना धनासह लुबाडून खाऊन टाकलें होतें. पण त्याचा प्रतिकार करणें अशक्य होतें. कल्माषपादाच्या मागें उभें असलेलें मोठ्या संख्याबलाचें राक्षस-सैन्य व त्यांच्या आसुरी वृत्ती यांमुळें गरीब बिचाऱ्या विप्रांना साधें जगणेंहि त्या दंडकारण्यांत अशक्य होतें. त्यामुळें सारी विप्रप्रजा तीं स्थानें सोडून श्रीकरहाटक क्षेत्रासारख्या मोठ्या संख्येच्या नगरांत येऊन वस्ती करती झाली होती. तिथें आपले सदाचार, सद्विचार, वेदविद्याभ्यासंग आणि ईश्वर-भक्ति यांच्या आश्रयानें ती आपला निर्वाह करीत असे. या दंडकारण्यांत जाऊन राहणें तर दूरच, पण प्रवेश करणेंहि कठीण होतें. पण यज्ञयागाचें साहित्य, समिधा इत्यादि वस्तू आणण्याकरतां त्यांना इकडे यावेंच लागे. त्यामुळेंच श्रीकर देखील त्या दंडकारण्यांत आला होता. पण कल्माषपादानें धांवून येतांना त्या विप्राचे तेज, तपस्या, निर्भयता व आत्मविश्वासाचें वागणें पाहिलें. त्या थोर तपस्व्याच्या अंगावरून वाहणाऱ्या वायूनें त्याच्या वृत्तींत पालट झाला. स्वजातीचे हितसंबंध राखण्याच्या नांवाखालीं आपण या अश्राप लोकांचे केलेले निर्दय हत्याकांड, त्यांचा सर्वनाश त्याला आठवला व त्याच्या स्वार्थी वृत्तीला लगाम बसला. मन सुविचारानें

भरून गेलें. आतांपर्यंत या तपस्व्याचा आपल्या स्वार्थाकरितां केलेला उपमर्द, त्यांनीं धर्म-देश-देव यांच्यासाठीं केलेला असीम त्याग विसरून त्यांचा केलेला सर्वनाश हें सर्व आठवलें व तो त्या तपस्वी ब्राह्मणाच्या पायीं लागला. त्याची बुद्धि पालटली, क्रौर्य विरघळलें, पाप नासलें. हजार वर्षांचा अंधःकार जणुं दूर झाला. ‘आपली तामसी वृत्ति, आपलें क्रौर्य, आपले सारे दुराचार व स्वार्थांधता एका बाजूस आपल्या पाठीशीं आहेत तर या तपस्व्याच्या मागें शांतदांत वृत्ति, उदात्त चारित्र्य, असीम त्याग व कष्ट-हालयुक्त दारिद्र्य उभें आहे. पण हा क्षीणकाय, दरिद्री तपस्वीच अधिक पूजनीय, अधिक वंद्य आहे. आपला हा सारा बाहेरचा लखलखाट, आपलें सारें क्रौर्य, आपलें सारे खोटे व दिखाऊ मानमरातब आणि सत्कार या ब्राह्मण तपस्व्याच्या तपापुढें निष्प्रभ आहेत, असे त्याला वाटलें. कल्माषपाद राक्षसाला या आपल्या आजवरच्या वर्तनाचा पश्चात्ताप झाला. तो दीन होऊन त्या तपस्वी श्रीकराला आपला वृत्तांत सांगू लागला:—

“ सूर्यवंशांतला मित्रसहो राजा हें माझें मूळचें नांव. पण एकदां मी शिकारीला गेलों असतां एका राक्षसानें वसिष्ठ येत आहेत हें पाहून त्यांचेंच रूप घेऊन ‘मला नरमांस भोजन दे’ अशी विनंति केली व तो स्नानाच्या निमित्तानें निघून गेला. पुढें तेथें खरोखरच आलेल्या खऱ्या वसिष्ठांना मी तें नरमांसभोजन वाढलें, तेंव्हां ते ऋषि संतप्त होऊन मला ‘राक्षस होशील’ असा शाप देते झाले. पण खरा प्रकार कळतांच त्यांनीं ‘बारा वर्षांनीं तूं पुन्हा या मूळ रूपांत येशील’ असा उःशाप दिला. नंतर मी राक्षस होऊन या दंडकारण्यांत अनन्वित क्रूर कर्में करीत राहिलों.”

श्रीकराच्या उपदेशानें कल्माषपाद करहाटक नगरींत आला व दोघेहि घोर तपस्येला बसले. रोज जवळच्या सरोवरांतून हजार कमळें आणून तीं महादेवाला वहायचीं असा नेम त्यांनीं धरला. एकदां ९९९ कमळें महादेवाला अर्पण करून हजारावें कमळ पाहतात तों

अनुक्रमांक 3५५५८ दि: ...
८८ : ८९
क्रमांक ... नों दि: ...

तें नाहींसें झाल्याचें दिसलें. ताबडतोब श्रीकरानें व कल्माषपादानें आपलीं शिरकमलें जवळच्या शस्त्रानें उतरवून श्रीशंभुदेवाला वाहिलीं. त्यांच्या भक्तीनें भोलेहर प्रसन्न झाले व त्यांनीं दोघांना सजीव करून कमलेश्वर हें नांव धारण केलें तें आजतागायत. त्या दोघांच्या तपस्येनें सारे देव या स्थानीं जमा झाले व प्रत्येकानें एक एक तीर्थ आपल्या तपस्येनें या ठिकाणीं निर्माण केलें. वरुणानें वरुणेश, कुबेरानें कुबेरेश्वर, वायूनें अनिलेश, अग्नीनें अनळेश, कपिल महामुनींनीं गोळेश आणि तेहतीस कोटी देवांनीं मिळून कोटेश्वर व कोटितीर्थें स्थापन केलीं. सारा महोत्सव अनेक दिवस चालून कल्माषपाद पुन्हा राजा म्हणून राज्य करूं लागला व श्रीकराच्या नांवें श्रीकरहाटक नगरी श्रीयुक्त झाली.

श्रीकरहाटक नगरीच्या एका बाजूस नीलाद्रि पर्वत उभा असून त्यांत कौंडिण्य, मार्कंडेय, अत्रि, दत्त इत्यादि थोर थोर तपस्वी तप करीत असत. तेथें कोरीव रत्नांचीं अनेक गुहागरें असून तेथें अत्यंत पवित्र, निर्मल जलाशय, फलमूलकंदांचा भरपूर पुरवठा व तिथल्या भरदार वृक्षराजींत कोकीळ, मोर, सारस, हंस इत्यादि पक्षीसमूह नित्य वस्तीला असत. एकदां एका राक्षसानें केलेल्या घोर तपस्येनें भोलेशंकर प्रसन्न झाले व त्यांनीं त्या असुराला वाटेल तो वर माग म्हणून आपला वरदहस्त पुढें केला. साध्याभोळ्या जनताजनार्दनानें प्रसन्न होऊन, एखाद्याला आपला सारा पाठिंबा देऊन वरच्या स्थानावर नेऊन ठेवावें व तो आपलें कोटकल्याण करील, स्वतःची पूर्वस्थिति आठवून ज्या जनतेनें भोळ्याभाविक श्रद्धेनें आपल्यावर विश्वास टाकला व अधिकारपदावर बसविलें त्या जनतेबद्दल कृतज्ञता बाळगून तिच्याबद्दल सहानुभूति व प्रेम ठेवून, स्वार्थांध न होतां झगडेल, जीवाचें रान करून तिला सुखी करील ही आशा बाळगावी, त्याच राजपुरुषानें सत्ता हातीं येतांच कृतघ्न-तेनें त्याच जनतेला हैराण करावें, त्या राजसत्तेचा ‘ बहुजनहिताय

बहुजनसुखाय ' उपयोग न करतां स्वतःचे नग्न स्वार्थ साधून त्याविरुद्ध बोलणाऱ्यांवरच जुलुमजबरदस्तीचा वरवंटा फिरवावा, त्याप्रमाणें भस्मासूर हा स्वतःला मिळालेल्या ' हात ठेवतांच भस्म ' करण्याच्या शक्तीनें उन्मत्त झाला. जगांत त्याच्यापुढें सारें भस्म होऊं लागलें. शेवटीं सर या भस्मासुरानें महादेवाच्या साऱ्या सर्वस्वावरच आपला मोर्चा वळविला. वरदात्या शंकराचें त्यानेंच प्रदान केलेल्या शक्तिसामर्थ्यानें भस्म करून पार्वतीचें हरण करावें या आसुरी इच्छेनें तो शंकराच्याच मागें लागला. ज्यावेळीं शक्तीचे, सामर्थ्याचे, सत्तेचे सारे लगाम असंस्कृत,रानटी वृत्तीच्या लोकांच्या हातीं जातात, त्यावेळीं मग सारासार विचार लोप पावतो. सुसंस्कृत, सज्जन, निष्ठावान् लोकांनाच भय उत्पन्न होतें.ठग,गुंड, बदमाष हीच बिरुदावलि ज्यांना शोभेल तेच श्रेष्ठ नि ज्येष्ठपणाच्या तोऱ्यांत मिरवूं लागतात. सत्तेचे, संपत्तीचे, सन्मानाचे मानकरी तेच होतात. आदर्श पुरुष म्हणून त्यांचीं चरितें गाण्याकरितां भाडोत्री भाट स्वार्थसाधनेकरितां चौफेर निर्माण होतात. मानवांतलें सारें सामंजस्य,शालीनता, सद्गुण, चारित्र्य हीं निर्माल्यवत् होतात, दोषवत् होतात. या असज्जनांचा होत असलेला उदोउदो, समाजांतल्या सद्भावनांचा, आदरबुद्धीचा, अस्मितेचा लोप करतो. समाजमानसांतलें सारें सत्य, शिव, सुंदर या काळ्याकुट्ट अभ्रानें आच्छादलें जातें व समाज अधोगतीला जातो. शंकराच्या मागें हा भस्मासूर लागतांच शिवानें पृथ्वीतलावरून पळ काढला. समाजाच्या वरच्या, मधल्या, खालच्या वर्गांतून जणुं सारें शिव-सत्य-सुंदर या भस्मासुराच्या भयानें पळत सुटलें. त्याला कुठेंच स्थान राहिलें नाहीं. आसुरी वृत्तींनीं साऱ्यांनाच घेरल्यानें कुणाचा शिवाच्या रुद्ररूपावरच विश्वास राहिला नाहीं. समाजाचें, न्यायनीतीचें, सदाचार—सद्विचारांचें अधःपतन होत आहे हें कळत असूनहि सारे भयानें भस्मासुराचेच साथीदार बनले. तीनहि लोक पालथे घालून शिवाला अभयदाता मिळेना. शेवटीं तो सागराच्या

तळाशीं विषाच्या ज्वलज्जहाल ज्वाळा ओकणाऱ्या शेषाच्या अंगावर पहुडलेल्या विष्णूला शरण गेला. भगवान् शेषशायीनें शेषाचें सारें कालकूटहि आपल्या प्रभेनें निष्प्रभ केलें होतें. शंकराला त्यानें अभय दिलें. तो मोहिनीरूपानें कृष्णातीरींच्या नीलाद्रि पर्वतावर आला व आपल्या मोहित करणाऱ्या रूपसंपदेनें त्यानें भस्मासुराला नृत्यांत गुंगवून त्याच्याच हातानें त्याचें भस्म करविलें. पण त्या मोहिनीच्या मोहमयी रूपाला भाळून शिवाचेंहि सारें वीर्य पतन पावलें. मोहाच्या मोहमायेंत,सुखोपभोगांत गुंग झालेला समाज जसा वीर्यशाली रूपाला मुकून हीनदीन होतो, तसाच भोलेशंकरहि हीनदीन झाला. पण विष्णूनें आपलें रूप प्रगट केलें व शंकराची शिवशक्ति भानावर आली. हा सारा नाट्यप्रसंग नीलाद्रि पर्वतावर घडल्यानें शिव-पार्वतीनें विष्णुरूपा कृष्णामाईच्या तीरीं आपला निवास कायम केला. आजहि आगाशिव—अग्रेशिव-चानीलाद्रि या शिवकथेची कहाणी आपल्या मौनानें, येणाऱ्या जाणाऱ्यांना सांगत असतो.

श्रीकरहाटक क्षेत्राचें माहात्म्य पार्वतीला सांगतांना शंकर म्हणतात, “ येथें त्रिपुरांतक असा मी विष्णुरूपिणी जगदंबा कृष्णामाईच्या जवळ गुप्तरूपानें रहात असतो. ही जगत्‌जननी, परलोकदायिनी माता म्हणजे जगदोद्धार करण्याकरितां सावित्रीच्या शापानें वाहणारा चक्रपाणी श्रीकृष्णच आहे. कृतयुगीं पुष्करतीर्थ, त्रेतायुगीं कुरुक्षेत्र, द्वापार-युगांत नैमिषारण्य व कलियुगांत भागीरथी हीं सारीं तीर्थक्षेत्रें लोक-मानस निर्मल, पवित्र करण्याकरितां जन्माला आलीं. पण हें कृष्णेचें जल एवढें पावन आहे कीं, तें त्या सर्व तीर्थांचें तीर्थ, सर्व व्रतांचें व्रत, दैवतांचें दैवत आहे. साक्षात् भगवान् श्रीकृष्ण या जलरूपानें वहात असल्यानें त्या लक्ष्मीपतीच्या तरंगांनीं इथलें सारें पापताप, दैन्यदुःख वाहून जातें. एकदां इंद्राला इथल्या निष्काम भक्तांच्या तपाचें भय उत्पन्न झालें. पण भगवान् श्रीकृष्णानें त्याला ‘ तुझें इंद्रपदहि इथल्या निष्काम भक्तांना तुच्छ वाटतें; त्यापेक्षां माझ्या

सहवासाचीच अपेक्षा ठेवून त्याकरितांच हे भक्त तप करतात ' असें सांगून शांत केलें. ''

या संगमक्षेत्राच्या पावनतेनें मृत्यूहि कृष्णातीरीं यायला भीत असे. त्यामुळें इथले लोक मृत्यूपासून मुक्त होऊं लागले. एकदां कौतुकानें, शिवानें वृद्धाचें व पार्वतीनें वृद्धेचें सोंग घेतलें व येथें येऊन निवास केला. नंतर वृद्ध शिवानें मृत्यु आल्याचें ढोंग केलें व पार्वतीमाता त्याकरतां शोक करूं लागली. श्रीकरशिष्य यज्ञसहो सुभग त्या ठिकाणीं आला व आपल्या या पुण्यनगरींत हा दुःखद प्रसंग पाहून तें प्रेत उठविण्याकरितां त्यानें स्वतःचें सारें पुण्य त्या वृद्धाला दिलें. तरी वृद्ध सजीव होईना. शेवटीं ध्यान लावून पाहतां प्रत्यक्ष शिवानेंच हें रूप धारण केल्याचें पाहून त्यानें त्या प्रेताचे पाय धरून प्रार्थना केली. त्याच्या निष्काम श्रद्धेनें शिव-पार्वती प्रसन्न झालीं व श्रीकरहाटेश्वर लिंगांत आपण कायम अंशरूपानें राहूं असें त्यांनीं त्याला वचन दिलें. कुसंगतीनें चौर्यकर्म करणाऱ्या गौतमाचाहि इथल्या कृष्णेच्या पावन जलानें असाच उद्धार केला. पुण्यश्लोक इंद्रसेन राजाचा पुत्र चंद्रसेन स्वपत्नीसह इथें जलक्रीडेला आला असतां नागकन्यांनीं त्याचें हरण केलें. पण त्याच्या पत्नीच्या अतुल तपस्येनें तो नागराजाची कन्या सीमंतिनी हिच्या गळ्यांत माळ घालून तिच्यासह परत आला. या प्रसंगाचें स्मारक म्हणून त्यानें नागतीर्थ स्थापन केलें. दक्ष प्रजापतीच्या यज्ञांत दक्षकन्या सतीनें आपला अवतार यज्ञभूमींत प्रवेश करून संपवला. पुढें हिमालयाच्या पोटीं पार्वती झालेल्या त्या अपर्णेनें शिवाच्या प्राप्तीकरतां घनघोर तप केलें. त्या तपकालांत तिनें गणेशाची आराधना करण्याकरतां येथें गणेशतीर्थ स्थापन केलें. ' प्रल्हादाच्या हांकेसरशीं धावुनि जें आलें ' त्या नृसिंहरूपानें हिरण्यकशिपूचें पोट आपल्या नखाग्रांनीं फाडलें त्याचा दाह इथें नृसिंहतीर्थानें शमन केला. वराहरूपाचा क्रोधानल इथल्या वराहतीर्थांत शमन झाला. श्रावणबाळाच्या हत्येनें

व्यथित झालेल्या रामपिता दशरथानें–‘ **अयस्कांतस्य संसर्गाल्लोहं भवति काञ्चनम् । प्रीतिसंगजलस्पर्शात् तद्वत् पापानि पुण्यताम् ॥** ’–परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें; या कृष्णामाईच्या प्रीतिसंगम जलाच्या स्पर्शानें पापाचेंहि पुण्य होतें– हा अनुभव याच ठिकाणीं घेतला. येथल्या श्यामल कृष्णातटीं राहणाऱ्या चंद्रचूड या धनवान् ब्राह्मणाच्या दानशूरत्वाचा डंका थेट इंद्राच्या कानांवर पोंचला. त्यानें पक्षीरूपानें येऊन नरमांस भिक्षा मागतांच स्वतःच्या मांडाचे मांस त्याला दान करून ‘ **रघुकुलरीत सदा चली आयी, प्राण जाय वरु वचन न जायी** ’ हा आपला लौकिक कायम राखला. मोहिनीरूपानें देव-दानव वृत्तींच्या मंथनांतून निघालेलें अमृत हिरावून घेऊन विष्णूनें तें गरुडाच्या हातीं दिलें. आपल्या मातेची दास्यमुक्ति करण्याच्या प्रेरणेनें अवकाशमार्गानें तो अमृताचा कलश घेऊन जाणारा गरुड कन्यागतांत या कृष्णेच्या सदाप्रसन्न, उल्लासित जलसंगमावरून जात असतांना त्यांतलें अमृततुषार या परमपावनी जलौघांत पडलें व तेव्हांपासून या उदारेच्या भेटीला कन्यागतांत जगांतली सारीं तीर्थक्षेत्रें येऊं लागलीं.

**‘ सीतावियोगात्त सुखैकराशिं, दुःखैकराशिं परिहर्तुकामः ।**
**रामःसमीपे सहलक्ष्मणोऽत्र सेवापरो यो दुरिताम्बिकायाः ॥’**

या पावनेच्या जलाचा लाभ पतितपावन श्रीराम या जलप्रपातानें स्नान करून घेते झाले. या प्रीतिसंगमाभोंवतालीं प्रसन्नतेनें हास्य करणारी श्यामल धरा, त्यामधून प्रसन्नतेनें उल्लासणारी श्यामल जला कृष्णा व तिच्या जलांत स्नात होणारा तो मर्यादापुरुषोत्तम मेघःशाम हा देखावा पाहून कृष्णातीरींच्या हरित वृक्षराजींच्या डोळ्यांतून आनंदाची पुष्पवृष्टि झाली असेल. आकाशांतल्या देवांनीं सुवर्णकांतीच्या पुष्पांचा पाऊस पाडला असेल. इथल्या तीरांवर निवास करणाऱ्या नागरजनांनीं या कृष्णेचा हा अपार महिमा पाहून——

'एहि एहि भक्त-जन-मानस कामधेनो ।
दिव्यांबुजाक्ष ललिते हृदयांबुजे मे ॥
कामादिषड्रिपु विनाशन हेतुभूते ।
त्वां चिंतयामि सततं परिमुक्तये ऽ हम् ॥''

—अशा प्रार्थनांनीं सारा आसमंत दुमदुमून टाकला असेल.

मार्कंडेय मुनिश्चचार विपुलं कृष्णातटे संस्थितः ।
पौराणाः कथयन् कथा समुदिती देव्याः समीपोस्थितः॥
तत्तीर्थं विमलं धनुःशतमितं कृष्णातटे संस्थितम् ।
ये सेवन्ति च वर्णयन्ति मनुजः ते मुक्तिभाजः खलु ॥

असा हा या श्रीकरहाटक क्षेत्राचा, त्याच्या सान्निध्याला आलेल्या प्रसन्नसलील प्रीतिसंगमाचा, श्रुति—स्मृति—पुराणोक्त महिमा आज हजारों वर्षे दुमदुमत आहे. हें सारें श्रवण करतांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सामान्य मानवी बुद्धि ही स्वभावतः, प्रकृतितः द्वंद्वात्मकच असते. द्वंद्वाच्या एका बाजूचा आग्रही पुरस्कार करून 'तें तसेंच असलें पाहिजे' या आग्रही भ्रमांत, मायाजालांत गुरफटून ती इतकी बद्ध होते कीं, त्यांतून विमुक्त होणें, सत्याचें ग्रहण करणें, या गोष्टीला ती तयारच नसते. सत्यदर्शन हेंच जर जीवनाचें ध्येय असेल तर 'अमुकच खरें' अशी वृत्ति उसळतांच त्याविरुद्धहि खरें असण्याचा संभव आहे असा विचार जर उसळला तर 'मी म्हणतों तेंच खरें' या सांचेबंदींतून तो मुक्त होऊन जाईल. त्याच्या चित्तवृत्ती खऱ्या अर्थानें मुक्त होऊन वावरतील. मनांत स्वैरपणें उसळणाऱ्या विविध व परस्परविरोधी वृत्ती तटस्थतेनें, साक्षीवृत्तीनें पहातां आल्या तर सत्य काय आहे याचा उलगडा होईल. प्रकाश हा सदैव प्रकाशांतच राहतो. प्रकाशण्याचा त्याग करून प्रकाशाला राहतांच येत नाहीं. हें जग केवळ असण्याची, स्वयंभू, स्वयंप्रकाश अशा सत्यवस्तूची प्रभा आहे. स्वयंप्रकाशी 'वस्तू'च आपल्या अंगभूत प्रभेनें जगरूपानें शोभूं लागते.

आणि हें शोभणेंहि वस्तूच्याच लाभासाठीं, निजानंदासाठीं असतें. आपल्या अहंभावाचें संपूर्ण विसर्जन करून, सुखदुःख, आशानिराशा यांच्याकडे लक्ष न देतां जर आपण या श्रुतिस्मृति-पुराणोक्तांकडे पाहिलें, त्या कृष्णामाईच्या धवलसुधासुंदर जलाच्या संगमाकडे पाहिलें तर त्या अद्‌भुत दृष्टीला चैतन्याचें अपार कृपासलीलच क्षणाक्षणाला कणाकणानें त्या बिंदुबिंदूतून अखंडपणें उसळत आहे असा अनुभव येईल. येवढेंच काय, साऱ्या सृष्टींतूनहि त्या स्फूर्तिमात्राचीच सळसळ चालू आहे, त्या चिद्‌विलासाच्या कृपासलीलाचीं लक्षावधी अनंत कारंजीं सर्व दूर उडत आहेत, त्या कारंज्यांच्या अमृतसलीला बिंदूतून जणुं आपणच क्षणाक्षणाला, कणाकणानें सर्व सृष्टींत भरून राहिलों आहोंत, आपल्याच चिन्मयाचा, चैतन्याचा हा सारा चिद्‌विलासी रमणीय खेळ चालू आहे, हीं सारीं स्पंदनें जणुं आपणच आहोंत याचें, 'मी' पण संपूर्ण हरपणारें भान होईल व मगच खरें तीर्थदर्शन पदरांत पडेल.

●●●

# ८ : किंकिणी--मंजुलं श्रीगुरूं तं भजे

श्यामल धरेच्या विस्तीर्ण प्रांगणाला आपल्या कोमल करकमलांनीं बाजूला सारीत, कृष्णेचा प्रसन्न सलील सरिताप्रवाह, मधुतमकलरव करीत, गूढगूंजनात्मक मधुसंगीताचे स्वर दशदिशांना उधळीत, 'किंकिणी मंजुलं' अशा श्रीगुरूंच्या चरणकमलापाशीं येऊन, पंचगंगेच्या कोमल कंठाला प्रेमाची मिठी घालतो. ब्रह्मगिरीच्या स्वरलोकांतून, खळाळून मुक्त हास्य करीत, खालीं उड्या मारीत, पूर्व सागराकडे धांवतांना, आपल्या लाडक्या बहिणींच्या-वेण्णा, कोयना वारणांच्या खांद्यांवर आपले कोमल हात अडकवीत कृष्णाम्बा, इथें घाईघाईनें पंचगंगेला तिच्या सख्यांसह येतांना पाहून, उचंबळून येते. आपल्या या बहिणीची कधीं एकदां उराउरीं भेट होते असें तिला होऊन जाते. आपल्या प्रफुल्ल हंसण्या सलीलाचा कलरव करीत ती पंचगंगेला, तिच्या सख्या–शिवा, भद्रा, भोगावती, कुंभी, सरस्वती यांच्या मेळाव्यांत जाऊन मिठी घालते. तिथें या प्रेमळ बहिणींच्या हास्यविनोदाच्या संभाषणांची मुक्त कारंजीं उडूं लागतात. जणुं साऱ्यांना आपआपल्या प्रवासाच्या सुखदुःखाच्या, स्वतःला भेट-




श्रीगुरुदत्तावतार श्रीनृसिंह सरस्वति

लेल्यांच्या गोष्टी सांगण्याची घाई झाल्यानें, तिथें पाण्यांच्याच बडबडीनें मधुर कलकलाट, लाटांच्या रूपानें तरंगत रहातो. त्या विमल जलांत आपलीं प्रतिबिंबे पहात, स्वतःच्या हरित लावण्यानें मुसमुसणारे औदुंबर, वड, पिंपळ त्या प्रेमळ बहिणींच्या मीलनानें ऐकूं येणाऱ्या, श्रुतिमधुर कलरवानें आनंदानें डोलूं लागतात. त्या वयस्कांच्या खांद्यावर अखंडपणें आपल्या लीला करणारे षट्पाद, द्विपाद गगनविहारी, स्वैरपणें त्या पुरातन, पावन पुण्यप्रवाहावर आपलें अंग झोकून देत भगिनीप्रेमाचा तो सोहळा पहात, वायुलहरींवर त्या सुधासुंदर जलाच्या तटीं मानवाचें चिरंतन वैरी जे शोक, मोह,आशा, निराशा, अमंगलता यांच्या विसर्जनाच्या हेतूनें जमलेला मानवी सागरहि मग या चिन्मय, आनंदमय संगीतानें मुग्ध होऊन, सद्भावनांनीं उचंबळून येतो.

ज्या कृष्णेच्या मधुर जलपानानें, महाराष्ट्राच्या भूमींत श्री समर्थ रामदास स्वामी, शिवाजी महाराज, शाहू, बाजीराव, पटवर्धन, नाना फडणीस, रामशास्त्री, नृसिंह सरस्वती, संताजी, धनाजी, श्री टेंबेस्वामी, आगरकर अशीं नररत्नें पैदा झालीं व मराठी मनाच्या साधुत्वाची, वीरतेची, न्यायनिष्ठेची, मुत्सद्दीपणाची, धर्म-सदाचार प्रेमाची, विद्याव्यासंगाची, स्वतंत्रतेची, उदारतेची, विरागतेची, निष्ठेची कीर्ति-पताका साऱ्या भारतभर फडकली, त्या कृष्णामाईच्या गौरवशाली, पावन जलाबद्दल, त्या मराठी मनांत उचंबळून येणारा भक्तिप्रेमाचा सारा स्त्रोत, तिच्या सुंदर प्रवाहाच्या दर्शनानें बोलका होऊन, " जय कृष्णे, जय कृष्णामाई "या घोषानें सारा आसमंत दणाणून टाकतो. धोम–वाईच्या विद्वत्‌रत्नांच्या वाग्वैजयंतीनें सुशोभित झालेली, माहुली-साताराच्या न्यायप्रियता–शौर्य-मुत्सद्दीपणाचा शेला ल्यालेली, संतसखू, निरंजनस्वामी, कृष्णदयार्णव, शिवदिनकेसरी, विठोबाअण्णा दसरदार, पूर्णानंदस्वामी अशा थोरथोरांच्या भक्तिमाला गळ्यांत घालून नृसिंहवाडीच्या

“ चिन्मय पादुकां ” जवळ आपल्या बहिणीला अपार प्रेमानें भेटणारी ही कृष्णामाऊली पाहून कुठल्या मराठी मनांत भक्तिप्रेमाचा महापूर दाटणार नाहीं? या कृष्णा लहरींवरच वरच्या चिन्मय गुरुपादुका–मंदिराचे श्रुतिमधुर घंटानाद तरंगत असतात. या नादध्वनींच्या पार्श्वसंगीतांत मधूनच भक्तांच्या कोमल आर्तव कंठांतून बाहेर पडलेला “ श्रीगुरुदेऽऽव दत्त ” चा गंभीर घोष आपल्या कानांवर पडतो. आपलीं पावलें त्या चैतन्यमय श्रीगुरुपादुकांचें दर्शन घ्यायला कृष्णेचा घाट झपझप चढूं लागतात. ज्या तीरावर अनेक संत-सत्पुरुषांनीं तप केलें, ज्या ठिकाणीं अवतारमूर्तींच्या लीला घडल्या, जिथें आजहि श्रीगुरूंची रम्य मूर्ति, भक्तांच्या आर्तीनाशाकरतां, साधकांच्या पैलतीरींच्या लक्ष्यसाधनाकरतां, मोठ्या प्रेमानें आपला “ किंकिणी-मंजुलं ” असा पदकमलांचा रव भक्तांना ऐकवते, तें साजिरें गोजिरें स्थान, आपण आपल्या अनिमिष नेत्रांनीं पाहूंया व युगा-युगांचा मनांतील अंधार दूर करून व उज्ज्वलतेचा साक्षात्कार घेऊं या भावनांनीं तो भारला जातो, त्याचें मस्तक अवनत होतें, हात जोडले जातात, हृदय भारावून जातें.

चौदाव्या शतकांत महाराष्ट्रांतील सारीं मराठी राज्यें नष्ट होऊन हिंदूंच्या धर्मभावनांचा उपमर्द व तीर्थस्थानांचा अवमान होत होता. स्वत्व विसरलेल्या या जनमानसाला आपल्या अमोघ वाणीनें जागृत करणारा, स्वतःच्या सामर्थ्याचें, विजिगीषु वृत्तीचें भान करून देणारा कुणी नव्हता. त्यामुळें या पददलित जनतेंतलें सारें त्राण, सारा स्वाभिमान विगलित झाला होता. सारा पुरुषार्थ, सारा परमार्थ लोपला होता. या निस्त्राण, पुरुषार्थहीन समाजाला संजीवन देण्याकरतां तसलाच अधिकारी पुरुष आवश्यक होता. समाजाची अस्मिता जर लोप पावली तर समाज पुरुषार्थी होणेंच शक्य नाहीं. आपला धर्म, देव, देश यांचाहि अभिमान जर खलास झाला, तर त्याच्या रक्षणाचीहि समाजांत इच्छा

राहणार नाहीं. " ना क्षत्रं ब्रह्म भवति, क्षत्रं ना ब्रह्म वर्धते, ब्रह्मक्षत्रे तु संयुक्ते, इहामुत्रचवर्धते ।" क्षत्रिय वृत्तीवांचून ब्रह्माचें, धर्माचें अस्तित्व टिकणार नाहीं; ब्रह्मवृत्तीशिवाय क्षात्रवृत्ति जोपासली जात नाहीं; पण ब्रह्म व क्षात्र जर संयुक्त झालें तर समाजाचें इहपर कल्याण साधेल. नुसता पुरुषार्थ असेल पण ज्ञान नसेल तर आंधळ्या गरुडाप्रमाणें ती सारी शक्ति व्यर्थ जाईल, पण नुसते ज्ञानच जर अप्रसरणशील असेल तर तेंहि व्यर्थच होईल. ज्या समाजांत ज्ञानी-परम-अर्थ जाणणारे ज्ञानी— संचार करून कर्ममार्गी होत नाहींत, ज्या समाजांत पुरुषार्थी, कर्मकांडी ज्ञानाची उपेक्षा करतात, त्या समाजाचा अभ्युदय दुरापास्त होतो. समाजाची ही अस्मिता, हा स्वाभिमान या विरोधी, अंधकारमय, कठीण काळांत जागृत करण्याचें काम वऱ्हाडांत करंज गांवीं अंबा माधव या सत्वशील दंपतीच्या पोटीं अनेक नवस सायासांनीं जन्मलेल्या **श्री नृसिंह सरस्वतींनीं** केलें. जन्मतांच ट्यॅहॅचा चिरपरिचित आवाज न काढतां या बालकानें ॐकाराचा गंभीर नाद काढून आपल्या अलौकिक चारित्र्याची आपल्या मातापित्यांना ओळख करून दिली. नरहरी नामाभिधान प्राप्त झालेल्या या कुमारानें सात वर्षांच्या वयांत मुंजीची भिक्षांदेहि वेदमंत्र म्हणून केली. मुलाच्या या जगावेगळ्या आचारविचारानें मातापिता चकित झाले. पण आद्य शंकराचार्यांप्रमाणेंच आपल्या मातेला उपदेश देऊन व तिची कशीबशी समजूत घालून या बालवयांत हा बाल नरहरी काशीच्या कृष्णसरस्वतींपासून संन्यास घेण्याकरतां काशीपुरींत आला. संन्यास स्वीकारानंतर हा बालसंन्यासी पूर्वाचार्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून भारतभर संचार करून सारी पुण्यपावन तीर्थक्षेत्रें धांडोळीत निघाला. परास्त झालेल्या समाजांत आपल्या अमोघ वाणीनें, आपल्या तपःसामर्थ्यानें वैदिक संस्कृतीचा, तिच्या थोर परंपरेचा त्यानें अभिमान उत्पन्न केला. आपल्यांतल्या दिव्यतेचें, भव्यतेचें, उदात्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८५५८ वि: ...
क्रमांक ...


तेचें दर्शन घडविलें. या बालमूर्तींच्या अमोघ वाणीनें, तिच्या अद्भुत चमत्कारांच्या तेजोवलयानें लोकांना चाकित केलें. त्यांच्यां तील अस्मिता, धर्मप्रेम व त्याकरतां करावा लागणारा त्याग यांसाठीं त्यांना तयार केलें. त्यागाशिवाय, सर्वस्वाच्या त्यागाशिवाय भोगहि अशक्य आहे हें पटवून दिलें. शांकरदिग्विजयानंतर शंकराचार्यांप्रमाणेंच त्यांच्या मागें भक्त-भागवतांचा मेळा गोळा झाल्याचें दृश्य पुन्हां भारतवर्षांत दिसूं लागलें. भक्त-भागवतांना पुनः पुन्हा त्यांच्या अमोघ वाणीनें पटूं लागलें कीं या औपनिषदिक मार्गानेंहि आपला अभ्युदय होईल. ज्या सुखाच्या, आनंदाच्याकरतां आपण आपल्या धर्मप्रेमावर, आचार-विचारांवर तिलांजली द्यायला निघालों, तें सुख, तो आनंद आपल्याला "धर्मो रक्षति रक्षितः"-धर्माचें आपण रक्षण केलें तर आपलेंहि तो रक्षण करील-या न्यायानें धर्मानें वागूनहि मिळेल हें कळून आलें. या योगीराजाची स्थिति ब्रह्मानंदाच्या लाभानें राजापेक्षांहि अधिक आनंदाची आहे, अधिक वैभवाची आहे हें त्यांना समजलें.

"ऐसी पावोनि योगगुण, स्वानंद भोगतो परिपूर्ण, तया योगिया न घडे शीण, संसाराचा । झाले ब्रह्म आपण, योगी सहज परिपूर्ण, सदा स्वानंद निमग्न, ज्ञप्तिमात्रें । संकल्प आणि विकल्प, दोनी न दिसती अल्प, सुख पावले अमुप म्हणोनिया । हृदय जयाचे कोमळ, सदा शुचिष्मंत निर्मळ, निरंतर आचारशील, पवित्रपणे । न पाहती मानापमान, निंदा स्तुती, समाधान, धैर्यपणें मन, नांदत जयाचे । सदा विवेकीं चित्तवृत्तीं, पडो न देती विस्मृती, सावधान अहोरात्रीं आत्मस्वरूपीं । विश्वाचा दाहो न लागे आंगा, तो द्वंद्वातीत पैंगा, एकदेसीया जगा, न पाहे योगी ॥" नृसिंह सरस्वतींच्या या अपूर्व वृत्तीनें लोकांच्या श्रद्धेला एक मोठा आधार मिळाला व श्रद्धापूर्वक लोक त्यांना दत्ताचा श्रीपादश्रीवल्लभानंतरचा अवतार समजू लागले.

९३५५०

औदुंबरच्या ब्राह्मणाला आपल्या कृपाप्रसादाचा लाभ दिल्यानंतर ते अमरापूर (औरवाड) गांवाच्या सन्निध्र असलेल्या एकांत जागीं गुप्तपणें येऊन राहिले. या अमरापुरांत एक सत्शील म्हणूनच दारिद्र्य भोगणारा ब्राह्मण अमरेश्वराची निष्ठेनें सेवा करून रहात असे. त्याच्या घरच्या दारिद्र्याला सीमा नव्हती. लोकांना त्याच्या सात्विक जीवनाची, शुद्ध आचरणाची, ज्ञानाची किंमत नसल्यानें ब्राह्मणाला एकादशीचा उपवास अनायासे अनेक दिवस घडत असे. पण ब्राह्मणानें आपली श्रद्धा, आपला संतोष कधींच सोडला नाहीं. एकदां नृसिंहसरस्वती त्याच्याच घरीं भिक्षे-करतां आले. ती तेजस्वी तपोमूर्ति पाहून ब्राह्मणाला आनंदाचें भरतें आलें. त्यानें आपल्या घरांत त्यांना आदरानें नेलें व त्यांचे पाय धुवून त्यांना आसन दिलें. पण ब्राह्मणाच्या घरांत त्या दिवशीं अन्नपूर्णा पूर्ण रुसली होती. घरांत धान्याचा एक कणहि नव्हता. ब्राह्मणाच्या पत्नीनें अंगणांत उगवलेल्या घेवडयाच्या शेंगाच घाई-घाईनें शिजवल्या व त्याच श्रीगुरूंना भिक्षा म्हणून वाढल्या. घरचें दारिद्र्य निवेदन केलें. श्रीगुरूंनीं तीच भिक्षा प्रसन्नतेनें स्वीकारली. परत जातांना ब्राह्मणदंपतीला लक्ष्मी प्राप्त होईल असा आशीर्वाद दिला. जातांना मात्र ब्राह्मणाच्या उपजीविकेचा एकुलता एक आधार असा तो घेवडयाचा वेल उपटून फेकून दिला. ब्राह्मण-पत्नीनें तें पहातांच आकांत केला. पण ब्राह्मण शांतच होता. त्यानें राहिलेलें मूळ तरी कशाला ठेवा, म्हणून तें काढण्याकरतां जमीन उकरण्यास सुरुवात केली. जरा खणतांच आंत एक मोहरानें भर-लेला हंडा सांपडला. ब्राह्मणाचें दारिद्र्य दूर झालें, साधना तीव्र झाली व स्वामींचा तो एकनिष्ठ भक्त बनला.

गंगानुष नांवाच्या एका ब्राह्मणाला, नरसिंहसरस्वतींना या औदुंबर जंगलांत एकटेंच राहतांना पाहून एकदां जाऊन त्यांचे दर्शन घ्यावें अशी इच्छा झाली. तो गुपचूप येऊन कृष्णेच्या पात्राजवळ बसला. नरसिंह सर-

स्वती जेव्हां तिथें आले, त्यावेळीं चौसष्ट योगिनी पाणी दुभंगून बाहेर आल्या. त्यांनीं स्वामींची मनोभावें पूजा केली व त्यांना पुष्प, फळें इ. अर्पण केलीं. तें पाहून ब्राह्मण त्यांच्याकडे गेला व त्यानें त्यांचे पाय धरले. आपल्याला काशी, प्रयाग, गया या तीर्थराजांच्या दर्शनाची इच्छा आहे, ती स्वामींनीं पुरी करावी म्हणून त्यानें त्यांना विनविलें. स्वामींनीं त्याला डोळे मिटण्यास सांगितलें. त्याप्रमाणें करतांच ब्राह्मण काशी नगरींत दाखल झाला. त्यानें गंगास्नान, काशी-विश्वेश्वर दर्शन इत्यादि सर्व विधी यथासांग पार पाडले. त्यानंतर प्रयाग व गया येथें आवश्यक ते सर्व धर्मसंस्कार उरकले. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें डोळे उघडतांच आपण कृष्णामाईच्या संगमावर उभे आहोंत हें त्यानें पाहिलें. " विश्वरूप जगन्नाथ, अखिलाठायीं असे वसत, औदुंबरीं प्रीति बहुत, नित्य तेथें वसतसे " म्हणून स्वामींनीं त्याला सांगून याच स्थानीं तूं भक्तिभाव ठेवून रहा, तुला सर्व कांहीं इथेंच प्राप्त होईल म्हणून उपदेश केला. " जया नांव औदुं-बरू, काय पुससी त्याचा वरू, तेथें अहोरात्र गुरु, कल्पिले फळ देतसे ।" याचा अनुभव लोकांना येऊं लागला. लवकरच श्रीगुरु तेथून गुप्त झाले पण भक्तांच्या करतां त्यांच्या पायांचे ठसे औदुं-बर वृक्षाखालीं ते जिथें बसत त्या दगडावर उमटले. त्या " मनोहर पादुका " पाहून लोक त्यांची मनोभावें पूजा करूं लागले.

बेदरचा बादशहा एका भयंकर रोगानें पछाडला होता. कांहीं केल्या त्याला गुण येईना. राज्यांतले सारे हकीम, वैद्य झाले, पण उतार म्हणून पडेना. शेवटीं कोणाच्या तरी सांगण्यावरून तो श्रीगुरूंना शरण गेला. त्यांच्या कृपेनें त्याचा रोग बरा झाला व त्यानें अमरापूर येथील जमीन या स्थानाची पूजा, व्यवस्था इत्यादि करतां दिली. राजाच्या या देणगीनें श्रीगुरूंचा अनुपम अधिकार राजमान्य झाला. त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली. शिरोळें गांवीं एका ब्राह्मणाचीं मुलें जगत नसत. त्यानें श्रीगुरूंचा धांवा मनापासून

करण्यास सुरुवात केली. एका रात्रीं श्रीगुरूंनीं ब्राह्मणवेषानें त्याची गांठ घेतली व या चिन्मय पादुकांची सेवा करण्यास त्याला सांगितलें. ब्राह्मणदंपतीनें नित्यनेम धरून मोठ्या श्रद्धाभक्तिपूर्वक या चिन्मय पादुकांची सेवा करण्यास प्रारंभ केला. कांहीं दिवसांनीं ब्राह्मणानें पुन्हा त्या दंपतीची गांठ घेऊन उभयतांना दीर्घायुषी पुत्र होतील म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें त्यांना प्रत्यक्ष अनुभव आला. पुढें त्यांपैकीं एक पुत्र अकस्मात मरण पावला. पण ब्राह्मणपत्नी त्या मृतपुत्रासह पादुकांजवळ धरणें धरून बसली. अखेर श्रीगुरु प्रत्यक्ष प्रगट झाले व त्यांनीं त्या पुत्राला जिवंत केलें.

बारा वर्षें या स्थानीं श्रीनृसिंह सरस्वती होते. अनेकांना अनेक अनुभव आले. कामनिकांच्या ऐहिक कामना पुऱ्या होऊन ते भक्तीला लागले,तर अनेक अधिकारी साधकांचे सिद्ध झाले. त्यांची कीर्ति या चमत्कारांनीं दूरवर पसरल्यानें दूरदूरचे भक्त त्यांच्याकडे येत. पण शेवटीं लोकांच्या या उपसर्गाला कंटाळून ते गुप्त रीतीनें गाणगापूरला भीमा-अमरजा संगमावर एकटेच गुप्तपणें निघून गेले. पण त्यांच्या पादुकांच्या ठिकाणींहि लोकांना तसाच अनुभव येत गेला. सरस्वति गंगाधर गुरुचरित्रांत म्हणतो, "हृदयशूळ, गंडमाळ, अपस्मार रोग सकळ, परिहरती तात्काळ, श्रीगुरु पादुका अर्चितां । चतुर्विध पुरुषार्थ, तेथें होय निश्चित, प्रत्यक्ष वसे श्रीगुरुनाथ, औदुंबरीं सनातन ।" श्रीधरानें यांचा महिमा " पूर्ण ब्रह्म मूसावलें, तें हें दत्तरूप ओतिलें, ज्याचे विलोकनमात्रे तरले, जीव अपार त्रिभुवनी" अशा शब्दांत गायिला आहे.

नृसिंहसरस्वती इथें रहात असतांना त्यांची मनोभावें सर्वार्पणबुद्धीनें सेवा रामचंद्र योगी या सत्पुरुषानें शेवटपर्यंत केली. त्यांच्या साधनेचा अधिकार येवढा मोठा होता कीं, ज्येष्ठ वद्य चतुर्दशीला त्यांनीं श्री. ज्ञानोबा माउलींसारखीच संजीवनी समाधी आपल्या गुरूच्या चरणकमलांजवळ घेतली. वर्षाऋतूंत ज्यावेळीं येथल्या मंद-

रांतल्या पादुकांना कृष्णामाई आपल्या अंतरंगांत सांठवते, त्यावेळीं यांच्या समाधीचीच पूजा केली जाते. त्याचप्रमाणें तासगांवच्या नारायणस्वामींनीं इथे येऊन श्रीगुरु पादुकांची अपूर्व सेवा केली व ते सदेह वैकुंठाला गेले. पादुकांआधीं यांच्या मंदिरांतच पूजा करण्याची प्रथा आहे. बारा वर्षें अनवाणी काशीरामेश्वर यात्रा करणाऱ्या व अखंड मौन धारण करणाऱ्या मौनी स्वामींनीं, इथें बारा वर्षें राहून आपली तपस्या पूर्ण केली. अनेक मोठमोठे यज्ञयाग केले. एकनाथ महाराजांचे गुरु श्री जनार्दनस्वामी इथें अनेक वेळां येऊन रहात. त्यांच्याच आज्ञेनें एकनाथ महाराजांनीं येथला भव्य घाट बांधून येथल्या पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार केला. माणगांवचे निर्मल योगीराज श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी ऊर्फ टेंबेस्वामी हे अनेक वर्षें या चिन्मय पादुकांची सेवा करून साधकाचे सिद्ध सत्पुरुष झाले. श्रीगुरुचरित्रावर, त्यांनीं आपल्या प्रभावी वाणीनें अनेक ग्रंथ रचले व अवघ्या भारतभर आपला समर्थ शिष्यसांप्रदाय वाढविला. त्यांचे पट्टशिष्य श्रीमत् नरसिंहसरस्वती दीक्षितमहाराज यांनीं आपल्या गुरुसमवेत राहून, इथें घोर तपस्या करून, या स्थानाचा महिमा वाढवला. अमरेश्वराच्या पुरातन मंदिराचा जीर्णोद्धारहि त्यांच्याच प्रेरणेनें झाला. श्री टेंबेस्वामींचे दुसरे पट्टशिष्य व महान् अधिकारी पुरुष श्रीमत् परमहंस श्री वामनरावजी गुळवणी महाराज यांचा निवास या ठिकाणीं अनेक वर्षें नित्य नियमानें झाला. त्यांच्या सांप्रदायांतहि अनेक साधकांचे सिद्ध झालेले सत्पुरुष त्यांच्या प्रभावानें या ठिकाणीं या "चिन्मय पादुकांची" सेवा करीत असतात.

अशी ही संत सत्पुरुषांची अखंड परंपरा या ठिकाणीं आज कैक शतकें चालू आहे. एखादा विजेचा लोळ एखाद्या ठिकाणीं क्षणभर चमकून गेला तरी त्याची प्रभा त्यानंतरहि सभोंवतालच्या प्रदेश प्रकाशमय करते. त्या विद्युल्लतेचा कडकडाट त्यानंतरहि

आसमंतांत प्रतिध्वनित् होत रहातो. एखाद्या ठिकाणीं अतिसुगंधी उदबत्ती, अत्तराचा दीप लावला गेला तरी त्याचा सुगंध ती उदबत्ती वा तो दीप विझला तरी बराच काल दरवळत रहातो. श्रुतिमधुर संगीत संपलें, तरी त्याचे नाद कितीतरी वेळ मनांत घोळत रहातात. श्रीगुरूंच्या या दिव्य चिन्मय पादुकांच्या ठिकाणींहि आपल्याला हीच प्रचीति येते. कृष्णामाईच्या अघनाशिनी निर्मल जलाच्या स्नानानें आपल्या चित्ताचे दरवाजे मोकळे झाले, त्यांतलें खळमळ धुवून निघालें व निर्मल अंतःकरणानें आपण तिथले श्रुतिमधुर घंटानाद व पूजासमयीं चाललेला वेदघोष ऐकून, जर तन्मयतेनें तिथल्या चंदन विलेपित, पुष्प-धूप-दीप-नैवेद्य सुशोभित मनोहर पादुकांचें दर्शन घेऊं लागलों, तर आपल्या मनाचीं सारीं कवाडें सद्गुरुकृपेनें खुलीं होतात. चित्तांत अननुभूत मांगल्याचे, पावित्र्याचे, उदात्ततेचे स्रोत उसळ्या मारूं लागतात. पंढरपूरच्या दगडाच्या ओबडधोबड मूर्तींत “ सुंदर तें ध्यान ” पहाणाऱ्या तुकारामाच्या चित्तसौंदर्याचा साक्षात्कार आपल्याला होतो. आणि आपण जर सूक्ष्म विचार केला, तर व्यवहारांतहि हा अनुभव आपणांस येतो. ज्या स्थळीं आपण एखादा ट्रॅन्झिस्टर घेऊन राहूं तिथें श्रुतिमधुर संगीताच्या ध्वनिलहरी तरंगत असतातच. पण आपल्या नुसत्या कानानें त्या आपणांस ऐकूं येत नाहींत. पण ट्रॅन्झिस्टर जवळ असेल तर त्याचें बटन दाबतांच त्यांतून श्रुतिमधुर संगीताचे आलाप आपण सहज ऐकूं लागतो. ज्या कुठल्या पांचशें मैलांवरच्या रेडिओ-केंद्रांतून त्या संगीतलहरी ध्वनिक्षेपित झाल्या, त्याचा लाभ आपण तिथें त्या साधनानें घेऊं लागतो. त्या ट्रॅन्झिस्टरनें तें संगीत, त्या लहरी निर्माण केल्या नाहींत. त्या लहरी वातावरणांत आधींच होत्या. फक्त त्या ग्रहण करण्याची शक्ति आपल्या कानांना नव्हती. त्यामुळें त्या ध्वनिलहरी असून नसून आपल्या दृष्टीनें सारख्याच होत्या. उलट अशा लहरींचें अस्तित्वहि आपण मान्य

करण्यास तयार नव्हतों. पण ध्वनिलहरी ग्रहण करून, त्या आपल्याला ऐकवण्याच्या ट्रॅन्झिस्टरच्या सामर्थ्यानें आपण त्याचा लाभ घेऊं शकलो. पांचशें मैलांवरच्या त्या संगीतानें आपलें मन तन्मय होऊन आनंदित होऊं शकलें. आपल्या घरांतहि विजेच्या तारांमधून वीजप्रवाह वहात असेल पण आपल्या जवळ होल्डरमध्यें बसवायला एखादा बल्ब नसेल, तर घरांत वीज खेळत असूनहि त्या बल्बच्या अभावानें इतर हजार मूल्यवान वस्तूंचा संग्रह आपल्याजवळ असूनहि आपण त्या प्रकाशापासून वंचितच राहूं. त्याप्रमाणेंच या महान स्थानीं येऊनहि आपलें चित्त विकारानें, खळमळांनीं लडबडलेलें असेल, त्या चित्ताचे सारे दरवाजे खुले नसतील तर त्यांत येथलें चिन्मय चैतन्य आपली प्रभा दाखवूं शकणार नाहीं. इथला सुगंध, इथला प्रभाव, इथलें चैतन्य यांचा अनुभव घेण्यास, जसा तो ट्रॅन्झिस्टर, जसा तो बल्ब त्या त्या कारणांकरतां हवा, तसा चित्ताचा संपूर्ण सहकार आवश्यक आहे. तो सहकार लाभला म्हणजे या दगडाच्या पादुकांतूनच त्या श्रीगुरूंचा आपण अनुभव घेऊं शकूं.

आधुनिक विज्ञानाच्या सिद्धांतांतहि आतां या व्यक्त व जड भौतिक विश्वाच्या मुळाशीं एक अज्ञात, अव्यक्त असें प्राकृतिक सत्य असलें पाहिजे, हें सिद्ध झालें आहे. आधुनिक विज्ञानहि आतां या जगांतले सारे अणुरेणू हे गतिमान आहेत, ज्याला आज आपण व्यावहारिक भाषेंत जड म्हणतो ती वस्तूहि त्यांतले सारे अणु-परमाणू गतिमान असल्यानें चैतन्यमय आहे असेंच मानतें. आधुनिक विज्ञान हें व्यक्तीच्या अंतिम सीमेपर्यंत गेलें आहे. तें आतां अव्यक्ताचें दार ठोठावत आहे. पण हें दार त्याला उघडणें अशक्य आहे. कारण, त्या अव्यक्ताची प्रक्रिया व्यक्त व बाह्य विश्वांत कुठेंच दिसून येत नाहीं. कारण, ती वस्तुमात्राच्या अंतःकरणांत चालू असते. पण आत्मभिन्न अशा वस्तूंत आपल्याला संचार करतां येत नाहीं, म्हणून आतां आपल्याला या अव्यक्ताचा शोध आपल्या अंतःकरणांतच घ्यावा

लागेल. या बाहेर मनोहर वाटणाऱ्या श्रीगुरूंच्या चिन्मय पादुकांचा आधार घेऊन, आपण आपल्याच अंतरंगांत त्या श्रीगुरूंना शोधलें पाहिजे. त्यांचा प्रत्यक्ष अतींद्रिय अनुभव घेऊन आपलें जीवन अमृतमय केलें पाहिजे. पण त्याकरतां आपणांस आपल्या पूर्वार्जित भ्रम-संस्कारांचें काळेकुट्ट आवरण दूर करावयास हवें. विराट विश्वात्मक अनुसंधानाला विस्मरून व क्षुद्र अहं-ममनिष्ठ जाणिवेच्या टीचभर घरट्यांत आपल्याला बंदिस्त करून, युगानुयुगें आपण तो आपला नतद्रष्ट संसार अंतर्बाह्य भ्रमिष्टपणें चालवीत आहोंत. तो आमच्या अंतर्बाह्य इतका व्यापून आहे कीं, आमच्या बाह्य व जागृत व्यवहाराला तर तो सोडीत नाहींच, पण झोपेंत स्वप्नरूपानें त्यानें आमच्यावर आपलें अधिराज्य बसवलें आहे. त्यामुळेंच तुकाराम "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य मन आणि जग" असें या संसार-रणाचें वर्णन करून राहिला आहे. ज्ञानेश्वर महाराज तर या भयानक संसारानें, लंगोटी लावून विजन अरण्यांत गेलेल्या संन्यासी, योगी यांना मठ, शिष्य, देहासक्ति, लोकेषणा इ. रूपानें कसें पछाडलें आहे ते सांगत आहेत. या नादान भ्रमिष्टपणाला मुळापासून उपटून फेकणारी, आत्मज्ञानाचे डोळे देऊन अविद्या-तिमिराच्या घरट्यांतून बाहेर खेचून काढणारी, आणि विराट विश्वालाहि व्यापून टाकणाऱ्या प्रकाशमय अशा अनंत अवकाशांत विमुक्त संचार करण्याची अद्भुत शक्ति देणारी अशी जी स्वानु-भूती, अशी जी स्वसंवेद्यता, तिच्यांतच "श्रीगुरु" या सांकेतिक पदानें निर्दिष्ट होणाऱ्या अर्थाचें सार सांठलें आहे.

"श्रीगुरु" ही अनुभूति म्हणजे अनंत व अनिर्बंध अशी यत्नशून्य अखंड सळसळणारी स्फूर्तिमात्र चेतना. अनादि अविद्येच्या काळोखी निद्रेंत राहून भ्रमिष्टपणाचीं नानाविध वासनाजन्य स्वप्नें पाहाण्यास सोकावलेल्या मूर्ख मानवाला जागे करणारी जी चिन्मय अनुभूति तीच "श्रीगुरुमूर्ति, त्याच श्री श्रीगुरूंच्या चिन्मय मनोहर चरण-

कमलीं बसलेल्या पादुका " एखाद्या बालकाला आकाशींचा चंद्र दाखवण्याकरतां, ज्या चंद्रशाखा न्यायानें आधीं जवळची फांदी दाखवून मग तिच्या कोनांत असलेलें चंद्रबिंब दाखवावें लागतें व त्यामुळेंच त्याला फांदी सोडून, फांदीच्या आधारेंच मूळ चंद्रबिंबाचें ज्ञान होतें त्याप्रमाणेंच आपणांस कृष्णातीरच्या या मनोहर पादुकांच्या फांदीच्या आधारेंच ते " श्री गुरु " व त्यांचा चिद्विलास यांचा अनुभव मिळतो. श्रीगुरु या शब्दांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष " श्रीगुरूचा "च अर्थ समजून अनुभवायचा आहे. आपल्यांतील स्फुरण–स्पंदनांचा त्या विधात्मक स्फुरण स्पंदनांशी सरमेळ लावायचा आहे. सद्गुरूंचा, सत्याचा स्पर्श लाभण्यासाठीं ' आपलें असें ' सर्व कांहीं नाहींसें व्हावें लागतें. सत्याच्या स्वरूपाबाबतचें सर्व तर्क-वितर्क, सर्व बौद्धिक निर्धार संपुष्टांत आल्यानंतर मग कोणताहि निर्धार नाही, सर्व शून्य आणि केवळ लक्षसंधान अशा अवस्थेंत ज्यांना राहतां येईल, त्यांनाच सत्यरूप श्रीगुरूंचा स्पर्श प्राप्त होतांच सूर्य उगवतांच रात्र उरत नाहीं, पाण्यांत विरतांच मीठ उरत नाहीं, जागेपणांत निद्रा उरत नाहीं, आगीच्या स्पर्शात कापुर उरत नाहीं, तद्वत मी, माझा सद्गुरु, माझा सांप्रदाय, माझी परंपरा, असें कांहीं-देखील येथें बाकी उरत नाहीं. शब्द-अर्थ प्रत्यय ही त्रिपुटी जशी प्रत्ययांत विलीन होते, ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान ही त्रिपुटी जशी ज्ञानांत विलीन होते, तद्वत शिष्य–श्री गुरु–साक्षात्कार ही त्रिपुटी सत्य साक्षात्कारांतच विलीन होते. येथें सत्य-दर्शनार्थ अतीव व्याकुलता व प्रीतिनिर्भरता आपल्या अंतःकरणाला भेदून आरपार झाली पाहिजे. अश्रूंच्या महापुरांत आपला सारा ' अहं ' जीवपणासह पार सोडून द्यावयाचा आहे, म्हणजेच या श्रीगुरूंचें रहस्य हळुंहळूं उलगडूं लागून श्रीगुरूंचा म्हणजेच सत्याचा साक्षात्कारी अनुभव येण्यास सुरुवात होते.

सद्गुरु, म्हणजे तें अज्ञात, अमर्याद, दिक्कालातीत, अनवच्छिन्न

केवळ स्फूर्तिमात्र चैतन्य. हें चैतन्यच सर्व चराचरांत भरीव आकाशा-सारखें खच्चून भरलेलें आहे. असा एक क्षण नाहीं, असा एक कण नाहीं कीं, जेथें हें चैतन्य पूर्णत्वानें भरलेलें नाहीं. समग्र वस्तु-जात म्हणजे या चैतन्यमय वस्तूची प्रभा. ही वस्तुस्थिति न आकलन होणें याचें नांव अज्ञान अथवा अविद्या. या अविद्येनेंच वस्तुप्रभा आवरित झाल्यासारखी वाटते. आणि या वाटण्यामुळेंच आपली संविद्, देह, इंद्रियें, मन, अहंकार, बुद्धि यांनीं अवच्छिन्न होते.

अंतःकरणानें अवच्छिन्न झालेलें चैतन्य, अंतःकरणाच्या सर्व व्यापारांकडे असंगपणें पाहूं शकतें. कारण, मूलतः तें अनवच्छिन्न असेंच आहे. असें नसतें, तर हें असंगपणें पाहतां येणें अशक्यच झालें असतें; आणि आपणाला बद्धदशेंतून मुक्त होतां येणें व सत्य-साक्षात्कार करून घेणें, हेंहि सर्वथैव अशक्य झालें असतें.

म्हणून आपल्या जीवनाचें सारें रहस्य त्याच्या जाणिवेंत, त्याच्या संविद् मध्यें सांठलें आहे; आणि या जाणिवेचें रहस्य अथवा संविद्-रहस्य हें अंतःकरणाच्या सर्व व्यापारांकडे असंगपणें पाहण्यांत सांठलेलें आहे. हें असंग आत्मनिरीक्षण प्रथम एकलत्वाची जाणीव करून देतें, नंतर सर्व मनोव्यापारांच्या मुळाशीं वासनात्मक अहंबुद्धीच कशी आहे याची साक्ष ती पटवते; नंतर अहंबुद्धि हेंच प्रमेय होतें व असंग निरीक्षणाच्या प्रभावामुळेंच तिचे व्यापार हळुंहळुं बंद पडूं लागतात. अशा अवस्थेंत असतांना एक वृत्ति उसळावी, क्षण-काल रहावी आणि विरून जावी, आणि दुसरी वृत्ति कशी, केव्हां उठते, हें लक्षपूर्वक पाहूं लागतां, ती उठूंच नये, अशी प्रतीति येते.

या अतीत व अनागत वृत्तींच्या मध्यंतरांत जेव्हां लक्षसंधान अवस्थित होऊं लागतें, तेव्हांच नाहींपणा म्हणजे काय हें आकलन होऊं लागतें. नाहींपणांत म्हणजेच अभाव योगांत, अवस्थित होऊं लागलेला जीव, शब्दापासून, प्रमाण-प्रक्रियेपासून, विचार-भावना-

अनुक्रम ३८५५८...... वि ....निबंध
क्रमांक ....२.५.३८...... नों दि १८-२-९८


कल्पना यांच्यापासून व तज्जन्य कार्थ प्रवृत्तींपासून विमुक्त होऊं लागतो. त्यामुळें सर्व शून्यता त्याला जाणवूं लागते. सर्व प्रमेयें या महाशून्यांत येतात व विरून जातात. आणि अंतःकरण व बाह्य विश्व यांचें एक साकल्यात्मक प्रमेयच या महाशून्यांत वावरूं लागतें. या अवस्थेंत मग सोनें आणि लेणें, चंद्र आणि चांदणें, कापूर व परिमल गूळ आणि गोडी, गुरु आणि शिष्य यांच्यांत नांदणारें एकपण सहज आकळतें. या अवस्थेंत मग त्याला एकाएकीं त्या अज्ञात, अमर्याद, कालातीत, नित्य जागृत अशा स्व-संवेद्याचा साक्षात्कार घडतो. चेता आणि चेवविता, हीं दोन्ही एकच आहेत याची त्याला साक्ष पटते. त्या अमूर्त, अज्ञात, अमर्याद, कालातीत स्फूर्ति-मात्रतेचा स्पर्श लाभतांच समग्र मानवी जीवन, समग्र चराचर, हीं त्या अद्‌भुत 'वस्तू'चीच 'प्रभा' आहे याची साक्ष पटते. 'गुरु–शिष्यत्व' हें त्या 'वस्तु-प्रभेंतच' चिद्विलासमयतेनें नांदत रहातें. आरशावांचून डोळ्यानें डोळा पहावा, आणि अशा अद्‌भुत भेटीचा सोहळा उपभोगावा, असा चमत्कार ज्याच्यामुळें घडून येतो, त्याचें हें वर्णन आहे. हें निरपेक्ष, द्वैताद्वैतातीत अशा निखळ चैतन्याचें वर्णन आहे. वर्णन करणाराहि चिन्मय आणि ज्यांचें वर्णन आहे ते श्रीगुरुहि चिन्मय आहेत.

नरसोबाच्या वाडीला दिसणाऱ्या त्या मनोहर पादुका, त्यांतून प्रकट होणारी चैतन्याचीं, निरतिशय आनंदाचीं अखंड स्पंदनें, त्या स्पंदनांतून होणारे किंकिंणी-मंजुलम् असें श्रुतिमधुर संगीत, येवढेंच काय पण वेगानें वाहणाऱ्या कृष्णामाईचीं, तिच्यांतल्या तरंगांचीं, तिच्या जलाच्या बिंदूंचीं, नव्हे कणाकणांचीं–अणुपरमाणूंचीं सारीं स्पंदनें, जवळच असलेल्या औदुंबर, वट, पिंपळाच्या हरित चिन्मय पानांच्या सळसळींतून सौंदर्याची, श्रुतिमधुर संगीताचीं होणारीं स्पंदनें, सभोंवतीं दाटपणें पसरलेल्या नील नभोवितानांतून प्रकटणारीं, अनुभूत होणारीं पण अदृष्य अशीं सारीं स्पंदनें व आपल्या कणा-

केवळ स्फूर्तिमात्र चैतन्य. हें चैतन्यच सर्व चराचरांत भरीव आकाशासारखें खच्चून भरलेलें आहे. असा एक क्षण नाहीं, असा एक कण नाहीं कीं, जेथें हें चैतन्य पूर्णत्वानें भरलेलें नाहीं. समग्र वस्तुजात म्हणजे या चैतन्यमय वस्तूची प्रभा. ही वस्तुस्थिति न आकलन होणें याचें नांव अज्ञान अथवा अविद्या. या अविद्येनेंच वस्तुप्रभा आवरित झाल्यासारखी वाटते. आणि या वाटण्यामुळेंच आपली संविद्, देह, इंद्रियें, मन, अहंकार, बुद्धि यांनीं अवच्छिन्न होते.

अंतःकरणानें अवच्छिन्न झालेलें चैतन्य, अंतःकरणाच्या सर्व व्यापारांकडे असंगपणें पाहूं शकतें. कारण, मूलतः तें अनवच्छिन्न असेंच आहे. असें नसतें, तर हें असंगपणें पाहतां येणें अशक्यच झालें असतें; आणि आपणाला बद्धदशेंतून मुक्त होतां येणें व सत्यसाक्षात्कार करून घेणें, हेंहि सर्वथैव अशक्य झालें असतें.

म्हणून आपल्या जीवनाचें सारें रहस्य त्याच्या जाणिवेंत, त्याच्या संविद् मध्यें सांठलें आहे; आणि या जाणिवेचें रहस्य अथवा संविद्रहस्य हें अंतःकरणाच्या सर्व व्यापारांकडे असंगपणें पाहण्यांत सांठलेलें आहे. हें असंग आत्मनिरीक्षण प्रथम एकलत्वाची जाणीव करून देतें, नंतर सर्व मनोव्यापारांच्या मुळाशीं वासनात्मक अहंबुद्धीच कशी आहे याची साक्ष ती पटवते; नंतर अहंबुद्धि हेंच प्रमेय होतें व असंग निरीक्षणाच्या प्रभावामुळेंच तिचे व्यापार हळुंहळुं बंद पडूं लागतात. अशा अवस्थेंत असतांना एक वृत्ति उसळावी, क्षणकाल रहावी आणि विरून जावी, आणि दुसरी वृत्ति कशी, केव्हां उठते, हें लक्षपूर्वक पाहूं लागतां, ती उठूंच नये, अशी प्रतीति येते.

या अतीत व अनागत वृत्तींच्या मध्यंतरांत जेव्हां लक्षसंधान अवस्थित होऊं लागतें, तेव्हांच नाहींपणा म्हणजे काय हें आकलन होऊं लागतें. नाहींपणांत म्हणजेच अभाव योगांत, अवस्थित होऊं लागलेला जीव, शब्दापासून, प्रमाण-प्रक्रियेपासून, विचार-भावना-

अनुक्रम ३६५५८ वि: निबंध
क्रमांक ९.५.३८ नों दि

११० : १११

कल्पना यांच्यापासून व तज्जन्य कार्य प्रवृत्तींपासून विमुक्त होऊं लागतो. त्यामुळें सर्व शून्यता त्याला जाणवूं लागते. सर्व प्रमेयें या महाशून्यांत येतात व विरून जातात. आणि अंतःकरण व बाह्य विश्व यांचें एक साकल्यात्मक प्रमेयच या महाशून्यांत वावरूं लागतें. या अवस्थेंत मग सोनें आणि लेणें, चंद्र आणि चांदणें, कापूर व परिमल गूळ आणि गोडी, गुरु आणि शिष्य यांच्यांत नांदणारें एकपण सहज आकळतें. या अवस्थेंत मग त्याला एकाएकीं त्या अज्ञात, अमर्याद, कालातीत, नित्य जागृत अशा स्व-संवेद्याचा साक्षात्कार घडतो. चेता आणि चेवविता, हीं दोन्ही एकच आहेत याची त्याला साक्ष पटते. त्या अमूर्त, अज्ञात, अमर्याद, कालातीत स्फूर्तिमात्रतेचा स्पर्श लाभतांच समग्र मानवी जीवन, समग्र चराचर, हीं त्या अद्‌भुत 'वस्तू'चीच 'प्रभा' आहे याची साक्ष पटते. 'गुरु–शिष्यत्व' हें त्या 'वस्तु-प्रभेंतच' चिद्विलासमयतेनें नांदत रहातें. आरशावांचून डोळ्यानें डोळा पहावा, आणि अशा अद्‌भुत भेटीचा सोहळा उपभोगावा, असा चमत्कार ज्याच्यामुळें घडून येतो, त्याचें हें वर्णन आहे. हें निरपेक्ष, द्वैताद्वैतातीत अशा निखळ चैतन्याचें वर्णन आहे. वर्णन करणाराहि चिन्मय आणि ज्यांचें वर्णन आहे ते श्रीगुरुहि चिन्मय आहेत.

नरसोबाच्या वाडीला दिसणाऱ्या त्या मनोहर पादुका, त्यांतून प्रकट होणारी चैतन्याचीं, निरतिशय आनंदाचीं अखंड स्पंदनें, त्या स्पंदनांतून होणारें किंकिंणी-मंजुलम् असें श्रुतिमधुर संगीत, येवढेंच काय पण वेगानें वाहणाऱ्या कृष्णामाईचीं, तिच्यांतल्या तरंगांचीं, तिच्या जलाच्या बिंदूंचीं, नव्हें कणाकणांचीं–अणुपरमाणूंचीं सारीं स्पंदनें, जवळच असलेल्या औदुंबर, वट, पिंपळाच्या हरित चिन्मय पानांच्या सळसळींतून सौंदर्याची, श्रुतिमधुर संगीताचीं होणारीं स्पंदनें, सभोंवतीं दाटपणें पसरलेल्या नील नभोवितानांतून प्रकटणारीं, अनुभूत होणारीं पण अदृष्य अशीं सारीं स्पंदनें व आपल्या कणा-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३०४०

कणांतून, मना-अंतःकरणांतून त्याच तालावर नाचणारीं सारीं एक-सुर स्पंदनें, त्याच श्रीगुरुंच्या श्रुतिमधुर गीतांच्या आलापांनीं सज-लेलीं आहेत असा अनुभव आपणांस येतो. त्या गूढ, अतर्क्य, अमर्याद, कालातीत व केवळ स्फूर्तिमात्र अशा ऐक्याचा अमृत-स्पर्श होताच, तें चिन्मयच, ऐक्याचा बिघाड होऊं न देतां द्वैताचा उठाव करीत आहे व प्रीतिमय सख्यावर निरतिशय आनंदाचें नित्य नूतन लेणें चढवीत आहे असेंच सर्व सृष्टींत दिसूं लागतें ! सृष्टींतील सारीं रानेंवनें चिरवसंताच्या स्पर्शानें पुलकित होऊन सर्वत्र सर्वकाळ ती आनंदच उधळीत आहेत, असा प्रत्यक्ष अनुभव येतो. ही सारी त्या केवळ स्फूर्तिमात्राची किमया. येथे एक नाहीं, दोन नाहीं, अनेक नाहीं, अथवा एक, दोन, अनेक हे सर्व त्या स्फूर्ति-मात्राचेच आविष्कार, केवळ त्या चिन्मय वस्तूचीच प्रभा !

हा सारा अद्भुत आनंद ज्या कृष्णामाईनें, ज्या चिन्मय मनोहर पादुकांनीं, ज्या श्रीगुरुंनीं आपल्या अपार वात्सल्यस्नेहानें दिला, त्यांच्याब ल कृतज्ञतेनें अंतःकरण भरून येतें. त्या साऱ्यांना वंदन करायलाहि मग ‘ आपण ’ शिल्लकच उरत नाहीं.

● ● ●

हार्दिक आभार—‘अनुभवामृत रस-रहस्य’ या सुंदर ग्रंथाचे कर्ते व थोर अमृतानुभवी, प्रा. पु. य. देशपांडे, नागपूर यांनीं आपल्या या अपूर्व अमृतानुभव रस-रहस्याचा माझ्या लेखनांत हवा तसा खुशाल उपयोग करण्याची मला ताबडतोब परवानगी दिली याबद्दल त्यांचें मनःपूर्वक आभार. प्रत्येक जिज्ञासू साधकानें अवश्य-मेव वाचावा असा हा अपूर्व ग्रंथ आहे.

लेखक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ..३६५५८........ दि: ........
क्रमांक ...९५३८........ नों दि. १८-१२-६८

REFBK-0013750
REFBK-0013750